म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : 3026

संघ काय कसा?

व. ग. देवकुळे.



REFBK-0024148

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

21 MAR 1984

13 JUN 198-

15 JUN 1988

(क्र. मा. ग्र.)
५०००-१२-८२

मराठी ग्रंथ संग्रहालय संघ
संघ शाखा (स्थळ प्रत)

संघच का ? व कसा ?

(राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील माझी ५० वर्षे)

वसंत गणेश देवकुळे

REFBK-0024148

उत्कर्ष प्रकाशन

प्रकाशिका
सौ. सविता जोशी
उत्कर्ष प्रकाशन
एरंडवणा, पुणे ४११००४

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे ४११०३०

© **व. ग. देवकुळे**
८७४ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९८३

मूल्य : १८ रुपये

संदर्भ निबंध
3026
24984
3/3/84

माननीय

काशीनाथपंत लिमये — बाबाराव भिडे — भाऊराव अभ्यंकर
विनायकराव आपटे — भाऊसाहेब देशमुख

यांच्या दीर्घकालीन उत्साहवर्धक पवित्र स्मृतीस
(२४-१२-१९८३)

प्रस्तावना

"संघच का ? व कसा ?" ह्या पुस्तकाचे लेखक श्री. वसंतराव देवकुळे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे फार जुने ज्येष्ठ स्वयंसेवक आहेत. गेली सुमारे ५० वर्षे ते संघ जीवनाशी पूर्णपणे समरस झालेले आहेत. संघ जीवनातील सर्व उन्हाळे व पावसाळे त्यांनी अत्यंत जवळून पाहिलेले आहेत.

लहानपणापासून आमच्यासारख्या स्वयंसेवकांना देवकुळे-बंधूंनी नेहमीच स्फूर्ती दिलेली आहे. आमच्याकडे शाखा श्री. वसंतराव देवकुळे यांनी सुरू केल्या व वाढविल्या असे अनेक स्वयंसेवक अभिमानाने सांगतात.

ह्या पुस्तकातील नमूद केलेल्या अनेक घटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मर्यादित स्वरूपात पुण्यातील कार्याचा इतिहासच आहे. ह्या पुस्तकामुळे संघातील अनेक जुन्या व नव्या स्वयंसेवकांना संघजीवनाची आणखी ओळख होईल.

श्री. वसंतराव देवकुळे यांचे हजारो स्वयंसेवकांशी अत्यंत जवळकीचे व आपुलकीचे संबंध आहेत. ह्या लिखाणामध्ये श्री. वसंतराव यांनी व्यक्त केलेली मते वैयक्तिक आहेत; परंतु त्यांनी नमूद केलेल्या घटना व विचार अनेक स्वयंसेवकांना मार्गदर्शक व उद्‌बोधक ठरतील.

पुणे

मुरलीधर बेंद्रे
११-१२-१९८३

दोन शब्द

भारतातील सामाजिक वातावरणात बऱ्याच अंशाने राजकीय वातावरणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा एक टीका करण्यासारखाच विषय तथाकथित लेखकांच्या मनात येतो. कारण तसे लेखक संघाजवळ जात नाहीत, व जवळून पाहात नाहीत की, ही भारतव्यापी महान खटपट काय आहे. त्यात काय चाललेले असते? त्यामुळे अशा लिखाणात वस्तुस्थिती निदर्शक फार कमी माहिती असते.

संघाच्या बाजूने लिहिण्याची कोणी इच्छाच ठेवीत नाही. कारण हजारो संघबंधू कार्य वाढविण्यातच गर्क राहू इच्छितात.

१९३६ ते १९४० च्या दरम्यान केसरी, किर्लोस्कर मासिक यांनी ८–८ वा १०–१० लेखांक लिहून संघातील कल्पित दोष दाखविण्याचा प्रयत्न झाला होता. लेखांचे विषय 'वाया चाललेले तारुण्य, ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व, इत्यादि होते. त्यावेळी प्रत्येक लेखांक वाचून झाल्यावर एकेक नवीन शाखा काढण्याचा विचार केला गेला. मीही त्यात होतो.

मी काही कोणी विशेष कार्यकर्ता नाही. पण संघात प्रवेश केल्यापासून ५० वर्षेपर्यंत कुठेही अडखळलो नाही की थांबलो नाही. रोजच्या संबंधात राहिलो— समाधानाने मन भरून गेले. आजही अगदी नवी शाखा चालविण्याच्या तयारीत उमेदीत आहे. अशा स्थितीत मी ५० वर्षे कशी घालविली? पिढीमागून पिढीत चालू ठेवावयाचे हे कार्य मी कितपत करू शकलो? एका गावातील पहिल्या शाखेपासून प्रांताच्या कामापर्यंत कसा पोचलो? **हे नमुन्यादाखल कोणाही विचारवंताला कळावे ही इच्छा.** शेकडो नव्हे हजारो कार्यकर्त्यांतील मी एक याची पूर्ण जाणीव ठेवून उदाहरणादाखल ५० वर्षांची माझी वाटचाल सर्वांसमोर मांडीत आहे. हा इतिहास नव्हे. ह्या लिखाणातील प्रत्येक गोष्ट

माझ्यामुळे वा माझ्यासमोर घडलेली आहे. ५० वर्षांतील कोणत्याही बऱ्या वा वाईट घटनेमुळे माझे मन संघापासून थोडे सुद्धा दूर गेले नाही, एवढीच माझी मिळकत! ही मिळकत अत्यंत नम्रभावाने सर्वांसमोर मांडीत आहे. समजावून घ्यावी.

विद्यमान व्यक्तींचे नामोल्लेख टाळले तरी काही नावे द्यावी लागली आहेत. अनेकांचा उल्लेख मात्र करू शकलो नाही यांची जाणीव आहे. आजचे विद्यमान कार्यकर्ते मजपेक्षा मोठे आहेत याबद्दल मला शंका नाही, कारण ते इष्टच आहे. पण नावे नसलेल्या बंधूंनी मात्र मला क्षमा करावी.

निकट परिचयात आलेल्या दिवंगत कार्यकर्त्यांची स्मरणातील नावे दिली आहेत. माझ्यापुरता त्यांचा परिचय मी दिलेला आहे.

भारताच्या संस्कृती, समाज, राष्ट्र यांच्या डोलायमान स्थितीला पायबंद घालून नित्यसिद्ध, शक्तिमान व मानबिंदूंचे संरक्षण करणारी एक दिव्य शक्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रूपाने सतत क्रियाशील राहावी, याच इच्छेने प्रेरीत होऊन व्यक्तीनिरपेक्ष व परिस्थिती निरपेक्ष – असे जे कार्य जेवढे मला करता आले त्याची ही मजपुरती स्मरण गाथा आहे. यातील जेवढे बरे असेल तेवढे सर्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आहे. उणीवा, चुका, दोष हे सर्व माझे आहेत. त्याबद्दल क्षमा करावी.

२७–६–१९८३ च्या तरुण भारत पुणे, यामधील पू. डॉक्टर हेडगेवार यांच्या पुण्यस्मरणाचा लेख वाचून प्रा. सुहास जोशी व त्यानंतर अनेक संघ-बंधूंनी आग्रह केल्यावरून मी हे लिहिण्यास प्रवृत्त झालो.

त्यानंतर माझे बंधू सुधाकर वामन जोशी उत्कर्ष प्रकाशन यांनी अत्यंत आत्मीयतेने या प्रकारच्या लिखाणाची मागणी केली त्यामुळे यथामती लेखन केले आहे. स्मरण व काही टिपणे यांचाच उपयोग केला आहे.

२३–१२–१९८३

वसंत गणेश देवकुळे

पूजनीय डॉक्टर हेडगेवार

लो श्रद्धांजलि राष्ट्रपुरुष । शतकोटी हृदय के कुंज खिले है ।
आज तुम्हारी पूजा करने । सेतू हिमाचल संघ मिले हैं ॥ धृ० ॥

माँ के पदपद्मों में तुमने जो अमूल्य उपहार रखा है ।
सत्य चिरंतन अक्षय्य है हिंदू की अमिट रूपरेखा है ।
पावन संस्कारों से निर्मित तन–मन अन् ये भेद्य खिले है ॥१॥

तुमने किया व्यतीत कठिनतम लोकप्रसिद्धपराङ्मुगमुख जीवन ।
भीष्म समान रहे तुम अविचल हिंदुराष्ट्र के हित आजीवन ।
देव तुम्हारी घोर तपस्या के ही ये तो सुफल मिले हैं ॥ २ ॥

तुम अजात अरि लोकसंग्रही संघशक्ति के वलय कोन थे ।
देव बता दो प्रतिपक्षी भी क्यों इतने संतुष्ट मौन थे ।
सुन कर पावन चरित तुम्हारा कोटि हृदय प्रस्तर पिघले है ॥३॥

आज तुम्हारी पार्थिव प्रतिमा चर्मचक्षुओं से अदृश्य है ।
किन्तु कोटि उरनलियों में तव मूर्ति रहती अजस्र है ।
तेजोमय प्रतिबिंब तुम्हारे स्वयंसिद्ध अगणित निकले है ॥ ४ ॥

– कवि बच्छराज व्यास

पूजनीय गुरुजींना श्रद्धांजली

चाहिए आशिष माधव नम्र गुरुवर प्रार्थना ॥ धृ० ॥

देव इंगित पर तुम्हारे ध्येय पथ पर बढ रहे हैं ।
आपसे ज्योतित अनेको दीप अविरत जल रहे है ॥
राष्ट्रजीवन का गहनतम शीघ्र ही मिट कर रहेगा ।
मातृमंदिर में विभूषित दिव्य तव आराधना ॥ १ ॥

संकटों से पूर्ण पथ पर पुण्यस्मृति तव मार्गदर्शक ।
फूल होंगे शूल सारे मित्र होंगे सब विरोधक ॥
दीजिए वह शक्ति ऋषिवर बढ सके पथ पर निरंतर
कर सकें साकार गुरुवर आपकी हम कल्पना ॥ २ ॥

शत्रु को भी जीतता था आपका चारित्र्य उज्ज्वल ।
निंदकों पर मात करता आपका व्यवहार निर्मल ॥
मातृभू की वेदना जो आपके उर में बसी थी ।
पासके अल्पांश भी तो पूर्ण होगी साधना ॥ ३ ॥

पूज्य केशव थे भगीरथ साथ लायी संघधारा ।
इष्ट उनको मान तुमने भाग्य भारत का संवारा ॥
लक्ष्य की द्रुत पूर्ति हो हम मांगते आशिष तुमसे
कर सके हम शीघ्र पूरी मातृभू की अर्चना ॥ ४ ॥

– कवि तिवारी



संघकार्याची पार्श्वभूमी

१९३३ ते १९८३ हा पन्नास वर्षांचा काल संघाच्या कार्यात कसा गेला–कसा घालविला याबद्दल माझे मलाच थोडे कुतूहल वाटते. कशी एवढी वर्षे गेली! संघकार्यात असा दीर्घकाळ गेल्यानंतर शीणवठा, कंटाळा आला की कसे? दोन वेळा १९४८–४९ व १९७५–७७ अशा बंदीकाळांचा यात समावेश आहेच. दोन्ही वेळा स्थानबद्धतेमध्ये राहण्याचा योग आला होता. स्थानबद्धतेच्या काळात घरात राहता आले नाही इतकेच—पण संघकार्याच्या दृष्टीने कसलाही फरक जाणवला नाही. दोन्ही बंदीकाळ स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचेच आहेत!

वास्तविक १९३२ मध्ये म्हणजे इंग्रजी राज्याच्या काळात मध्यप्रांत सरकारच्या विधानसभेत संघावर बंदी आणण्याचा विचार निघाला. त्या वेळी ॲक्टिंग गव्हर्नर श्री. तांबे यांच्या पत्नींनी विधानसभेत प्रश्न विचारले होते की, आमच्या मुलांना हिंदुधर्म व संस्कृतीचे धडे देणारा संघ दोषी कसा? ख्रिश्चन, मुसलमान यांना स्वतंत्र प्रार्थना मंदिरे आहेत पण हिंदूंना तसा कसलाच आधार नाही. मंदिरांतून पूजा, कीर्तने, प्रवचने चालतात त्यामुळे हिंदू मुलांना धर्मसंस्कृतीचे धडे देणारा संघ बंद कसा करता? अशा या सडेतोड पृच्छेला इंग्रज सरकारजवळ म्हणजे त्या वेळच्या इंग्रजी राज्याच्या प्रतिनिधींना उत्तर देता आले नाही व तो प्रश्न मागे पडला. वऱ्हाड, मध्यप्रांत, नागपूर या भागातील संघाच्या उत्सवांमधून पू. डॉक्टर हेडगेवार यांनी निवृत्त न्यायाधीश व कायदे-पंडित यांना उत्सवाचे अध्यक्ष म्हणून बोलावून कायद्यात स्वसंरक्षणाचे महत्त्व किती आहे, तसेच प्रत्येकाने स्वतःचे रक्षण करण्याच्या सर्व कला शिकणे हे कायदेशीर असल्याबद्दल निर्वाळा दिला. त्यामुळे संघाच्या कार्यात कसलाही बेकायदेशीरपणा नसल्याची सूचना सरकारदरबारी योग्य व कायदा जाणणाऱ्या माणसाकरवी केली जात होती. इंग्रजांचे राज्य म्हणजे कायद्याचे राज्य व जे कायदेशीर असेल त्याला हरकत न घेण्याचे धोरण संघाला उपयुक्त होत गेले.

१९४८ मध्ये महात्मा गांधींचा प्राणघात संघाच्या योजनेतून झाला असे गृहीत धरून संघावर बंदी घातली गेली व ती ४-२-१९४८ ते ८-७-१९४९ राहिली. संघबंदी उठवावी म्हणून सत्याग्रह ९-२-१९४८ ला भारतभर झाला. ऐंशी वा जास्त हजार स्वयंसेवक तुरुंगात डांबले गेले. सरदार वल्लभभाई पटेल यांनी संघावरील आरोप कायदेशीरपणे खोडले गेल्यामुळे संघबंदी उठविली. कामात थोडे पाऊल मागे पडले पण बंदी उठताच ६-७ महिन्यांत सर्वत्र काम पूर्ववत झाले.

१९७५ ते १९७७ पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या रूपाने दडपशाही करण्याच्या विचारात पुन्हा २५-६-१९७५ रोजी संघावर बंदी घालण्यात आली. १९४८ च्या कार्यकर्त्यांना " मिसा "खाली स्थानबद्ध कण्यात आले. अपवाद सोडून स्थानबद्धतेमध्ये बरी वागणूक दिली गेली. या बंदीकाळात स्वयंसेवकांचे संबंध टिकविण्याचे प्रयत्न झाल्यामुळे जनता पक्षाच्या विजयानंतर २१-३-१९७७ ला बंदीकाळ संपला गेला. संघाचे काम लौकरच पूर्ववत झाले.

तथापि माझ्यासमोरचा ५० वर्षांचा संघाचा काळ कोणत्याही रीतीने, कोणत्याही परिस्थितीमुळे बिघडला नाही. एक तर मी सरकारी नोकर नव्हतो व संघावरील परमपवित्र निष्ठेमुळे बंदीकाळाला आपत्ती म्हणण्याची इच्छाही झाली नाही.

वास्तविक १९३३ मध्ये असलेली भारताची—देशाची स्थिती फारच वेगळी होती.

राजकीयदृष्ट्या महात्मा गांधींच्या निःशस्त्र प्रतिकारात्मक सत्याग्रह चळवळीने जागृती झाली असली तरी नोकरशाही हे इंग्रजांचे साधन अगदी परजलेल्या शस्त्राप्रमाणे कोणावरही चालविता येत होते. कायदेभंगात्मक सत्याग्रहाच्या अभूतपूर्व घटनेमुळे प्रांतवार स्वायत्तता द्यावी असा विचार सुरू झाला होता. काँग्रेस, हिंदुमहासभा, लोकशाही स्वराज्य पक्ष हे पक्ष महाराष्ट्रात कार्य करीत होते. १९३२ मध्ये श्री. एस्. एम्. जोशी, गोरे, खाडीलकर या त्या वेळच्या तरुण लोकांनी धर्म, संस्कृती यांना न मानणारा असा समाजवादी पक्ष स्थापन केला. त्याची सभा शिवाजी मंदिरात (पुणे) झाली होती. आज मात्र समाजवादी पक्ष जनता पक्षाच्या नावाने उभा आहे.

१९५२ चे सुमारास श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाने "भारतीय जनसंघ" ह्या राजकीय पक्षाची स्थापना होऊन या पक्षाने राजकारणात बरेच नाव मिळविले. पण श्यामाप्रसाद यांच्या बलिदानाने तो थोडा मागे पडला.

१९३३ मध्ये साम्यवादी अशा पक्षांची चलती होणार आहे असे वाटले होते. १९८३ मध्ये मात्र या पक्षांची स्थिती तितकी बरी नाही. आणीबाणी, मिसा, स्थानबद्धता यातून निर्माण झालेला जनता पक्ष, समाजवादी पक्षाच्या हट्टाग्रह, दुराग्रह, अहंमन्यतेच्या भूमिकेवरून भंगला व तो जवळजवळ समाजवादी पक्षाच्या मंडळींपुरता शिल्लक राहिला. देशातील जनतेने दिलेली संधी केवळ पक्षाभिनिवेशी वृत्तीने गमावली गेली. १९८३ मध्ये ती घटना चूक म्हणून औटघटकेचे पंतप्रधान श्री. चरणसिंग यांनी वर्णन केले आहे. पण आज त्याचा उपयोग नाही. राहिलेल्या जनता पक्षाने कर्नाटकात बहुमत मिळविले हे उल्लेखनीय आहे तथापि बरीच वर्षे महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न सोडविला गेला नाही. तो अजूनही जनता पक्षाने सोडविला नाही.

भारतीय जनसंघाचा नवा अवतार भारतीय जनता पार्टी बरीच कार्यान्वित झाली आहे. अशा तऱ्हेने स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीत बराच फरक पडला आहे. काँग्रेस ह्या एकसंध पक्षाचे तीन तुकडे पडले आहेत. देशहिताचा विचार अजून म्हणावा तसा त्यांच्यापुढे येत नाही.

आसामचा घुसखोर प्रश्न, पंजाबातील अकालींची देशघातकी मागणी, मिनाक्षीपुरम् येथील सामुदायिक धर्मान्तर या प्रश्नावर देशात आंदोलनात्मक घडामोडी झाल्या आहेत. जनजागरणही झाले.

तरुणांच्या संघटना

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य १९२५ मध्ये सुरू होऊन प्रांतनिहाय, जिल्हानिहाय, तालुकानिहाय संघाच्या शाखा सतत वाढत गेल्या असून त्याद्वारे हिंदुधर्म संस्कृती समाज यांच्या जागरणाचे कार्य सुरू आहे. त्यात पिछेहाट नाही. हिंदुस्थानी काँग्रेस सेवादल (डॉ. हर्डीकर), राष्ट्रसेवादल या तरुण संघटनांची कामे बंद झाली. तसेच तरुण संघटना म्हणून त्यांचे स्वरूप तरी राहिले नाही. ही गोष्ट बरी झाली नाही असे वाटते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना देशातील नैसर्गिक आपत्ती, तसेच चिनी व पाकिस्तानी युद्ध यामध्ये देशहिताच्या दृष्टीने स्पृहणीय कामे करता आली. तहान लागल्यावर नव्हे अगोदर खणलेली विहीर जशी केव्हाही उपयोगात येते, तद्वत या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य अनेक आपत्तींमध्ये देशवासियांच्या उपयोगी पडले हे कोणी विसरण्यासारखे नाही.

१९३३ साली संघाचा माझा संबंध सुरू झाल्यानंतर "संघटनेसाठी संघटना" असा एक कार्यविषयक विचार मनात सतत जागा ठेवला होता. कारण काही थोडे लोक दिसू लागताच आम्ही लगेच कुठल्या तरी कार्यात पडावे ही प्रत्येकाची अपेक्षा. पण मग संघाची वाढ व प्रचार कामे कोण करणार? देशभर प्रत्येक हिंदूपर्यंत जाऊन पोचून त्याला संघटनेत समाविष्ट करण्याचे काम कोण करणार? या अशा विचारांमुळे सुमारे १०-१५ वर्षे आम्ही कोठे पाहिलेच नाही. संघ वाढविणे एवढेच काम करण्याने ठरवून वागलो व त्यात काही चूक केली असे वाटत नाही. पण १९५२-५३ नंतर पू. गुरुजींनी भारतीय मजदूर संघ, हिंदूस्थान समाचार, विश्व हिंदू परिषद, विद्यार्थी परिषद, वनवासी क्षेत्र या प्रकारच्या लोकोपयोगी कार्यांना सुरुवात केल्यानंतर अनेक स्वयंसेवकांना या परिवारक्षेत्रात काम करण्यास जाण्याचे उत्तेजन देण्यात आले. अर्थात शिस्त, प्रामाणिकपणा, ध्येयनिष्ठा अशा गुणांचा पारिपोष करून पक्क्या झालेल्या स्वयंसेवकांना अन्य काम सांगण्यास हरकत वाटली नाही. पण अन्य कोणी स्वयंसेवक कार्यात येताच त्याला अन्य काही सांगणे योग्य मानले गेले नाही. संघटनेच्या स्थापनेनंतर जवळजवळ ३० वर्षांनी हे अमलात आणले गेले.

पहिल्या बंदीकाळात १९४८ साली विद्यमान वृत्तपत्रांनी संघाची माहिती, सत्याग्रह, अन्य उपक्रम यांची माहिती देण्याचे टाळून वृत्तपत्रकर्त्यांच्या कर्तव्याकडे दुर्लक्षच केले. त्यामुळे पहिली बंदी उठताच संघातील अनेक कार्यकर्त्यांनी वृत्तपत्र हवे असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याप्रमाणे काहींनी पुढे येऊन विनामोबदला काही काळ काम करण्याचे मान्य केले. राज्याराज्यातून दैनिके, मासिके, साप्ताहिके सुरू करण्यात आली. आज देशभर संघकार्याला अग्रस्थान देणारी वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके निघू शकली आहेत व उत्तम रीतीने चालू आहेत. ५० वर्षांतील या बाबतीतील अनुभव अत्यंत प्रेरणादायी

आहे. "हिंदुस्थान समाचार" ही वृत्तसंस्था बातम्या देशहिताच्या कल्पनेने देण्यासाठी काढण्यात आली.

योगशास्त्राची इष्ट प्रगती

१९३४ ते १९६६ पर्यंत योगदृष्ट्या कैवल्यधाम, (लोणावळा) चे संस्थापक स्वामी कुवलयानंद योगशास्त्रातील सर्व प्रकारच्या क्रियांना वैज्ञानिक कसोट्या लावून मानवी शरीराला व मनाला होणारा उपयोग सर्व जगासमोर "योग-मीमांसा" या त्रैमासिकाद्वारे मांडत होते. १९६६ मध्ये स्वामी कुवलयानंदांचे महानिर्वाण झाले. तेथपर्यंत जगातील सुमारे ४८ देशात भारतीय योगशास्त्राबद्दल अत्यंत अनुकूल मत होऊ लागले होते. स्वामीजींच्या समोर अमेरिका, झेकोस्लाविया, फ्रान्स, जपान यासारख्या देशातून योगाभ्यास शिकण्यासाठी लोक येऊन गेले होते. १९६६ नंतरही कैवल्यधामातील ते कार्य चालूच होते. अनेक प्रकारच्या इलेक्ट्रिकच्या साधनांमुळे देशोदेशी रेडिओ, टी. व्ही. यांच्या माध्यमातून योगाचे लोकशिक्षण सुरू झाले होते. पू. स्वामी कुवलयानंदांचे कार्य पं. जवाहरलाल नेहरू, छोट्या इंदिरा गांधी, वल्लभभाई यांसारख्यांनी

तीन तत्त्वे

हिंदुस्थान हिंदूंचा, भगवाध्वज हाच गुरू व एकचालकानुवर्तीत्व या तीन तत्त्वांवर श्रद्धा व निष्ठा ठेवल्यामुळे कार्य करता येते, कार्य पुढे जाते, पुढचा मार्ग दिसू लागतो हा माझा अनुभव आहे. त्यामुळे प्रत्येक गावी संघाची शाखा, व्यक्तीनिरपेक्ष अशी कार्याची जोपासना आणि कोणत्याही कार्यकर्त्याशी वा संघ-बंधूशी जवळकीचे नाते व गुणग्राहकता प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त अशीच ही तत्त्वे असल्याचे प्रत्ययास आलेले आहे. त्याचा व्यावहारिक व व्यवहार्य उपयोग फारच मोठा आहे. कार्यातील लोककल्याणकारी व विचारशील वृत्तीचा तो उपयोग जाणू शकते.

पाहिले होते. त्यांना ते आवडले होते. पण भारतात ते लोकप्रिय करण्यासाठी मात्र भारत सरकार किंवा अगोदरच्या इंग्रजी राज्यानेही प्रयत्न केला नव्हता. स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारी यांनी मात्र पं. जवाहरलाल वगैरेंना योगाभ्यास शिकवून मर्जी संपादन केली. विश्वायतन आश्रम हा भला मोठा योगाश्रम दिल्लीत स्थापन झाला. भारतात आठही दिशांना अनेक योगाश्रम, योग संस्था निर्माण झाल्या व योगशिक्षणाच्या अनेक सोयी निरनिराळ्या ठिकाणी उपलब्ध झालेल्या आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातही पूज्य जनार्दनस्वामी यांच्या योजनेनुसार सर्व शाखांवरून आसनांचा अभ्यास गेल्या १०–१५ वर्षांपासून चालू झाला आहे. २५ – ३० वर्षांपूर्वीपेक्षा आज प्रकृतिस्वास्थ्यासाठी योगशास्त्रातील आसने, प्राणायाम यांचा अधिक चांगला उपयोग होतो असे दिसून आल्यामुळे योगासने – प्राणायम करण्याकडे ओढा वाढत्या प्रमाणात दिसून येतो.

स्वामी महेश योगी यांनी जगभर भावातीत ध्यानाचा परिपाठ सुपरिचित करून दिला व त्याचे सुपरिणाम लोकांच्या नजरेसमोर ठेवले आहेत.

योगशास्त्राची गेल्या २५ – ३० वर्षांतील वाटचाल चांगली व प्रगतिपर आहे. गरजा अगदी थोड्या प्रमाणात भागू लागल्या. भारतीयांनी योगाभ्यास – एक राष्ट्रीय सवय म्हणून एक जागा घेतली तर त्या त्या व्यक्तीचे व देशातील त्या त्या भूभागाचे उत्तम रक्षण होईल. असे होईल तेव्हा होवो पण १९३३ सालापेक्षा बऱ्याच जास्त प्रमाणात देशात योगाभ्यास सुरू झालेला आहे. हे चांगले लक्षण आहे. असा हा योगाभ्यास नवीन भारतात पसरू दे, वाढू दे, हीच इच्छा ! स्वतंत्र भारतात सरकारतर्फे मात्र योगाच्या प्रचारासाठी १९८३ पर्यंत तरी विशेष काही केले गेलेले आढळत नाही.

व्यायाम क्षेत्रात पूर्वीचे अनेक कुस्ती आखाडे बंद पडलेले आढळतात. व्यायामाची आवड वा प्रेम सुद्धा कमी पडले आहे असे आढळते. स्त्रैण व लंपटपणा वाढला आहे असे दिसते. याला कारण बोलपट, टी. व्ही. यावरील कार्यक्रम. मनाच्या चंचलतेलाच उत्तेजन देताना ते आढळतात. चांगल्या सत्प्रवृत्तिपर विषयापेक्षा असत् प्रवृत्तीच्या गोष्टींवरच भर दिला जातो.

गेल्या १५–२० वर्षांपासून नियमित लॉटरीचा व्यवहार भारताच्या प्रत्येक राज्यात फारच वाढला आहे व परिश्रमाशिवाय फुकट मिळणारा पैसा लोकांना निष्क्रीय बनवीत आहे.

औद्योगिक क्षेत्रात या ५० वर्षांत भारतात फारच प्रगती दिसून येते. शहरे, गावे, स्वतंत्र वा सहकारी पद्धतीने अनेक उत्पादक व कारखाने निर्माण झाले आहेत. त्यात सर्व प्रकार आहेत.

विजेचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढून हजारो खेड्यांचे जीवन पूर्ण बदलले आहे.

रेडिओ १९३३ मध्ये नव्हताच. पण १९४० ते १९५० च्या दरम्यान सुरू होऊन त्यापुढे दूरदर्शन (टेलीव्हिजन) देखील गेल्या १० – ११ वर्षांत बहरून आले आहे. त्यावरील कार्यक्रम सत् भावनेपेक्षा हीन भावनांनाच उत्तेजन देणारे आहेत.

५० वर्षांतील वेगाने बदललेल्या या जीवनक्रमाचे परिणाम असे दिसले की इंग्रजी राज्यापेक्षाही सामान्य लोक फार बिथरले. सुखसोयी प्राप्त करून घेण्याची इच्छा तीव्रतेने वाढू लागली. टेलीव्हिजनमुळे अनेकांचे दिनक्रम बदलले. प्रवृत्ती पण बदलली.

खेळ. स्पर्धा, देशोदेशींचे संबंध यामध्ये बरीच वाढ झाल्याचे अनुभवास येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कारक्षम कार्यक्रम बदलले नसले तरी तळजाई शिबिरासारख्या संघकार्यात अग्रगण्य कार्यक्रमांत अशा आधुनिक विज्ञान प्रगतीचा भरपूर उपयोग करणे इष्ट ठरले.

सिनेमा, बोलपट, नाटके, संगीत यात पुष्कळ फरक पडला. जुने नट, गायक आज नाहीत. स्त्रियांची कामे स्त्रिया करू लागल्या. आता पुरुषाने स्त्रीचे काम करू नये अशी स्थिती उत्पन्न झाली आहे. भारतीय संगीताचे पाऊल बरेच पुढे पडले आहे. भारतात सवाई गंधर्व महोत्सवाप्रमाणे अनेक संगीत महोत्सव देशात होत आले आहेत. गेली २५ हून अधिक वर्षे पं. भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, पं. जसराज, कै. वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा यांसारख्या गायकांनी आपापल्या शैलीने भारतीय संगीताचा स्तर उंचावला. २४ तास – ८ प्रहरांवर पसरलेले भारतीय संगीत त्या त्या प्रहरात ऐकावे अशी इच्छा वाढली आहे. नुकताच ऑगष्ट ८३ मध्ये स्वरकिन्नरी किशोरी आमोणकर यांचा एक गाण्यांचा कार्यक्रम तीन दिवस वेगवेगळ्या प्रहरात झाला. तो ऐकण्यास तिन्ही वेळी भरगच्च श्रोते स्त्रीपुरुष होते. तीन ते पाच दिवसांचा आठ प्रहरांच्या राग-दारीचा कार्यक्रम झाला तर श्रोते येतील — रसभराने ऐकतील. यापुढची एक

स्थिती माझ्या मनात डोकावते की जर भारतीय रागदारी समयानुकूल परिणामकारी पद्धतीने गाण्याची गवयांनी पद्धत स्वीकारली तर स्त्रीपुरुषांच्या आरोग्याला होणारा फायदाही लोकांच्या लक्षात येऊ लागेल. पण तो काळ थोडा दूर आहे असे वाटते. भारतीय संगीताचा आठ प्रहरावरील विस्तार ही अजोड गोष्ट आहे व ती घडतच जावी.

देशातील झोपडपट्ट्या, मागास क्षेत्रातील, तसेच वनवासी क्षेत्रातील भारतीय जनतेकडे लक्ष देऊन त्यांचे जीवनमान सुधारणे, त्यांच्या सवयी बदलविणे याबाबत संघाचे अनेक कार्यकर्ते प्रयत्नशील झाले आहेत. दिल्ली येथे १९८१ मध्ये जवळ जवळ ७०० वा अधिक लोकांचा मेळावा ९० वा अधिक ठिकाणाहूनचा असे ३ दिवस भरला होता. भारत हा हिंदूंचा देश. त्या देशात अडाणी, मागासलेले असे म्हणविले जाणारे लोकांमध्ये सुधारणा करणे आपलेच काम आहे असे मानणारे स्त्रीपुरुष अधिक संख्येने पुढे येऊ लागतील अशीच विद्यमान संघ कार्यकर्त्यांची जबर आशा आहे.

संघाच्या कार्यात संघाच्या शाखांमधून शिशू (६-७ वर्षांपासूनचे), बाल, तरुण, मध्यम, प्रौढ, वृद्ध या सर्वांचा समावेश असतो. सर्वांना संघकार्यक्रमांतून सर्व प्रकारचे संस्कार प्राप्त होतात. आपापल्या जीवनाकडे सज्जनता व समर्पण भावना याद्वारे पाहण्याची सूचना मिळत असते. त्यात कमतरता येऊ न देणे ह्यासाठी नवीन नवीन येणाऱ्या शिशूंसाठी शारीरिक, बौद्धिक, समतेचे, सहलीचे, उत्सवांचे, हिवाळी शिबिरांचे कार्यक्रम सतत घेतले जावे लागतात. कोठल्याही क्षेत्रात देशसेवेच्या बुद्धीने जाणाऱ्या स्वयंसेवकांना नैतिक बळ कधी कमी पडू नये यासाठी शाखा कार्यक्रम आवश्यकच असतात. १९५२ मध्ये भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यावर अनेकांनी संघाची आता गरज नाही असे म्हटले पण हिंदू समाजाच्या एकात्मतेचे ध्येय गाठण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाचे मनावर संस्कार करण्यासाठी संघाचे कार्य सतत चालावे लागेल. प्रत्येक लहानमोठ्या गावात संघाची शाखा कार्यक्षमतेने चालली पाहिजे. होऊन गेलेल्या, होत असणाऱ्या, प्रत्यक्ष कार्यात अग्रेसर असणाऱ्यांसाठी, पुढील काळात ज्यांना यावयाचे आहे त्यांच्यासाठी संघाचे कार्यक्रम, नियमित, परिमित वेळ चालूच राहिले पाहिजेत. हे किती दिवस

चालणार असा प्रश्न कोणीच विचारण्याचे कारण नाही. पू. गुरुजींनी संघ-शाखेला "राष्ट्रजीवन" म्हटले व हे राष्ट्रजीवन सर्वांनी—परिवारातील सर्वांनी पुष्ट केले पाहिजे असे म्हटले आहे. ते अगदी खरे आहे. प्रत्येक माणसाचे मन सदैव ध्येयनिष्ठ राहावे यासाठी रोजची शाखा, कार्यक्रम, प्रार्थना हे नेहमीच पाहिजे.

१९७७ नंतर सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस यांनी प्रगट निवेदनात अनेक वेळा हिंदू जीवनाची एक महत्त्वपूर्ण बाजू सर्वांसमोर मांडली आहे त्याचा विचार विचारवंत म्हणविणाऱ्या भारतीयांनी केला पाहिजे. भारतातील ख्रिश्चन व मुसलमान हे धर्मान्तर कल्पनेने आपापली संख्या वाढवू इच्छितात पण पाकिस्तान देते वेळी उत्पन्न झालेली स्थिती उत्पन्न होऊन हिंदू अल्पसंख्यांक झाले तर या देशाचे लोकशाही जीवन स्थिर राहील का? कोणताही मुस्लीम देश आज लोकशाहीचा अजूनपर्यंत स्वीकार करू शकलेला नाही. अशा वेळी हिंदूंच्या संख्येत एकाही हिंदूला धर्मान्तर करता येणार नाही अशी स्थिती आज प्रत्येकासमोर आली पाहिजे. हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न पू. सरसंघचालकांनी सर्वांसमोर मांडला आहे.

तीन साधने

प्रामाणिकपणा, निःस्वार्थबुद्धी व तनमनधन ह्या तीन गोष्टी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य ध्येयपूर्तीपर्यंत नेण्यासाठी 'प्रत्येकासाठी' साधन म्हणून आहेत. ह्या साधनांची प्राप्ती संघाच्या दैनंदिन शाखेमुळे कोणालाही होऊ शकते. ह्या तीन साधनांची अखंड उपयुक्तता समाधान देणारीच ठरते. कार्यकर्त्या स्वयंसेवकाला त्याचा उपयोग अत्यंत महत्त्वाचा वाटतो व त्या मार्गानेच तो पुढे जात असतो. दैनंदिन शाखेपासून कोणत्याही कारणास्तव लांब राहिल्यास ही तीन साधने निःप्रभ वाटू लागतात. ते अधःपतनच मानावे लागते. हा माझा अनुभव आहे.

परकीय अंमलाचे परिणाम व चिन्हे

इसवी सनाच्या बाराव्या शतकात मुसलमानांचा प्रवेश अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीने झाला. असंघटित व दुबळ्या हिंदू समाजघटकांनी पूर्ण सहिष्णु वृत्तीने जुल्मम–जबाबदस्ती यांचा स्वीकार कसातरी केला. हिंदू स्त्री-पुरुषांचे धर्मान्तर हा मुसलमानी जीवनाचा फार भयानक प्रकार १९८३ पर्यंतही अनुभवावा लागत आहे.

प्रत्यक्ष मुसलमानी राज्य व सत्ता उत्तर हिंदुस्थानात तरी सतराव्या–अठराव्या शतकापर्यंत होती. ती १८१८ मधील इंग्रजी राज्यापर्यंत तरी होतीच. १८१८ ते १९४७ एवढा काळ इंग्रजी सत्ता राहिली व त्यांनी मनोबल व स्वाभिमान कमी व्हावा असे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयोगामुळे सत्याचा विसर पडण्यात सुबुद्ध लोकांवरही परिणाम घडून आला. एकेका अमलामध्ये, विशेषतः मुसलमानी अमलामध्ये गावांची नावे बदलणे, देवालयांच्या मशिदी बनविणे, धर्मान्तर करण्यात सर्व मार्गांचा अवलंब करणे हे घडले आहे.

इंग्रजी राज्याच्या काळात ख्रिश्चन धर्माच्या धर्मोपदेशकांना सहाय्य, सवलती मिळू शकल्या व त्यांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चर्च व येशू ख्रिस्त यांचा पगडा हिंदुस्थानात राहणाऱ्या कोणावरही, पण तो सेवाभावाने वागून पाडण्याचा प्रयत्न केला.

भारतात इंग्रज आले, त्याच काळात फ्रेंच व पोर्तुगीज लोकही आले. त्यांनी पाँडीचेरी व गोवा येथे आपापले तळ ठोकले.

या चारही आक्रमकांनी ताब्यात घेतलेल्या प्रदेशात पुतळे उभारले, हिंदू मंदिरे भ्रष्ट केली. गावांची नावे बदलली. पाँडीचेरी, गोवा येथील रस्त्यांना आपापल्या संस्कृतीतील नावे दिली.

१९४७ साली दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या वातावरणात इंग्रजांनी भारताचे राज्य सोडण्याचे ठरविले. त्या वेळी मुसलमानी आक्रमणांचे झालेले परिणाम म्हणजे मुस्लीम संख्येची बहुमतश्रेणी लक्षात घेऊन पाकिस्तान या नावाने देशाचे विभाजन—सिंध, पंजाब व बंगाल यांमध्ये मुसलमानांची संख्या पाहून तो भाग पाकिस्तान म्हणून देऊन राहिलेला हिंदुस्थान प्रजासत्ताक करण्यात आला.

१९४८ मधील या प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर भारतातील इंग्रजी पुरुषांचे पुतळे, रस्त्यांची नावे बदलण्यात आली. फार सावकाश परंतु बदलली. इंग्रजी उच्चाराला सोयीची किरकी, पूना, धुलीया इत्यादी नावे सरळ मराठी खडकी पुणे, धुळे इ. अशी नावे ठेवली. प्रिन्स ऑफ वेल्सचा पुणे स्टेशनसमोरचा पुतळा काढून तेथे म. गांधींचा पुतळा बसविला, यासारखी काही अपमान-शल्ये दूर झाली आहेत.

परंतु अजूनही किती तरी प्रमाणात इंग्रज, मुसलमान, फ्रेंच, पोर्तुगीज यांची पदचिन्हे या हिंदूंच्या भारतभूमीवर शिल्लक आहेत. स्वाभिमानी भारतीय मनाला केवळ दुःख होते की, हिंदू मंदिरांची झालेली धूळधाण आता दुरुस्त होऊ नये? गोवा पाँडीचेरी येथील रस्त्यांना अजून परकीय नावे असावीत?

आम्ही या देशाचे आज स्वामी झालो, यापुढे हा परक्यांच्या ताब्यात न जावा म्हणून आम्ही शक्तिशाली राहू यासाठी सर्व परकीय पदचिन्हे सरकारी पद्धतीने पण निश्चयपूर्वक दूर केली पाहिजेत.

मी १९३३ साली स्वयंसेवक झालो. अगदी बाजी लावून मनापासून काम केले. फार समाधान वाटले. आता ५० वर्षांनंतर माझ्याबद्दल कोणी काही म्हटले, दोष दिला, मला विसरले तरी मला त्याचा कसलाही विषाद वाटण्याचे कारण नाही. आजपर्यंत माझा उपयोग झाला, यापुढे न झाला तरी मला त्याबद्दल काहीच वाटण्याचे कारण नाही. संघाने दिलेली संधी व जीवनदृष्टी फार फार उच्च स्तरावरची आहे. स्वयंसेवकांनी प्रगट केलेली ध्येयनिष्ठा, समर्पणवृत्ती, कार्यप्रेम अजोड आहे. परमेश्वर त्याला भरघोस यश देणार यात यत्किंचित संशय मला वाटत नाही.

माझ्या या निवेदनानुसार माझी ५० वर्षे संघात मी कशी घालविली हे हे वाचून पाहावे, एवढीच प्रत्येक वाचकांस नम्रपणे विनंती करीत आहे.

विजयादशमी, शके १९०५ **वसंत देवकुळे**
१६-१०-१९८३.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील माझी ५० वर्षे

१९३३ ते १९४३

२४ डिसेंबर १९३३ या दिवशी माझ्या विसाव्या वर्षी मी पुण्यातील जुन्या टिळक स्मारक मंदिराजवळच्या मोकळ्या जागेत चालणाऱ्या पुण्यातील पहिल्याच शाखेत उपस्थित झालो. तेव्हापासून अनेक प्रसंग, स्थित्यंतरे अनुभवूनही आज माझी संघकार्याबद्दलची भावना, निष्ठा व प्रेम पहिल्या पंधरा दिवसाइतकेच ताजे व कसदार आहे. याचा अभिमानपूर्वक उल्लेख सुरुवातीसच करावासा वाटतो.

माझी संघातील ५० वर्षे खरोखरच अत्यंत तेजस्वी व कर्तव्यदक्षतेतच गेली आहेत. माणसांचे स्वभाव अगम्य व बदलण्यास कठीणच असतात. तथापि संघ हा माणसांचा व्यवहार म्हणून त्याकडे पाहिल्यास संघात आलेली, संघ समजून घेऊन वागणारी मंडळी पाहता, माणसांचे स्वभाव – प्रवृत्ती बदलण्याची एक किमया म्हणून संघाकडे पाहावेच लागेल.

योगायोग की, १९३३ मध्येच स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेले जोसेफ मॅझिनी यांचे चरित्र वाचल्यानंतर आपण देशात संघटना केली पाहिजे असा दृढ ग्रह होऊन त्याप्रमाणे काही मित्रांसह एस्. पी. कॉलेजच्या मैदानावर निवडुंगाच्या झाडाजवळ कोपऱ्यात बसून आमचा विचार-विनिमय सुरू झाला. श्री. नगरकर नावाचे एक कम्युनिस्ट मताचे मित्रही आमच्यात बसू लागले. मे, जूनपासून दर आठवड्यास त्या ठरलेल्या ठिकाणी जमून संघटना करण्याचे मनसुबे आम्ही मनात करू लागलो. पक्ष, तत्वज्ञान यापैकी कशाचा विचार न करता देशासाठी त्यागाची तयारी करणे एवढाच विचार आम्ही केला.

या तरुणांचे विचार चालूच होते. त्यावेळी टिळक स्मारक मंदिराच्या जुन्या जागेत मालक जगन्नाथ महाराज पंडित यांच्या परवानगीने जून १९३३ पासून संघाची शाखा सुरू झाली होती. नागपूरचे दोन स्वयंसेवक श्री. भगवंत केशव घुई व नारायण वामन गिरडकर हे ज्यु. बी. ए. च्या वर्गात कॉलेजात दाखल

झाले होते व त्या दोघांनी टिळक स्मारक मंदिराच्या जागेत पुण्यातील पहिली शाखा सुरू केली. श्री. भगवंत धुई हे माझ्या मोठ्या बहिणीचे पुतणे होते.

त्या अगोदर १९३२ साली मार्च-एप्रिलच्या सुमारास पू. डॉ. हेडगेवार वं. बाबाराव सावरकर यांच्याबरोबर महाराष्ट्र-भेटीस निघाले होते. पुण्यात येऊन कै. भाऊसाहेब देशमुख वकील-चालक : टिळक बालचर पथक-यांच्या घरी २०-२५ लोकांची बैठक झाली होती व तेथे ५-६ लोकांना प्रतिज्ञा देण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर डॉक्टर हेडगेवार व बाबाराव सावरकर सातारा, सांगली, कोल्हापूर येथे जाऊन त्यांनी संघाच्या शाखांची स्थापना केली – म्हणजे काही प्रतिज्ञा देण्याची व्यवस्था केली. सुमारे ८-१० गावांच्या भेटीत निर्माण झालेले संबंध सांगलीमध्ये विशेषत्वाने स्थिर झाले होते. कै. मा. काशीनाथ भास्कर लिमये हे शिक्षक व कडक शिस्तीचे भोक्ते होते. पू. डॉक्टर हेडगेवार

वैयक्तिक स्वीकृती

संघकार्य अगदी घरगुती पद्धतीने म्हणजे आत्मीयतेच्या भावनेतून केले जाते. पुण्यातील दोन ठळक उदाहरणे देण्याची इच्छा अनावर होते. १९४५ पासून पुणे शहरातील ९० शाखांच्या व्यवहारांपासून प्रांतांपर्यंतच्या संघाच्या मालमत्तेची व्यवस्था, पैशांचे हिशोब, कार्यकर्त्यांच्या गरजा, माननीय अधिकाऱ्यांचे संबंध सतत ४० हून अधिक वर्षे समाधानपूर्वक जपणारे, संभाळणारे परममित्र बाळासाहेब वझे यांचा उल्लेख केलाच पाहिजे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन फार तोलामोलाने करावे लागेल. दुसरे संघबंधू पण माझ्या पाठीलापाठ लावून आलेले बंधू अनंतराव देवकुळे. त्यांनी प्रल्हादपथकाला संघात विलीन केले. आदर्श बालशाखा चालविली होती. हवेली तालुका व प्रांतकार्यात मा. बाबाराव भिडे यांना दीर्घकाल मोठी साथ दिली अन् त्यानंतर जनसंपर्काचा प्रांतांतील मंडलनिहाय केलेला उद्योग अजोड आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने पण प्रांतांतील सर्व १८ जिल्ह्यांतील तालुकावार मंडलातील कार्य उभे राहावे यासाठी गेली १५ वा अधिक वर्षे सतत प्रांतपर्यटण चालू आहे. तो अजब नमुना आहे. त्याचे अनुकरण मलाही कठीण वाटते.

यांच्या पहिल्या भेटीतच त्यांनी एका कार्यकर्त्याची मागणी केली तेव्हा श्री. गोपाळराव एरकुंटवार नावाचे नागपूरचे एक स्वयंसेवक सांगली येथे शाखा सुरू करून चालविण्यास आले व ते सुमारे ३–४ वर्षे सांगली येथे होते. महाराष्ट्रातील पहिली शाखा सांगली येथे अशा तऱ्हेने सुरू झाली व मा. काशीनाथपंत लिमये हे पहिले स्थानिक व नंतर प्रांत संघचालक झाले.

पुण्यातील पू. डॉक्टर हेडगेवार यांच्या भेटीमध्ये प्रतिज्ञा घेतलेल्या मंडळीत मा. भाऊसाहेब (वि. मा.) देशमुख, स. ह. चिंचाळकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव अशी मंडळी होती. पुण्यात नंतर नागपूरचे न. ग. जोशी यांनी ५–६ महिने लाठीचा वर्ग टिळक स्मारक मंदिरात चालविला. सप्टेंबर ३२ मध्ये तो बंद झाला. या वर्गात भाऊराव (रामकृष्ण नारायण) लोंढे, गं. स. परांजपे हे होते. त्यांच्या भेटी नंतरही झाल्या. पण पुण्याला संघशाखा अशी मात्र १९३३ च्या जून महिन्यात सुरू झाली. श्री. रा. ना. उर्फ भाऊराव लोंढे आजही शाखेत जात आहेत.

श्री. भगवंत धुई हे माझ्या नात्याचे असल्याने आमच्या घरी नेहमी येत व संघशाखेतील गोष्टी सांगत. मी फक्त ते ऐकून सोडून देत असे.

आमचे घराणे वगैरेच्या दृष्टीने आम्ही खेडकडूस (पुणे जिल्हा) इकडचे, पण आमचे पणजोबा नानासाहेब (नारायण भाऊ) देवकुळे वाई (सातारा) कडे राहावयास व शेती-सावकारी करण्यासाठी गेले. वाईमध्ये पेशवाईच्या काळातच देवकुळे यांची बरीच घरे होती.

पुण्यातील वासुदेव गणेश जोशी (धोमकडील) हे माझे आजोबा. आईचे वडील. त्यांच्या घरीच माझा जन्म, शिक्षण वगैरे झाले. माझे आजोबा कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या संबंधामुळे चित्रशाळा प्रेसमध्ये काम करू लागले अन् पुण्याच्या जीवनात ते समरस झाले. लोकमान्य टिळक, बाळूकाका कानिटकर, सेनापती बापट, तात्यासाहेब केळकर, तात्याराव सावरकर इत्यादी मंडळींच्या सहवासात त्यांचे जीवन सुरू झाले. चित्रशाळा प्रेसमध्ये लियोग्राफीच्या कामातून टाईप जुळणी व छपाईची कामे सुरू झाली. १९१० मध्ये 'चित्रमयजगत्' नावाचे मासिक सुरू केल्यामुळे माझ्या आजोबांना सार्वजनिक जीवनात रस घ्यावासा वाटू लागला. कृ. प्र. खाडीलकर, 'काळ'-कर्ते परांजपे यांसारख्या जहाल मंडळींबरोबरही त्यांचा संबंध आला. खाडीलकरांना नेपाळला पाठविणे, छत्रे सर्कसबरोबर चीनमध्ये जाऊन राणीला

हत्ती भेट देणे वगैरेसारख्या देशस्तरावरील गोष्टी करता करता १९२० नंतर म. गांधींच्या राजकारणात त्यांनी प्रवेश केला. काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात १९२४ च्या बेळगाव काँग्रेसपासून सुरुवात करून १९३० च्या कायदेभंग चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता.

माझ्या संघाच्या कार्यातील हालचालींची कल्पना येऊन ते मला एकदाच म्हणाले, "अरे, आम्ही गुप्त कामे करायला नालायक ठरलो, त्यामुळे म. गांधींच्या मार्गाने जावे असे आम्ही ठरविले." मी फक्त एवढेच उत्तर दिले की, "आम्ही ज्या मार्गाने जात आहो, तो मार्ग देशभजबुतीचाच आहे. त्यात आम्ही यशस्वीच होऊ." ह्या माझ्या उत्तरानंतर पुन्हा आजोबा त्याबाबत काही बोलले नाहीत.

आजोबांच्या कार्यक्रमात पहाटे फिरावयास जाणे ही फार प्रमुख गोष्ट होती. ते ८० ते ८७ या वयात पहाटे २ ते ५ फिरावयास जाऊन येत. त्यांच्या भेटी म. गांधी, वल्लभभाई पटेल, मोतीलाल नेहरू, सावरकर, राजगोपालाचारी यांच्याकडे होत असत. मी २–३ वेळा त्यांच्याबरोबर गेलो होतो. १२–१–१९४४ रोजी आजोबा स्वर्गवासी झाले—वयाच्या ९१ व्या वर्षी!

ऑक्टोबर १९३३ मध्ये नागपुराहून पू. डॉक्टरांच्या आदेशान्वये श्रेष्ठ प्रचारक दादाराव परमार्थ हे पुणे व महाराष्ट्र या क्षेत्रातील संघकार्यासाठी आले व त्यांचे आमच्या घरी येणे–जाणे सुरू झाले. ते आले म्हणजे अर्धा-एकतास ते अनेक गोष्टी सांगत. त्यातल्या त्यात मुसलमानांची हिंदू समाजावरची आक्रमणे, हिंदूंची संघटना नसल्याने होतात असे त्यांचे प्रतिपादन असे. साथीसाथ ते आमच्या कौटुंबिक जीवनाबद्दलही बोलत. विशेषतः नातेवाईक मंडळींची नाती संघकार्यामुळे, संबंधांमुळे कशी मजबूत होतात ते त्यांच्या शैलीने सांगत असत. भगवंत घुई याचा माझा संबंध कसा दृढमूल होईल याचेही विवेचन ते करीत.

मी त्या वेळी महाराष्ट्रीय मंडळात व्यायाम, कुस्ती याचे संदर्भात बराच गुंतलो होतो. माझी कुस्तीतील प्रगती लक्षणीय होती व १९३२ मध्ये मी कराडच्या कै. वा. ब. गोगटे यांच्या परिचयाच्या पेंढारकर नावाच्या कुस्तीगीराला २८ मिनिटांच्या झटापटीनंतर टांगेवरील तोड करून चीतपट केला होता व गदा मिळविली होती. त्यामुळे फर्ग्युसन कॉलेजात माझे नाव थोडे मोठे झाले होते. अशा स्थितीत दादाराव परमार्थ यांचे बोलणे; समजावणे,

माझ्या डोक्यावरूनच जात असे. आमच्या संघटना करण्याच्या मित्रमंडळींची बैठक नियमित चालू होती. त्या बैठकीला नागपूरच्या दुकलीपैकी श्री. नारायणराव गिरडकर हे स्वयंसेवक २–४ वेळा आले होते व संघटना हा या कलियुगाचा मंत्रच आहे असे सांगून पटवून, संघटनेसमोर काही ध्येय व काही कार्यक्रम असावे लागतात असेही पटविले. यामुळे आम्हा मित्रमंडळींत थोडी चलबिचल सुरू झाली.

श्री. दादाराव परमार्थ यांचे १–२ दिवसांआड आमच्या घरी चहापान होई व त्या वेळी त्यांच्या प्रवचनाचा परिणाम मनावर होतच होता व १९३३ मधील नाताळच्या सुटीत संघाच्या शाखेत जाऊन पाहावे असा विचार मनात डोकावू लागला.

दि. २४ डिसेंबर १९३३ या दिवशी मान्यवर दादाराव परमार्थ यांच्याबरोबरच शाखेवर गेलो. सर्व कार्यक्रम पाहिला.

नमो मातृभूमि जिथे जन्मलो मी ।
नमो आर्यभूमि जिथे वाढलो मी ॥
नमो पुण्यभूमि जियेच्याच कामी ।
पडो देह माझा सदा ती नमी मी ॥

हे गुरो श्री रामदूता । शील हम को दीजिए ।
शीघ्र सारे सद्गुणों से । पूर्ण हिंदू कीजिए ।
लीजिए हमको शरण में । रामपंथी हम बने ।
ब्रह्मचारी, धर्मरक्षक । वीरव्रतधारी बने ।

राष्ट्रगुरु श्री समर्थ रामदास स्वामी महाराज की जय ।

भारत माता की जय ।

याप्रमाणे मी प्रार्थना केली. संघशाखा संपवून घरी गेलो तरी संघशाखेवरच्या एकंदर कार्यक्रमामुळे मन उल्हसित झाले होते, ताजेतवाने झाले होते. मनातील संघटना करण्याच्या विचाराला पोषक व सत्प्रेरक कार्यक्रम पाहून मन अधिक विचारमग्न झाले. पुढे २–४ दिवस कसेतरी गेले. नंतर सहज वाचनात दासबोध आला व समाजातील 'नव्यारिती'चा परिणाम कसा व्हावा, कसा

वाढावा याबद्दलचा उहापोह वाचनात आला. संघस्थानावर पुन्हा गेल्यावर त्या दिवशी निरनिराळ्या स्वयंसेवकांना स्वतःचे विचार सांगण्याचा आदेश मिळाला. माझी पाळी आली तेव्हा दासबोधाचा उल्लेख करून संघाच्या नव्या रीतीचे मी मनःपूर्वक स्वागत केले. मला संघ फार आवडल्याचे सांगितले व मी शाखेत जाऊ लागलो. सर्व नियम समजावून घेतले व त्या नियमाबरहुकूम मला फार आनंद व उत्साह वाटू लागला. मान्यवर दादाराव परमार्थ यांचे बोलणे दररोज शाखेवर ऐकावयास मिळे. संघशाखेवरील १ तासभराच्या कार्यक्रमात जे चांगले झालें असेल त्याबद्दल भलावणी व चुकले असेल, बिघडले असेल त्याची जाणीव करून देण्यात दादाराव अजिबात टाळाटाळ करीत नसत. ते मला फार आवडे.

मी महाराष्ट्रीय मंडळात रोज सकाळी जाई व संध्याकाळी संघशाखेवर जात असे. मा. दादाराव यांच्या भेटीगाठी, बोलणे, संघाच्या कार्याच्या वाढीबद्दलचे विचार दादाराव नेहमीच बोलत असत.

संघकार्याचे चिरंतन स्वरूप

हे संघकार्य किती दिवस चालणार अशी भारतात अनेकांची पृच्छा असते. माझी ५० वर्षे अशा प्रश्नांची उत्तरे देण्यातच गेली आहेत. या हिंदूभूमीला तिच्या विस्ताराच्या मानाने प्रत्येकाला धर्म संस्कृती, समाज यांचेसंबंधी निःस्वार्थबुद्धीचे व प्रामाणिक मार्गदर्शन सतत हवे असते. हे मिळाले पाहिजे हाच संघाचा आग्रह आहे. नवीन बालके जन्म घेतात त्यांना जीवनात संरक्षक व वर्धकही भूमिका हवी असते. राजसत्तेलाही प्रामाणिक मार्गदर्शन हवे असते. यासाठी संघकार्य संघशाखांच्या रूपाने इष्ट, योग्य, शुद्ध संस्कार करीत प्रत्येक गावी सतत चालत राहील. आजचे कार्यकर्ते वृद्ध झाले–थकले तर नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना त्यांची जागा घ्यावीच लागते. ही घटना ५० वर्षे माझ्या-समोर घडत आहे. मला त्यात समाधान आहे. कार्यातील श्रेष्ठ संकेत व उत्तम निष्कलंक परंपरा यांचा कोणीही कार्यकर्त्यांनी विसर पडू देऊ नये हीच इच्छा !

मला या काळात ओढ होती व्यायाम-कुस्ती यांची. त्यामुळे ते कार्यक्रम असले की मी शाखेवर जाऊ शकत नसे. तथापि माझ्या मनावर झालेला संघ-शाखेचा प्रभाव मात्र हळूहळू जोपासला जात होता.

पुण्यातील शाखा वाढ

१९३४ सालामध्ये शालेय वर्षाची सुरुवात झाली तेव्हाच माझ्या मनाने असे घेतले की, पुण्यातील १८ पेठांत अठरा शाखा तरी आपण काढल्या पाहिजेत.

शाखेला म्हणजे शाखा चालू करण्यासाठी निश्चयी ध्येयनिष्ठ स्वयंसेवक हवा असतो. कॉलेजमध्ये माझ्याबरोबर शंकर बाळकृष्ण जोशी (बापूराव) व बा. य. ओगले असे दोघे शाखेच्या दृष्टीने सतर्क झाले होते. त्या दोघांशी काही दिवस बोलणे करून शनिवार पेठेत (सध्याच्या मोतीबागेच्या पश्चिमेला) एक मोठे मैदान पाहून तेथे पुण्यातील दुसरी शाखा सुरू करण्याचे ठरविले.

मा. दादाराव परमार्थ यांचेशी बोललो. मा. भाऊराव देशमुख यांना सांगितले व पुण्यातील दुसरी शाखा सुरू झाली. माझ्या या जोरदार खटपटी-बद्दल मला आनंद व उत्साह वाटू लागला होता. मा. दादाराव परमार्थ यांनी नागपूरला डॉक्टर हेडगेवार यांना पत्रव्यवहारात हे लिहिले. पू. डॉक्टरांचे शाबासकी देणारे एक पत्र मला आले. त्यामध्ये असे वाक्य होते की, "तुमच्यासारखे भरंवशाचे स्वयंसेवक ज्या शाखेला लाभतात त्या शाखा निःसंशय चांगल्या व मोठ्या होतात." परममित्र बापूराव जोशी व बा. य. ओगले या दोघांनी दुसरी शाखा उत्तम रीतीने चालविली तेव्हा तिसऱ्या शाखेचा विचार करू लागलो. शुक्रवार पेठेत महाराष्ट्र क्रीडा मंडळ ही व्यायामसंस्था नातूबागेत चालू होती. आखाड्यात कुस्ती वगैरे कार्यक्रम चालत, तरी बाहेर असलेल्या लहान जागेत कधीतरी हुतूतू चाले. श्री. तात्या फडके, ओक असे त्यात असत.

दादाराव परमार्थ यांचा पुण्यात आल्यापासून हिंडणे-फिरणे, भेटीगाठी हा कार्यक्रम अत्यंत पद्धतशीर चाले. त्या वेळेस वसंत दत्तात्रय तांबे हे गुहागरचे विद्यार्थी शिकण्यासाठी पुण्यात आले अन् दादांची त्यांची गाठ पडल्यानंतर दादांनी त्यांना पूर्ण आत्मसात केले. वसंतराव तांबे (तात्या) यांनी सदाशिव पेठेत बॅ. गाडगीळ स्ट्रीटवर नातू यांच्या घरात एक खोली घेतली व तेथे

राहाणे व जेवण कोठेतरी होई. पण दादांनी आपली राहाण्याची सोय तांबे यांचेकडेच ठरविली. १९३४ मध्ये एका सुटीचे दिवशी दादांनी ५–७ लोकांना तांबे यांच्या खोलीवर बोलाविले व मटाराची उसळ करण्याची सूचना कोणीतरी पुढे मांडली. पण उसळ करण्यासाठी लागणारी एकही सोयीची वस्तू खोलीवर नव्हती. तरी पण दादांची सूचना अमलात आणण्यासाठी योजना आखण्यात आली. त्यात (१) योग्य पातेले – फोडणीच्या सर्व साहित्यांसह आणणे, (२) मटार शेंगा २ किलो (शेर), मिरच्या, कोथिंबीर, नारळ, कांदे मंडईतून आणणे, (३) तेल, मीठ, मिरची आणणे, (४) पळी, उलथने, विळी इत्यादी आणणे, (५) बशा, वाट्या, चमचे आणणे ही कामे असलेल्यापैकी पाच स्वयंसेवकांनी आपापल्या घरून आणली. तात्या तांबे पाकसिद्धीत प्रवीण होत चालले होते. त्यांच्यावर उसळ करण्याची जबाबदारी देण्यात आली. उसळ तयार होऊन १२–१३ असलेल्या सर्वांना बशांत घालून देण्यात आल्यानंतर दादाराव म्हणाले, आज पुण्यात संघ खरा सुरू झाला. या त्यांच्या म्हणण्याला फार मोठा अर्थ होता. ९–१० महिन्यातच एकत्र आलेल्या स्वयंसेवकांना जे करता आले ते संघटना वृत्तीचेच निदर्शक होते यात कोणाला शंका वाटली नाही.

ह्या तात्या तांबे यांना पुण्यातील तिसऱ्या शाखेवर–नातूबागेतील–पाठविण्याचे ठरले. म्हणजे मीच सुचविले.

शाखेच्या कार्यासाठी संघाबद्दल निष्ठावंत व कार्यक्रमांची माहिती असलेला एक स्वयंसेवक उभा राहिला तरी काय करावयाचे असते, याचा पाठ तयार करताना दादारावांनी नागपूरच्या उत्तम संघशाखांची माहिती सांगितली. (१) लहान वा मोठे शाखेचे स्थान स्वच्छ करणे व तेथे ध्वज उभा करण्याची जागा शेणसडा शिंपून, १॥ ते ३ फूट त्रिज्येचे एक वर्तुळ रांगोळी वा फक्कीने आखावे. (२) ध्वज उभा करण्यासाठी सोयीचा स्टॅण्ड व कमीत कमी ८ फुटांचा उंच दंड (लाठी). (३) स्वयंसेवकासाठी संघस्थानावर जोडे–बूट ठेवण्याची जागा. (४) ध्वजस्तंभापासून ७ पावले वा जास्त अंतरावर १ रेषा आखली जावी. (५) शाखा वेळेवर भरावी व वेळेवर सुटावी याचा काटेकोर अमल करणे. (६) शाखेवर आठवड्यातील शारीरिक, लष्करी व बौद्धिक कार्यक्रम संयमपूर्वक घेण्याचा आग्रह. अशा ५–६ गोष्टींकडे लक्ष पुरविण्याची आवश्यकता मा. दादारावांनी मनावर ठसविली होती.

पुण्यात कसबा पेठेतील आगरवाल तालमीजवळ चौथी शाखा सुरू करण्याचे ठरविण्यात आल्यावर तेथे श्री. सुधाकर होनप यांची योजना करण्यात आली.

पाचवी शाखा शनवार पेठेत हसबनीस बखळीत सुरू करताना बाळू ओगले यांना ते काम सांगण्यात आले.

पहिला ऑफिसर्स ट्रेनिंग कँप

मा. दादाराव या शाखांवरून नियमितपणे स्वयंसेवकांना उत्साह वाटेल, चेव येईल असे उत्कृष्ट बोलणे करीत असत. व्यवहार संभाळण्याचे काम मजकडे होते. १९३४ मधील पुणे संघाची घोडदौड पाहून मा. दादारावांनी दिवाळीतच पू. डॉक्टरांना लिहिले की, १९३५ मध्ये पुण्याला ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्प घ्यावा. पू. डॉक्टरांचे पत्र आले की, इतक्यात नको, जरा थांबावे. मा. दादांनी पुन्हा कळविले की, पुण्यात चांगला उत्साह आहे व येथे वर्ग-कॅम्प घेतला गेला तर कार्यास चांगले स्वरूप येईल. मग मात्र पू. डॉक्टरांनी दादारावांना होकार देऊन आमच्यासारख्या स्वयंसेवकांना जबाबदारीने वागण्याबद्दल कळविले.

मा. दादारावांना फारच आनंद झाला व त्यांनी पुण्याच्या सर्व शाखा एकत्र करून ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्प म्हणजे संघात किती महत्वाचा कार्यक्रम असतो व त्यासाठी स्वयंसेवकांनी कसे वागावे लागते हेही स्पष्ट करून सांगितले.

नागपूर शाखेने भारताची जबाबदारी घेतली आहे. पुण्याने त्यांना मदत केली पाहिजे हे सूत्र त्यांनी या निमित्ताने स्पष्ट केले. मा. दादारावांचे प्रवास सुरू झाले व त्या वेळच्या तेरा जिल्ह्यांचा पश्चिम महाराष्ट्र – प्रत्येक जिल्ह्याच्या प्रमुख गावी जाऊन भेटून १९३५ च्या एप्रिल २२ ते मे ३१ या ४० दिवसांच्या वर्गासाठी स्वयंसेवक पाठविण्याची विनंती केली. या वेळी वसंतराव तांबे खोली बदलून लोखंडे तालमीजवळच्या पंडित यांच्या दगडी बिल्डिंगमध्ये खोली घेऊन राहिले होते. मा. दादांचा पत्रव्यवहार व सर्व हालचाली या खोलीतून ठरत व होत.

मान्यवर दादाराव परमार्थ यांना मा. भाऊसाहेब देशमुख यांचेबद्दल थोडे कटू संबंध वाटत. तेव्हा दादाराव यांनी श्री. अण्णाराव लिमये, भूतपूर्व सहकार्यवाह यांचे पुण्यातील एक मित्र नरहर गोविंद तथा भाऊराव अभ्यंकर यांना

पुणे शहर उपसंघचालक असे स्थान देऊन त्यांचेकरवी १९३५ च्या वर्गाची तयारी सुरू केली. मी या सर्व गोष्टींचा समन्वय घडविण्याचे काम करीत होतो. पुण्यातील चालू झालेल्या १०–१२ शाखांवरून कार्यवाह, मुख्य शिक्षकांची योजना, गटनायक वगैरेसारख्या व्यवस्था, कार्यक्रम – १९३५ च्या ४० दिवसांच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पसाठी स्वयंसेवक निवडणे ही कामे करीत होतो.

मा. भाऊराव अभ्यंकर यांनी त्यांच्या परिचयातून वर्गासाठी जागा वैदिकाश्रम या हैद्राबाद संस्थानच्या विद्यार्थी वसतिगृहात मिळविली. तेथे असलेल्या श्री. मणीआप्पा या खाणावळ चालविणाऱ्या माणसाशी ४० दिवस जेवणाचे प्रत्येकी १९ रु. ठरविले. बॅ. सी. बी. आगरवाल यांना वर्गाचे सर्वाधिकारी योजले. १९३५ च्या वर्गाची ही तयारी चालू असताना महाराष्ट्रातील २५ गावातून ३४ व पुण्याचे २१ अशा ५५ स्वयंसेवकांचा पहिला ऑफिसर्स ट्रेनिंग कँप व्हावयाचा ठरला.

पू. डॉक्टर १८ एप्रिल १९३५ रोजी येण्याचे ठरले. त्यांचेबरोबर नागपुरातील अनुभवी असे ४ कार्यकर्ते, शिक्षक म्हणून येण्याचे मा. दादारावांनी मला सांगितले. संघबंधू गोपाळ खेडकर, वसंत ओक, गंगाधर ऊर्फ बाबा इंदूरकर व

समाजसेवेची सफलता

पू. डॉक्टर हेडगेवार अत्यंत साध्या उदाहरणांतून प्रत्येकाने आवश्यक म्हणून करावयाच्या समाजसेवेचे महत्त्व सांगत असत. एखाद्या सज्जन माणसाने आपल्या स्वतःच्या मुलाची मुंज थाटामाटाने व आतिथ्याने केली तर त्या माणसाचा सत्कार वगैरे कोणी करीत नाही. वडीलानी आपले कर्तव्य केले असेच लोक मानतात. आपल्या हिंदुसमाजाची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांच्या द्वारे जी सेवा आपण करीत आहोत वा करणार आहोत, ती सुद्धा अशीच आपल्या कर्तव्याच्या जाणीवेतूनच करणार आहोत हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. आपण केलेल्या तशा कामाबद्दल आपला सत्कार कोणीही करणार नाही व तेच योग्य होईल.

बबनराव पंडित (सिंदीचे श्रीमंत टालाटुले यांचे जावई) हे चौघे जण पहिल्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमध्ये शिक्षक म्हणून आले होते.

पू. डॉक्टर १८ एप्रिल १९३५ ला येणार होते. मी त्यांना प्रथमच पाहाणार होतो. मनात अत्यंत उत्सुकता होती; कारण त्यांच्या पत्रांनी मी भारावून गेलो होतो. १८-४-१९३५ रोजी पू. डॉक्टर कल्याणमार्गे पुण्यास वेळेवर पोचले. येताच त्यांच्या दर्शनाने परमानंद झाला. त्यांचा मुक्काम ठरल्याप्रमाणे टिळक रोडवरील डॉ. पळसुले यांच्याकडे झाला. एप्रिल दि. २२ रोजी सकाळी ५॥ वाजता स्वयंसेवकांचे चार वर्ग पाडण्यात आले. त्यांना फक्त पहिल्या वर्षाचे शिक्षणच दिले जाणार होते. मी वर्गात सामील झालो होतो. मात्र सकाळी शिबिरार्थी स्वयंसेवक व संध्याकाळी लष्करी शिक्षक असा माझा कार्यक्रम होता. महाविद्यालयीन मिलीटरी ट्रेनिंग कोर्समध्ये २ वर्षे असल्याने माझे प्लॅटून ड्रिल पूर्ण होते. या पहिल्या वर्गाच्या काळात रात्रंदिवस नागपूरच्या ४ शिक्षकाबरोबरच मी होतो. वर्गात काही कमी पडेल ते घरून आणून द्यावयाचे असा क्रम होता. उदा. कांदे, सतरंज्या इत्यादी.

सकाळी ५॥ ते ८॥ शारीरिक कार्यक्रम, नंतर न्याहारी, नंतर चर्चा, नंतर स्नान, मग जेवण, दुपारी विश्रांती, नोट्स्, नंतर बौद्धिक वर्ग व संध्याकाळी लष्करी कवायत याप्रमाणे साधारण कार्यक्रम चालत. ह्या पहिल्या वर्गाभध्ये ४० पैकी १५ दिवस पू. डॉक्टरांचे बौद्धिक वर्ग झाले. पू. डॉक्टर यांनी १८८५ च्या काँग्रेस स्थापनेपासून संघाच्या स्थापनेपर्यंतचा इतिहास सांगितला. संघ-कार्याचे विशेष प्रयोजन सांगून संघशाखांच्या वाढीवर – संघटनेच्या प्रगतीवर देशाचे सामर्थ्य कसे अवलंबून आहे हे समजावून दिले. पू. डॉक्टर १५ दिवसांनी नागपूरला जावयास निघाले. मला त्यांच्या सहवासाने फार आनंद झाला होता. ते जाणार याचा मनाला फार उपद्रव होत होता. त्यांनी पाठीवरून हात फिरवून सांगितले की, चालू द्या. वर्ग संपला. परीक्षेचा कार्यक्रम झाला होता. नागपूरच्या चारही शिक्षकांची काम करण्याची पद्धत पाहून मला उत्तम मार्गदर्शन मिळाले. एका स्वयंसेवकाच्या मार्कांचा ५ गुणांचा घोटाळा शोधण्यात २ तास घालविताना पाहून संघकार्यातील प्रामाणिक कार्यपद्धतीचा बोध झाला. शारीरिक कार्यक्रमात मला पहिला क्रमांक मिळाला होता.

पहिला दिवाळी वर्ग

१९३५ च्या या वर्गाने दादाराव यांचेप्रमाणे पुण्यातील १०–१२ कार्यकर्त्यांना अत्यंत उत्साह प्राप्त झाला. १८ शाखांचे पुण्यातील काम संभाळण्यात मला खूप लक्ष द्यावे लागे. १९३५ च्या दिवाळीमध्ये ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या धर्तीवर २३ दिवसांचा एक वर्ग आम्ही आयोजित केला व घरी झोपावयास जाण्याशिवाय बाकी सर्व वेळ एकत्र घालवीत असू. पहिल्या वर्षाचे शिक्षण २५ स्वयंसेवकांना देण्यात आले. १९३५ च्या ४० दिवसांच्या वर्गात भाग घेतलेले २१ जण निरनिराळ्या शाखांवर योजले होते. दिवाळी वर्गातील २५ जणांचा असाच उपयोग होणार होता.

मा. दादाराव या दिवाळी वर्गात ६–७ दिवस बौद्धिक वर्ग झाले व संघटनेची वाटचाल स्पष्ट स्वरूपात मांडून त्यांनी आमच्यासारख्यांच्या आशा खूप उंचावल्या होत्या. १९३५ मध्ये मा. दादाराव परमार्थ यांनी मा. विनायकराव आपटे यांना पुण्याचे कार्यवाह योजले होते.

नंतर १९३६ मध्ये मा. विनायकराव आपटे पुणे शहर संघचालक झाले. मजकडे काही अधिकार नव्हता पण जबाबदारी मात्र सर्व पुण्याच्या कार्याची मजवरच होती. भाऊ लोंढे, गोपाळराव पेंडसे, वसंत तांबे, नारायण कानडे, वामन पागे, वामन फाटक, विनायक दांडेकर, भय्या दावलभक्त (पुढे गौतम), सुधाकर होनप, राम गोडबोले, हरि देव, मधु देव, माधव काटदरे, बाळ ठकार यासारखी मंडळी कार्यकर्ती म्हणून पुढे होती. माझ्या मनात एकच विचार असे की, नागपूरकरांसारखे किंवा नागपूरला पूर्णत्वाने मदत करणारे असे पुण्याकडचे कार्य व्हावे. ही कल्पना मा. दादारावांनी अनेक पद्धतीने मनावर ठसविली होती व तो प्रभाव सतत सर्व कामात असे.

१९३५ मधील दिवाळीत घेतलेल्या २३ दिवसांच्या वर्गातील संघबंधूंची परीक्षा घेऊन प्रथम वर्ष पूर्ण झाल्याचा दाखला नोंदण्यात आला व तो नागपूरला पाठवून दिला. त्यामुळे १९३६ च्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमध्ये पुण्यातील ४० पर्यंत मंडळी दुसऱ्या वर्षाच्या शिक्षणक्रमात दाखल झाली.

मा. दादाराव परमार्थांचे प्रवास व दुसऱ्या म्हणजे १९३६ च्या वर्गाची तयारी चालू झाली होती. पुण्यातील कार्याची वाढ व प्रचार करण्याच्या योजनेनुसार प्रभात शाखांची सुरुवात १९३५ पासून शिवाजी मंदिरापासून सुरू

झाली. व्यावसाईकांना संध्याकाळच्या शाखेत येणे कठिण होई तेव्हा प्रभात शाखा हे माध्यम महत्त्वाचे ठरले. शिवाजी मंदिर प्रभात शाखेचे कार्यवाह कै. श्री. बापूराव गोरे (कापड व्यापारी) होते. त्यांनी ११० उपस्थितीची ही शाखा उत्तम तऱ्हेने सांभाळली होती.

मा. नरहर गोविंद उर्फ भाऊराव अभ्यंकर यांचे घरी दर शुक्रवारी साप्ताहिक बैठक (जोगेश्वरी बोळात) सुरू झाली. त्यामध्ये मा. भाऊराव मनापासून भाग घेत असत.

१९३५ मध्ये दसरा उत्सव विशेषत्वाने करण्याची कल्पना दादाराव परमार्थ यांनी नागपूरच्या उत्सवाची हकीकत सांगून समोर ठेवली. नागपूरला दसरा उत्सव २ वेळा मिळून होत असे. पुण्याला तसाच करावा असे माझ्याही मनाने पक्के घेतले व मी कार्यकर्त्यांच्या बैठकीत तो विषय मांडला. सर्वांना उत्साह वाटला. वास्तविक १९३४ चा पहिला दसरा उत्सव स्वा. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली अगदीच साधा साजरा केला पण १९३५ च्या ऑफिसर्स ट्रेनिंग कँपमुळे सर्व प्रकारच्या कल्पना स्फुरण पावल्या. नवमीला संध्याकाळी शस्त्रपूजन व प्रात्यक्षिके अन् दशमीला सकाळी पूर्ण गणवेष, घोष यांच्यासह संचलन ! पूर्ण गणवेषधारी सुमारे २५० स्वयंसेवक उभे राहाण्याचे काम सोपे वाटले पण घोषाचे काय ? कॉलेज विद्यार्थी संघबंधूंमध्ये हा विषय मांडताच १२५ रु. जमले. त्या वेळी नागपूरचे धुई, गिरडकर, मुंजे, अकोल्याचे शंकरराव समुद्र ह्याही मंडळींचा त्यात सहभाग होताच. चार ड्रम, तीन ब्युगल व टिळक बालचर पथकाची सामग्री यासह घोष तयार झाला. स्व. आप्पा पेंडसे घोषाचे प्रमुख होते. त्यांनीच काय वाजवावे वगैरे योजले. शिवाजी मंदिरातून संचलन निघून सदाशिव, शनिवार, बुधवार, टिळक पुतळा यावरून शिवाजी मंदिरात एक तासाने संचलन आले. पुण्यामध्ये या संचलनाने धमाल उडवून दिली. माझे अनेक मित्र, गावातील सज्जन यांनी मुक्त कंठाने या प्रथम संचलनाची स्तुती केली.

पुणे संघ शाखेमध्ये १९३५ पासून हिंदुसाम्राज्यदिनोत्सव, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी, मकरसंक्रमण, वर्षप्रतिपदा हे सहा उत्सव पूर्ण योजनेने, चांगली तयारी करून पार पाडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे पुण्यातील एकेका शाखेत कार्यकर्त्यांचा गट तयार झाला. प्रत्येक उत्सवाची सर्व

तयारी करण्याचे काम (ध्वज, हार, व्यासपीठ, प्रतिमा, संघस्थान आखणी इत्यादी) एकेका शाखेकडे योजनापूर्वक दिले जात असे. १९३५ मध्ये गुरु-दक्षिणा ३६ रु. व एक पुस्तक एवढी झाली. १९३६ साली १६२ रु., नंतर १९३७ मध्ये तृतीय वर्ष शिक्षणासाठी पुण्याचे तेराजण गेलो तेथे कार्य-कर्त्यांच्या बैठकीचे महत्त्व लक्षात आल्यामुळे १९३७ मध्ये ७५० रु. याप्रमाणे गुरुदक्षिणा होत गेली.

१९३४–१९३५ मध्ये सुरू केलेल्या पुण्याच्या शाखा नीट चालविण्यासाठी जे जे स्वयंसेवक बंधू योजले गेले जात होते, त्यांना सभोवतालच्या मंडळींचा त्रास होई. काही वेळा काही ठिकाणी ते वातावरण संघर्षात–आपापसातील मारामारीत होई. अशा ५–६ प्रसंगात मा. भाऊराव अभ्यंकर यांच्या मध्यस्थीचा–सामोपचाराचा उपयोग होऊन शाखा पूर्ववत चालू राहात. खालकर

कार्याची संघपद्धती

भारतात अनेक संस्था आहेत. त्या त्या संस्थेची कार्य करण्याची काही पद्धती आहे. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची पद्धती वैशिष्ट्यपूर्ण व सर्वस्वी अपरिचित आहे. परंतु त्या पद्धतीमुळे संघकार्य व कार्यकर्ते ही एक विश्वासार्ह दुक्कल निर्माण झाली आहे. संघाची शाखा हीच वैशिष्ट्यातील विशेषता आहे. तेथे कार्य करू इच्छिणारा स्वयंसेवक कार्यकर्त्यांपासून प्रेरणा घेतो, हा ह्या पद्धतीचा लाभ आहे.

माझ्या निकट परिचयातील एका स्वयंसेवकाने धीरोदात्त वृत्तीने एक दिवस मागणी केली की, 'वसंतराव, मला अशा ठिकाणी भारतात पाठवा की जेथे कार्य करणे फार अवघड आहे.' या मागणीमुळे मला फार आनंद झाला कारण यात स्वयंसेवकाच्या सिद्धतेचाच परिचय होतो. पण माझ्या कक्षेतील हा विषय नसल्याने मी त्या स्वयंसेवकाचा परिचय पू. गुरुजींशी करून देऊन इच्छा सांगितली. पू. गुरुजींनी त्याला ओरिसा राज्यातील ब्रह्मपुरी जिल्ह्यात (जेथे हत्तीरोग होतो) पाठविले. ५ वर्षे तेथे त्याने उत्तम काम केले. त्यानंतर त्या स्वयंसेवकाला पू. गुरुजींनी परत बोलाविले.

तालीम, चिंचेची लालीम, आगरवाल तालीम इत्यादी ठिकाणी संघर्ष झाले. निष्कारण त्रास देणाऱ्यांना पिट्टी द्यावी लागली. संघाची शाखा सुरू होऊन चांगली चालण्यासाठी बोलण्याप्रमाणे वागणाऱ्या संघबंधूंचीच गरज मोठी व विशेष असते. पुण्यात सुरू झालेली शाखा बंद पडलेली आठवत नाही. याचे कारण ध्येयनिष्ठ संघबंधूंनीच त्या चालविल्या.

१९३५ च्या अखेरीस मा. विनायकराव आपटे पुणे शहराचे मा. संचालक झाले. टिळक स्मारक मंदिरातील पुण्याची पहिली शाखा पर्वतीच्या पायथ्याशी सुरू करावी लागली. तेथे १०० ते १२५ एवढी उपस्थिती होती. नाना, भवानी, गुरुवार पेठांतील २५–३० तरुणबालांचा गट पर्वती शाखेच्या पायथ्याशी येत असे. श्री. नगीनदास शहा त्यांचे म्होरके होते व त्यांचेबरोबर स्व. परशुराम, श्री. विठ्ठल रजपूत, मुरलीधर किराड, मल्लाप्पा सोलापुरे, कै. विश्वनाथ रसाळ इत्यादी मंडळी होती. पुण्यातील सर्व १८ शाखांचे काम नीट चालले होते. ह्या पर्वती शाखेवर नवीन भरतीच्या स्वयंसेवकांचे काम मी पाहात असे. नवीन आलेल्या स्वयंसेवकांचा वेगळा वर्ग चालवून त्यांना सर्व आज्ञा, कृती शिकविणे, संघाच्या कार्याची, ध्येयाची माहिती देणे असा उपक्रम असे. तो मी आपण होऊनच स्वीकारला होता. डिसेंबर १९३५ च्या अखेरीस नगीनदास शहा यांनी असे बोलणे सुरू केले की, पुण्याच्या आमच्या भागात शाखा सुरू करा. ते शाखेवर येतच होते. पण २५–३०, कधी कधी ४० सुद्धा लोक गंज, नाना, भवानी पेठांतून पर्वतीच्या पायथ्याशी येत असत. मा. विनायकराव माझ्याशी बोलू लागले. त्यांनाही पटले की, दक्षिण-पूर्व भागात एक शाखा सुरू झाली पाहिजे.

पूर्वभागातील पहिली शाखा

माझा पू. डॉक्टर यांच्याशी पत्रव्यवहार सुरू होता. दरमहाचा पुणे शाखेचा अहवाल मी माझ्या भोवतालचा पाठवीत असे. पर्वती शाखेवर विचारविनिमय चालू होता. १९३६ च्या १४ जानेवारीपासून गंज पेठेत जानोईच्या मळ्यात लिंगायत मसणवटीला लागून असलेल्या जागेत संघाची गंजपेठ शाखा सुरू करण्याचे ठरले व मी तिकडे कार्यवाह म्हणून जावे असे ठरले. मीच ते पत्करले. मा. विनायकराव म्हणाले, "वसंतराव, तुम्ही तिकडे गेलात म्हणजे

बाकी पुण्यात कोणी पाहावयाचे ? " मी उत्तर दिले, " त्यात कमी पडू देणार नाही. ". १९३७ च्या अखेर, पुण्याच्या शाखेच्या कार्यालयासाठी (उद्यान कार्यालयाच्या जागेत) सातारच्या मा. भाऊसाहेब मोडकांनी जागा मिळवून दिली. त्या अगोदर शिवाजी मंदिराला लागून असलेल्या खोलीत संघबंधू बाबाराव खरे हे सर्व प्रकारे कार्यालय, भांडार संभाळीत असत. त्या खोलीच्या गच्चीत – कार्यकर्त्यांच्या बैठका होत.

मी, मुकुंद सोमण, प्रभाकर भट, राजा भोरकर, बाबल पुराणिक, (अमरेंद्र गाडगीळ) अशा पाच जणांनी गंज पेठेत पूर्व भागातील पहिली शाखा जानेवारी १४ सन १९३६ मध्ये सुरू केली. ५॥ ते ६॥ ही शाखेची वेळ होती. ५ वाजल्यापासून हिंडणे, फिरणे सुरू होऊन शाखा उत्तम तऱ्हेने सुरू होई. गट व गण पाडून चारी कार्यकर्ते मनःपूर्वक शिक्षण देत. १९३६ च्या संघशिक्षा वर्गाला या शाखेतून १० जण उपस्थित करता आले. १९३६ च्या एप्रिल महिन्यात पुणे म्युनिसिपालिटीच्या ६५ सभासदांचा संघशाखेवर वासंतिक रसपानाचा कार्यक्रम संपन्न झाला व सर्व म्युनिसिपल सभासदांनी मुक्तकंठाने कार्याची स्तुती केली. म्युनिसिपालिटीतर्फे आवश्यक ते सर्व सहाय्य देऊ असे सांगितले. या शाखेला लागून कै. बाळाजी रखमाजी गायकवाड नावाचे वृद्ध गृहस्थ (सरकारी कॉन्ट्रॅक्टर) शाखेवर एकदम खूष होते. मंडईतील श्री. लक्ष्मण सिताराम काची हे फळांचे दलाल संघावर व माझ्यावर खूष होते. ते तसे काँग्रेसचे, पण धर्म-संस्कृती भूमिकेवर त्यांना संघ फार आवडे. त्यांचा माझा संबंध फारच वाढत गेला. त्यांची दोन्ही मुले मच्छिंद्र व भूपाल संघाचे पक्के झाले. इकडे डाळवाले आळीमध्ये परशुराम रजपूत यांचे वडील बळीरामशेट, विठ्ठल रजपूत यांचे मोठे भाऊ बाबूलाल, डॉ. शिवशंकर बिडवे यांचे वडील अशी अनेक घरंदाज मंडळी संघावर अत्यंत प्रेम करणारी प्राप्त झाली. गंज पेठ शाखेवर गोविंद हलवाई चौक, नाना पेठ चौक, घोरपडे पेठ या सर्व भागातून मंडळी येऊ लागली. हिंदु तरुण मंडळ या संस्थेचे पुरणसिंग काची, निर्गुडे, कावळे, लक्ष्मणशेट सोलापुरे, रामप्रसाद किराड, पांडुरंगशेट किराड, डावरे वकील व त्यांचे वडील विश्वासराव अशा अनेक मंडळींचे संबंध या शाखेच्या कार्यातून फार वाढत व जवळचे होत गेले.

गंज पेठ शाखेवर ९० ते १०० उपस्थिती असे व १० गट पाडले होते.

गटनायक म्हणून काम करणारे सर्व संघबंधू दिवसेंदिवस पक्के होत होते. श्री. पुरणसिंग काची यांचा संबंध तेथील कार्यवाढीला चांगला पोषक ठरला. त्या भागात संघशाखेचे काम हिरीरिने चालले होते. मला सर्वांचे पुढारीपण करताना फार आनंद वाटे. तिकडील परिस्थितीत मांसाहारी अनेक होते पण हिंदु खाटिक नव्हता. शाखेतील काही मंडळीतर्फे २ मांसाहाराची जेवणे योजनापूर्वक घेतली. एकदा एक बकरे पुरणसिंगांनी कापले. त्याचेबरोबर काही स्वयंसेवक होतेच. दुसऱ्यांदा झालेल्या कार्यक्रमानंतर पुरणसिंगांनी एका स्वयंसेवकाला धंदा थाटून दिला व त्या भागात हिंदू खाटिक निर्माण झाला. एवढाच मांसाहारी भोजनाचा प्रपंच ! पुन्हा नंतर तो कार्यक्रम झाला नाही. केला नाही.

पू. डॉक्टरांना पूर्व भागातील या शाखेच्या कार्याची माहिती दिल्यानंतर पू. डॉक्टरांची शाबासकीची पत्रे मा. विनायकरावांकडे आली. सप्टेंबर १९३६ मध्ये पू. डॉक्टरांची पुण्याला भेट ठरल्याचे कळल्यावर पू. डॉक्टरांचा कार्यक्रम या गंजपेठ शाखेवर घेण्याचे ठरले व तो छान झाला.

म. गांधींची भेट

१९३६ साली मी, बाळ ओगले व बापूराव जोशी ज्युनिअर बी. एससी. मध्ये जिऑलजी (भूस्तरशास्त्र) घेऊन अभ्यास करीत होतो. संघाच्या कामात आम्ही तिघेही अग्रेसर होतो. एक दिवस सकाळी प्रॅक्टिकलसाठी गेलो असताना म. गांधींना भेटण्याची कल्पना मी मांडली. त्या वेळी डॉ. आंबेडकर करारासाठी म. गांधींचा मुक्काम पुण्यात बंडगार्डनजवळच्या पर्णकुटीमध्ये असल्याचे समजले होते. तिघांनी विचार केला की, आपण संघाच्या कामातून देशसेवेचा विचार करतोच आहोत; पण म. गांधी यांना देशभक्तीचा मार्ग आपण विचारू. आम्ही तिघेही सायकलने येरवडा गावाजवळच्या पर्णकुटी बंगल्याकडे सायकली घेऊन निघालो. प्रवेशद्वाराजवळ सायकली लावून आम्ही म. गांधी आहेत का याची चौकशी केली. ते आहेत असे कळल्यावर आम्हास त्यांना भेटावयाचे आहे असे सांगून आम्ही आमची नावे सांगून लिहून दिली व निरोपाची वाट पाहात थांबलो. नंतर निरोपाप्रमाणे आत गेलो. परिचय करून दिला. फर्ग्युसन कॉलेजमधले आहोत असे सांगितल्यावर वा. ब. गोगटे यांना ओळखता का असे विचारले. होय असे उत्तर दिले. माझ्या परिचयाचे ते

होतेच. त्यानंतर आम्ही (मी) प्रश्न विचारला की, "देशाची सेवा करावी असे आमच्यासारख्यांना (तरुणांना) वाटते तर आम्ही काय करावे ?" म. गांधींनी उत्तर दिले, "खादी वापरा, चहा सोडा, साक्षरता वाढवा." मी स्वतः ते केलेले असल्याने मी माझा अनुभव सांगितला. शेवटी म. गांधी म्हणाले, "तुम्ही फैजपूर काँग्रेसच्या अध्यक्षांचे भाषण वाचले का ?" आम्ही "होय" म्हणून सांगितले. "त्यातील कोणतीही एखादी गोष्ट तुम्ही करा. यापेक्षा विद्यार्थिदशेत अधिक काही सांगण्यासारखे नसते" गांधी म्हणाले. पुण्याच्या शाखा वाढीला लागल्या होत्या. संघकार्याची कल्पना मनात ठसली होती. त्या पार्श्वभूमीवर म. गांधींना आम्ही भेटलो. अंधारात चाचपडत न बसता आमचे मार्ग-आक्रमण चालले होते, त्यात हा म. गांधींच्या भेटीचा कार्यक्रम झाल्यामुळे आमचे मन संघकार्यावर अधिक स्थिर झाले.

म. गांधींची ही आमची भेट मानसिक दृष्ट्याही फार उपयुक्त झाली. संघाच्या कार्यात किती मदत करता येते व ती मदत सत्पात्री केली जाते याचाही प्रत्यय वारंवार येत होता. संघाच्या सुरू होणाऱ्या शाखेत येणाऱ्या

देशभक्त – राष्ट्रभक्त

राष्ट्रभक्तीचे बाळकडू घेऊन जन्म घेणारे फारच थोडे ! त्यामुळे योग्य शिक्षण, योग्य संस्कार, योग्य कलांचे शिक्षण, योग्य शारीरिक क्षमता यांचा लाभ प्रत्येक मुलाला मिळावयास हवा ! त्याच दृष्टीने भारताच्या कानाकोपऱ्यात कुठेही वरील गोष्टींचा लाभ मिळवून देणारी दैनंदिन शाखा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व प्रकाराचे शिक्षण व संस्कार घेतलेला स्वयंसिद्ध स्वयंसेवक चालवितो. तो बोलतो तसाच वागतो व त्यामुळे त्याच्या सारखेच स्वयंसेवक त्याला समोर वागताना दिसतात. त्यांच्या अंगातील विविध गुणांचा विकास व्हावा असे अनेक प्रसंग शाखेतच घडविले जातात अन् स्वयंसेवकाची प्रगती अगदी डोळ्यासमोर होताना दिसते. त्या प्रगतीची कसोटी देणे हे त्याचे काम, घेणे मार्गदर्शकाचे कर्तव्य !

सर्वांसाठी सर्व प्रकारचे सहाय्य करण्याची तयारी ठेवताना मुख्य भूमिका अशी असे की, हे सर्व आपण आपल्या हिंदुसमाजासाठी करीत आहोत. अन्य कोणताही त्यामध्ये हेतू ठेवला जाऊ नये, हीच संकल्पना ठरून गेली होती. गंजपेठ भागातील एक बाल स्वयंसेवक जीवन शहा एकदा आजारी पडला. दोषी ताप आला. घरची गरीबी होती; पण शाखेतील स्वयंसेवकांनी त्याची इतकी देखभाल व मदत केली की, त्याचे आई-वडील फारच प्रभावित झाले.

१९३६ च्या एप्रिल–मे मध्ये महाराष्ट्राचा दुसरा ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्प झाला. पुणे व महाराष्ट्र मिळून १५४ स्वयंसेवक आले होते. पुण्याचे ३९ होते. या वर्षी रीतसर प्रथम व द्वितीय वर्ष यांचे शिक्षण झाले. १९३५ चेच चारही जण नागपूरहून आले होते. मा. भाऊराव अभ्यंकर सर्वाधिकारी होते. पू. डॉक्टरांचा मुक्काम १५ दिवस होता. १९३६ च्या वर्गात स्व. तात्यासाहेब केळकर यांचा बौद्धिक वर्ग झाला होता. वर्ग उत्तम तऱ्हेने पार पडला. मा. दादाराव परमार्थ यांचे वर्गात फार बारकाईने लक्ष होते. एक-एक, दोन-दोन स्वयंसेवकांना संघकार्यासाठी कसे निष्ठापूर्वक काम करावे याबद्दल दादाराव परिणामकारक भूमिका मांडीत. त्या काळात त्यांनी सिंहगडावरील तानाजी मालुसरे यांच्या स्वारीतील न चढणाऱ्या घोरपडीच्या प्रसंगावरून निरुपयोगी गोष्टी – माणसेसुद्धा – राष्ट्रीय जीवनातून नष्ट केली तरच शुद्ध राष्ट्रीय जीवनाचा अनुभव घेता येतो वगैरे प्रखर विचार फार प्रभावी रीतीने मांडले — मांडीत असत. मला स्वतःला दादाराव परमार्थ यांच्या तेजस्वी विचारांची फारच ओढ होती. त्यांचा बौद्धिक वर्ग झाल्यावर अनेक वेळा मी पूर्ण भारावून जात असे.

बनारसची पुस्तिका

१९३६ सालची गोष्ट. पू. डॉक्टर हेडगेवार यांनी बनारस शाखेला भेट देण्याचा कार्यक्रम ठरला होता. त्या वेळी बनारसला काही मार्क्सवादी मताचे तरुण होते. त्यांनी एक इंग्रजी पुस्तिका काढून त्यामध्ये रा. स्व. संघ म्हणजे भारतातील राजेरजवाड्यांनी (त्या वेळच्या संस्थानिकांनी) हजारो रुपयांची मदत करून वाढविलेली ही संघटना आहे असा अपप्रचार करण्याचा प्रयत्न केला. त्या आठ पानी पुस्तिकेच्या खोट्या प्रचारामुळे सर्वांची करमणूकच झाली.

पुण्यातही त्या पुस्तिकेचे वाचन झाले. पू. डॉक्टर हेगडेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरातील एका शाखेपासून भारताच्या सर्व प्रांतात १५ वर्षांत काम पसरविले ते अत्यंत परिमित पण ठोस मार्गानेच ! आपल्या इतकीच तळमळ व निष्ठा उत्पन्न करून नित्य एक तास भरणाऱ्या व संस्कारक्षम कार्यक्रम करणाऱ्या एका शाखेत प्रामाणिक व तनमनधनपूर्वक काम करू शकणाऱ्या एकेका कार्यकर्त्यामुळे ! गुरुपौर्णिमा उत्सवाच्या ध्वजासमोरील गुरुदक्षिणेतून त्या त्या शाखेला स्वतंत्र बाण्याने काम करताना आत्मविश्वास वाढतच जावा अशा सर्व पद्धती प्रथमपासून रूढ केल्या. पुण्यातही आम्ही त्याचा अवलंब केला.

हिंदुसमाजातील सर्व दोषांचा अभ्यास करून तो तो दोष रोजच्या संघशाखेच्या माध्यमातून घालविण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत घेत एकेक सुजाण स्वयंसेवक अधिक आत्मविश्वासाने काम करू लागे.

बनारस येथील वर उद्धृत केलेल्या पत्रकामुळे संघासारख्या सरळ व प्रामाणिक मार्गाने काम करणाऱ्या संघटनेवर गलिच्छ आरोप करणाऱ्या मंडळींच्या हेतूबद्दल सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले.

पहिले हिवाळा शिबिर

१९३६ चा दसरा महोत्सव जवळ जवळ ४५० स्वयंसेवकांच्या संचलनाने संपन्न झाला. तेवढ्यात संघाच्या हिवाळी शिबिराची काही माहिती दादाराव यांनी सांगितली. आम्हा पुण्यातल्या कार्यकर्त्यांच्या मनात आले की, १९३६ च्या डिसेंबर महिन्यात पुणे शाखेचे पहिले हिवाळी शिबिर घ्यावे. याबाबतीत दादा ठकार, दिनूभाऊ गोडबोले या दोघांशी विचारपूस करून आम्ही सर्व तपशिलासह योजना ठरविली. अरण्येश्वर देवळाजवळ पाहाणी करून साधारण २० ते २५ राहुट्या, २५० स्वयंसेवक एवढे स्वरूप समोर घेऊन रान साफ करणे हा महत्त्वाचा कार्यक्रम पुणे शाखेसमोर ठेवला. मा. दादाराव यांनी पू. डॉक्टरांशी पत्रव्यवहार करून पू. डॉक्टरांची उपस्थिती राहील अशा दि. ३१–१२–१९३६ ते २–१–१९३७ रात्रीपर्यंत शिबिर ठेवण्यात आले.

पुण्यात सावकार माडीवाले यांचा परिचय डावरे वकीलांनी करून दिला अन् १५ तंबू १०० रुपयात आम्हाला विकत घेता आले. स्काऊट व लष्करातील तंबू-विक्रेते यांचेकडून भाड्याने तंबू आणविले गेले.

अरण्येश्वरच्या मागे १०००×१००० स्क्वेअर फुटावर शिबिराचा प्लॅन आखून रान सफाईस दररोज रात्री पुण्याची १–१ शाखा बोलाविली जाई. रान बाभळीची झाडे जमिनीत १०–१० फूट खाली गेलेली, तसेच प्रत्येक दगडाखाली विंचू – एक नव्हे, विंचवांचे कुटुंबच. पण त्यांना मारणे हाच उद्योग झाला होता. सुमारे २००० वा जास्त विंचू मारल्याची नोंद आहे. संडास-व्यवस्थेसाठी चर खणणे व किंतान लावणे, पिण्याच्या पाण्यासाठी म्युनिसिपालिटीचे टँकर, धुणे–आंघोळीसाठी ओढ्याचे पाणी होते. सकाळी न्याहारी दूध–पाव, दुपारी व रात्री व्यवस्थित जेवण. घोष विभागाला दिवसभराचे उद्घोष व संचलन यासाठी तयारी करावी लागली. सर्व कार्यक्रम संपूर्ण लष्करी शिस्तीमध्ये झाला. स्वयंसेवकांची तत्परता कसोटीला लावण्याचे दृष्टीने "संकटसूचना उद्घोष" (डेंजर कॉल), रात्रसंचलन हेही कार्यक्रम ह्या पहिल्याच शिबिरात घेतले गेले. रक्षक कवायत व २४ तास रक्षक पहारा यांचाही अनुभव नव्याने व प्रथमच सर्व स्वयंसेवकांना देण्यात आला. पू. डॉक्टर हेडगेवार संपूर्ण कार्यक्रमाला शिबिर व्यवस्थेतच होते. त्यांनी नागपूरचे त्या वेळचे संघाचे प्रमुख श्री. मार्तण्डराव जोग यांना घोड्यावरून पूर्ण गणवेषात येण्याची सूचना केली होती. त्याप्रमाणे ते आले होते. त्यांनी सर्व पाहाणी करून संबंधित शिबिराची जागा, व्यवस्था, रचना या सर्व गोष्टी लष्करी शास्त्राला धरून किती उत्तम आहेत ते सांगितले. पू. डॉक्टर यांनी शिबिराचा समारोप करताना सर्व कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले व म्हणाले, "हे शिबिर

मी १९३३ पासून काम सुरू केले. त्या वेळी मा. वि. मा. ऊर्फ भाऊसाहेब देशमुख, मा. भाऊराव अभ्यंकर, मा. विनायक गोपाळ आपटे, पुढे १९३८ नंतर मा. बाबाराव भिडे अशा वकील व प्रतिष्ठित मंडळींशी माझे घनिष्ट संबंध आले. त्यांच्या सहयोगातून मला जमले तेवढे सर्व मी केले. स्वयंसेवकाला पहिल्या दिवसापासून मार्गदर्शन करून त्याला निष्ठावंत स्वयंसेवक बनविण्यापर्यंत काम करावे लागते याचे तंत्र मला अवगत झाले होते. वरील सर्व माननीय अधिकाऱ्यांनी, मला जाणून मला सर्व गोष्टी करण्यास परवानगी दिली होती. आता त्यांच्यापैकी कोणी हयात नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

पहिलेच आहे असे वाटतच नाही. सर्व गोष्टी बिनचूक व एकही दोष न काढता येण्यासारख्या झाल्या यात शंका नाही."

या शिबिराच्या अकल्पित यशामुळे आम्हा सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला व काही २–३ नवीन शाखा पुण्यात वाढविण्याचे ठरले. शिबिरामध्ये संध्याकाळच्या ५ ते ७ च्या खेळांच्या कार्यक्रमात हुतूतूचे सामने प्रेक्षणीय झाले होते. कुस्त्यांचा कार्यक्रमही बहारदार झाला होता. हे कार्यक्रम पाहाण्यास मंडईतील सर्व दलाल लोकांना श्री. लक्ष्मणराव काची यांनी आग्रहपूर्वक आणले होते. दर वर्षी आणीत असत. पुण्यात वा अन्यत्र कोठेही पाहण्यास मिळत नाहीत अशा पद्धतीचे अत्यंत चुरशीचे हुतुतू सामने, कुस्त्या हिवाळी शिबिरात करण्याची प्रथा पुण्याच्या संघ कार्यक्रमात रूढ झाल्यासारखी होती. १९६०–६२ पर्यंत श्री. बंडोपंत परचुरे यांनी आवर्जून टिकविली होती.

१९३७ साल उजाडले. या वर्षी तृतीय वर्षाच्या शिक्षणासाठी पुणे व पश्चिम महाराष्ट्र इकडून पहिली तुकडी जाण्याची कल्पना होती. १९३६ च्या अखेरीस पू. डॉक्टरांनी दादाराव परमार्थ यांना नागपूरला बोलाविले व तेथून त्यांना पंजाब प्रांतात पाठविणार असे काही ठरल्याचे कळले. दादाराव परमार्थ यांनी १९३३ ऑक्टोबर ते १९३६ ऑक्टोबर अशा तीन वर्षात सतत पुणे व महाराष्ट्र या भागात उत्कृष्ट कार्य केले. त्यांच्या जाज्वल्य भावना देश-

संघनिष्ठा

हवेली तालुक्यातील संघकार्यात मी ७–८ वर्षे होतो. तेवढ्यात ज्या गावोगावच्या मंडळींनी आंपल्या संघनिष्ठेने मला चकित केले, त्यांची आठवण आजही मला करावीशी वाटते. त्यामध्ये दत्तूमामा हजारे, वाडेकर बंधू, केसकर बंधू, मोकाशी, पंढरपुरे, देवराम अबनावे, तुपे कुटुंबीय, बिबवे, खडताराम, बच्चन शिंदे, नारायण बोराटे, रघु कचरे, कांबळे, आनंदा शिंदे, यासारख्या अनेक मंडळींनी संघावर खूप प्रेम केले. अनेक प्रकारच्या अडचणीतून कार्याबद्दल हेळसांड कधी केली नाही. आज ते सर्वजण चांगल्या स्थितीत आहेत व कार्यात सहभागी आहेत.

भक्तीच्या जळत्या समर्पण कल्पना यांचे श्रवण माणसाला कार्यप्रेरितच करीत. मला स्वत:ला दादाराव परमार्थ यांच्यामुळेच इतके संघकार्य करण्याची प्रेरणा मिळाली यात काही शंका नाही.

संघटनेसाठी संघटना या मंत्राचा व पद्धतीचा उच्चार एका भाषणात १०० वेळा झाला तरी संघनिष्ठेला धार येईल असे प्रतिपादन दादाराव परमार्थ करीत असत. संघस्थान हे स्थान राष्ट्रभूमीच आहे. या ठिकाणी एकही चूक म्हणजे राष्ट्रघात अशा पद्धतीने संघस्थानाची प्रतिष्ठा दादारावांनी मजसारख्यांच्या मनात पक्की रुजविली, त्यामुळे संघशाखा उत्कृष्टपणे चालविण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार मला करता आला व मी शाखातज्ज्ञ असल्याच्या सार्थ अभिमानाने शाखांवरून हिंडत होतो. जानोई मळ्यातील गंज पेठ शाखा व तेथले संबंध वृद्धिंगत होत होते ते कधी कमी पडले नाहीत.

अकोला इस्टर कँप

पू. डॉक्टर हेडगेवार यांचे नागपूर, मध्यप्रांतात तसेच विदर्भ या ठिकाणच्या कामामध्ये अनेक कार्यक्रमांची योजना असे. १९३७ च्या एप्रिल महिन्यात इस्टर सुटीला धरून नागपूर–विदर्भ प्रांताचे प्रौढ संघबंधूंचे (४० वयाच्या पुढील) एक शिबिर अकोला येथे आयोजित केले होते. त्यासाठी पुण्याकडील मंडळींना आमंत्रण आले होते. मा. विनायकराव, बापूराव जोशी व मी त्या शिबिराला प्रथमपासून शेवटपर्यंत होतो. पू. डॉक्टर हेडगेवार यांचे २॥–३ तास समारोपाचे भाषण झाले. प्रौढ मंडळींनी संघाच्या शाखेसाठी कशी खटपट करावी व शाखा उत्तम चालण्यासाठी तरुण स्वयंसेवकांच्या समोरच्या अडचणी कशा दूर कराव्या, स्वत:च्या प्रतिष्ठेचा उपयोग कसा करावा याचे सूक्ष्म व तपशीलवार विवेचन पू. डॉक्टरांनी केले होते. त्याच वर्षी वऱ्हाड प्रांतसंघचालक म्हणून ॲडव्होकेट बापूसाहेब सोहोनी यांची नियुक्ती करता आल्याचा आनंद पू. डॉक्टरांनी व्यक्त केला होता. आम्हा तिघांचा परिचय पू. डॉक्टरांनी सर्व मंडळींना फार चांगल्या पद्धतीने करून दिला होता. शिबिर संपल्यानंतरच्या गप्पांमध्ये मी पू. डॉक्टरांना विचारले की, "असे प्रौढ लोकांचे शिबिर आमच्याकडे केव्हा करता येईल ?" पू. डॉक्टरांनी लगेच सांगितले की, "तुमच्या प्रांताची प्रांतिक बैठक घ्या अन् नंतर प्रौढ लोकांच्या संख्येनुसार शिबिराचा कार्यक्रम ठरवा."

माझ्या विचारांना जोराची चालना मिळाली. १९३५ व १९३६ या दोन ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमुळे महाराष्ट्रातील कार्याचा प्रसार तेरा जिल्ह्यांत कसा, किती झाला आहे याचा विचार मी केला. मा. विनायकराव, बापूराव जोशी व मी यांनी परतीच्या वाटेवर अकोला येथील प्रौढ शिबिराचे सर्व दृष्टींनी गुणवर्णन केले. पू. डॉक्टर यांच्या प्रांतिक बैठक घेण्याच्या सूचनेवरही विचार झाला. कुलाबा, धुळे व कोल्हापूर या तीन जिल्ह्यांमध्ये काम फारच कमी असल्याचे लक्षात आले. पुण्यास परतल्यानंतर मात्र हे सर्व विसरले व १९३७ च्या तृतीय वर्षाच्या वर्गाला नागपूरला कसे जाता येईल याचाच विचार सुरू झाला !

मी त्या वर्षी बी. एस्सी. (शेवटच्या वर्षाला) परीक्षेला बसलो होतो. नागपूरचे मुकुंदराव मुंजे व मी यांनी बी. एस्सी. चा अभ्यास बरोबर केला होता. कॉलेजमध्ये अन्यान्य कारणांमुळे मी थोडा मागे पडलो होतो. आता बी. एस्सी. ची परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास होईनच अशी खात्री होती. पुण्यात घरी (मातामह) आजोबा सर्व दृष्टीने व्यवहारी होते. नागपूरला ४० दिवस संघाच्या वर्गाला जाण्यास परवानगी देणारच नाहीत अशी खात्री होती. पुणे व महाराष्ट्र यातील संघकार्याचे दृष्टीने माझे पाऊल बरेच पुढे पडले होते. तृतीय वर्षाला पुण्यातील अन्य १२ स्वयंसेवकाबरोबर मी जाणे कार्याच्या दृष्टीने फार आवश्यक होतो. मी बेचैन झालो होतो. परमेश्वराकडून सर्व प्रकारच्या धैर्याची मागणी करीत होतो. शेवटी आजोबांना एक रागाचे पत्र लिहून, "तुम्ही मला फार त्रास देता, मी घरातून निघून जात आहे" अशा अर्थाचे एक पत्र माझे मित्र व संघबंधू श्री. अमरेंद्र गाडगीळ (पूर्वी बाबल पुराणिक) यांचे हस्ते आजोबांना देण्याची व्यवस्था करून मी दि. २९–३० एप्रिलच्या सुमारास पुण्याचे एकूण १३ व महाराष्ट्रातील ९ अशा २१ स्वयंसेवकांच्या तृतीय वर्षाच्या पहिल्या तुकडीत दाखल झालो.

पू. डॉक्टरांना माझ्या अडचणीचे एक पत्र ८ दिवस अगोदर पाठविलेच होते. पण वरील पद्धतीने मार्ग काढून मी नागपूरला पोचलो. त्या वेळी मुंबई-कलकत्ता मेल व्हाया नागपूरने गाडी सकाळी ११ ला नागपूरला पोचत असे. त्या वेळी बॉकर रोडवर एक लहानसे संघ कार्यालय होते. आम्ही ठरलेल्या वर्गाच्या ठिकाणी जाण्याच्या आधीच श्री. कृष्णराव मोहरीर यांनी आम्हा सर्वांना एकेका गाडीत बसवून ४–५ मैल लांब असलेल्या श्रीमंत बुटी यांचे बागेतील चंदन

कार्यक्रमातच (खाणे–पिणे कार्यक्रम) उपस्थित केले. भरपूर व आग्रहाच्या खाण्यापिण्यानंतर आम्ही सर्व जण फिरून संघकार्यालयात पोचलो व तेथून ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या निवासस्थानी महालमधील नील सिटी हायस्कूलच्या इमारतीत आमच्या खोलीत पोचलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी रेशीमबाग संघस्थानावर दण्डासह पोचलो. गुणाकर पिंगळे हे मुख्य शिक्षक होते. तसेच मोरुभाऊ पिंगळे आमच्याच वर्गात तृतीय वर्षासाठी होते. कार्यक्रम नीट सुरू झाला. पू. डॉक्टर पुण्यास वर्गासाठी गेले होते. ते १० मेच्या सुमारास आले व ११ मे रोजी आम्ही सर्व जेवावयास बसलो असता पंगतीत आले व माझ्याकडे पाहून म्हणाले, " वसंता, तुझे दोन्ही गोष्टींबद्दल अभिनंदन. " मी आदल्या दिवशी बी. एससी. परीक्षेत हायर सेकंड क्लासमध्ये पास झाल्याचे पुण्यालाच कळले होते. नागपूरला येईन असे त्यांना वाटले नव्हते. पू. डॉक्टरांची स्वयंसेवकांना शाबासकी देण्याची ही पद्धत फार रोचक होती.

नागपूरला डॉक्टर आल्यापासून वर्ग संपेपर्यंत दररोज दुपारी १॥ ते २॥ महाराष्ट्र संघबंधूंच्या खोलीत येत असत. परिचय, चर्चा, गप्पा, घरगुती समाचार, प्रश्नोत्तरे असे सर्व कार्यक्रम होत असत. अन्य वेळी श्री. कृष्णराव मोहरीर येऊन पू. डॉक्टर व आबाजी (डॉक्टरांचे काका) यांच्या गोष्टी सांगत. कार्य करण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत कशी संभाळली जाते याचेही रोचक वर्णन आम्ही ऐकत होतो. संघकार्यात कधी भांडणे मतभेदच नसतात. याबाबत पू. डॉक्टरांचा व्यवहार सांगताना कृष्णरावांनी सांगितले की, नागपुरात दोन स्वयंसेवक एकमेकात कडाक्याने भांडले व त्याची हकीकत पू. डॉक्टरांना कळली. पू. डॉक्टरांनी दोघांना बोलाविले व एकेकाचे म्हणणे ऐकले. शेवटी सांगितले की, तुम्ही दोघे यापुढे एकमेकाला कधी भेटू नका. पण दिलेले संघाचे काम मात्र चोखपणे करीत जा. या घटनेचा फार चांगला परिणाम नागपूर संघावर झाल्याचे कृष्णरावांनी वर्णन केले. कार्य करावयाला जेवढा वेळ देता येईल तेवढा द्यावा. भांडणात वेळ घालवूच नये. या कृष्णरावांच्या गोष्टींचा महाराष्ट्रातील कार्यातही फार उपयोग होत गेला. माझ्या काम करण्याच्या धडाडीमुळे काही मंडळी थोडी मजबदल हेवा करू लागली. मला कुजबुज लागताच त्यांचा बंदोबस्त मोकळेपणी गप्पागोष्टी करून मी केला. माझा मार्ग मोकळा राहिला.

तृतीय वर्षाचे शिक्षण

तृतीय वर्षाच्या शिक्षणाच्या काळात नागपूरमधील संघाच्या कार्यपद्धतीतील कार्यकर्त्यांच्या ठराविक बैठका, अहवाल निवेदन, आढावा घेणे इत्यादी गोष्टींचा चांगला परिचय झाला व त्याचा पुढील कार्यात चांगला उपयोग झाला.

आणखी एक गोष्ट म्हणजे पू. डॉक्टरांच्या एका बौद्धिक वर्गाच्या वेळी, थोडा उशीर झाल्याने नागपूरचे एक चांगले कार्यकर्ते धावत धावत येऊन वर्गाच्या तेथे बसले. वर्ग संपल्यानंतर मी त्या कार्यकर्त्याला मुद्दाम विचारले, "तुम्ही पू. डॉक्टरांचे पुष्कळ बौद्धिक-वर्ग ऐकले असतील तरी पुन्हा अशा वर्गासाठी एवढे धावत येण्याचे कारण काय?" त्या कार्यकर्त्याने दिलेले उत्तर मला फार महत्त्वाचे वाटले. ते म्हणाले, "वसंतराव, आम्ही माणसेच आहोत. संघाच्या कार्याचा विसर पडणे, काही चुका होणे आमच्या हातून होईलच, तसे होऊ नये, मन स्थिर राहावे यासाठी पू. डॉक्टरांचे बौद्धिक वर्ग फार मौलिक असतात, त्यामुळे ते कधीही टाळण्याची इच्छाही होऊ नये, यासाठी

प्रेम आणि विश्वास

संघटनेचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील अर्थ म्हणजे संघ-घटकातील प्रेम! प्रेमाचे समाजांतर्गत व्यवहार विविध प्रकारचे अनुभवास येतात. समाजातील दोष घालविण्यासाठी आईच्या प्रेमानेच संघ-घटकांचा संबंध असावा. सर्व गुण-दोषासह ज्येष्ठ स्वयंसेवकांनी परिचयात येणाऱ्या संघ-घटकांशी प्रेमाने वागावे. दोष घालवून म्हणण्यापेक्षा गुणांचा विकास करून दोषांना निःप्रभ करावे. त्यासाठी येणाऱ्या प्रेमळ संबंधांतून परस्परा-बद्दल विश्वास वाटू लागणे स्वाभाविक असते. प्रेम आणि विश्वास यांच्या नात्यांतून संघाचे कार्य करण्याची कुवत येते, वाढत जाते व ती कार्याला उपयोगी पडते. पू. डॉक्टर हेडगेवार आणि पू. गुरुजी यांनी खरोखरच या कार्यार्थी प्रेमातूनच हजारो संघ-कार्यकर्त्यांची घडण केली व त्यातूनच कार्य घडत आले आहे. त्याचा अधिक विस्तार ह्याच मार्गाने होणार!

आम्ही रात्रंदिवस जागरूक असतो. मला काही कारणासाठी उशीर झाला. पण भाग्य एवढेच की, मी धावत पळत आल्यामुळे माझे काही बुडाले नाही." हे त्या कार्यकर्त्याचे उत्तर माझ्या अजूनही स्मरणात आहेत. प्रत्येक स्वयंसेवकाने, संघातील अगदी प्राथमिक म्हणता येईल असेही बौद्धिक वर्ग ऐकणे इष्टच असते एवढाच त्याचा अर्थ ! त्या वेळचे नागपूर कार्यवाह श्री. बाळ देवरस (आजचे सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस) यांनी आम्हा सर्व २१ संघबंधूंशी एक-दोन वेळा गप्पागोष्टी केल्या होत्या. त्यांनी असाही एक प्रश्न विचारला की, " भारतातील परकीय आक्रमणे, मंदिरांची मोडतोड, उदा० बनारसचे काशी-विश्वेश्वर मंदिर, तसेच ताजमहाल, जालीयनवाला बाग यांसारख्या पराभव चिन्हांचा विचार मनाला बोचतो का ? संघाचे काम करताना तशा गोष्टी न घडू देण्याची प्रतिज्ञा करता येते का ? " केवळ त्या प्रश्नामुळेच संघाचे काम सातत्याने करता येण्यासाठी त्या प्रतिज्ञेचा मला फार उपयोग झाला.

नागपूर ते पुणे परतीचा प्रवास

पुणे व महाराष्ट्र येथून आलेल्या २१ तृतीय वर्ष शिक्षित स्वयंसेवकांचे वर्गाच्या काळात ज्याने त्याने, प्रांतोप्रांतीच्या कार्यकर्त्यांनीही फार कौतुक केले. परत जाताना सर्वांनी वर्धा, खामगाव येथे १–१ दिवस थांबून जावे अशी आमंत्रणे मजकडेच मिळाली. लौकर जाण्याची गर्दी असलेले लौकर गेले. पुण्याचे १२ व महाराष्ट्रातील ३ अशा १५ जणांचे वर्धा, नाचणगाव, खामगाव ह्या मुक्कामांचे १–१ दिवसांचे कार्यक्रम झाले. वर्धा येथील कार्यक्रम कै. मा. आप्पाजी जोशी यांनीच योजला होता. पू. डॉक्टरही आमच्या मागोमाग २ तासांनी वर्धा येथे येऊन पोचले होते. दुपारी जेवण झाल्यावर पू. डॉक्टर बाजूला बसले होते. आम्ही सर्वजण गप्पागोष्टी करीत बसलो होतो. आमच्यातील लेले व गोखले हे दोन बुजरे कार्यकर्ते होते. त्यांना पिटून काढून थोडे जास्त धीट बनवावे अशा विचाराने सर्वांनी हळूहळू उठून बाजूला सरकावयाचे नंतर त्या दोघांना सतरंजीत गुंडाळून मग सर्वांनी त्यांना गुद्दे मारावयाचे असे ठरले. पू. डॉक्टरांनीच या बाबतीत मार्गदर्शन केले होते. सर्व अपेक्षेप्रमाणे घडले. ज्या दोघांना मारपीट झाली त्यांनी ते आनंदाने स्वीकारले होते. त्यानंतर विश्रांती चालू असताना पू. डॉक्टरांनी मला हाक मारली व म्हणाले, " चल माझ्याबरोबर ! " मी निघालो. ५–१० मिनिटे चालून गेल्यावर

एका बोळातून आम्ही एका पत्र्याच्या मोठ्या फाटकापाशी पोचलो. फाटक उघडताच आत मैदान होते व तेथे ४०–५० महिला-मुली यांचा शारीरिक कार्यक्रम ध्वज लावून चालू होता. आम्ही दोघे ध्वजापर्यंत पोचलो, प्रणाम केला. एवढ्यात एक पोक्तशा बाई (वं. मावशी केळकर) पुढे येऊन त्यांनी डॉक्टरांना प्रणाम केला. नंतर कोणी काही बोलले नाही. ५–१० मिनिटे गेल्यावर पू. डॉक्टरांनी विचारले की, " बाई, आम्ही आता जाऊ ? " बाईंनी उत्तर दिले, " जशी तुमची इच्छा ! " ध्वजाला प्रणाम करून आम्ही दोघे परत निघालो. फाटकापर्यंत बाईंनी डॉक्टरांना पोचविले व आम्ही परतीच्या वाटेला लागलो. थोडे अंतर गेल्यावर पू. डॉक्टर थांबले व मला विचारले, " काय वसंता, माझी वागणूक कशी वाटली तुला ? " मी म्हटले, " डॉक्टर, मला काहीच माहिती नाही. मी काय सांगू ? " मग डॉक्टर म्हणाले, " अरे ही राष्ट्रसेविका समितीची शाखा आहे. ह्या बाई (मला प्रणाम केलेल्या) मावशी केळकर म्हणून वर्धा येथील आहेत. त्या गेली १२ वर्षे माझ्या मागे लागल्या होत्या की संघात स्त्रिया-मुलींना घ्या. मी बघू असे उत्तर देत असे. १२ वर्षांनी त्यांना कळले की संघात स्त्रियांना प्रवेश मिळणे कठीण आहे. अयोग्य आहे. मग त्यांनी स्वतंत्र स्त्रियांची संघटना म्हणून काढली आहे व त्यांच्या निमंत्रणा-प्रमाणे मी आलो व मुद्दाम तुला घेऊन आलो. हे बघ, तू पुण्याकडचा प्रमुख स्वयंसेवक आहेस. पुण्यास गेल्यावर तेथील स्त्रिया तुझ्यामागे लागून शिक्षक मागतील. काही हरकत नाही. १–२ शिक्षक त्यांना दे. पण जे शिक्षक म्हणून समितीत जातील त्यांनी तितके दिवस संघाच्या शाखेत जावयाचे नाही. समितीची गरज संपली म्हणजे त्या कार्यकर्त्यांना तू संघातील काम दे. आपण कसे वागावयाचे हे तुला समजावे म्हणून तुला बरोबर आणले. " त्यानंतर आम्ही दोघे सर्व मंडळींत सामील झालो. संध्याकाळी पू. आप्पाजींनी सत्काराचा मोठा कार्यक्रम आखला होता. गावातील प्रतिष्ठित मंडळी त्यात होती. पू. आप्पाजींनी सर्व स्वयंसेवकांचा परिचय करून दिल्यानंतर माझा परिचय करून देताना मुकुटमणि वगैरे मोठमोठ्या शब्दांत माझा परिचय करून दिला. त्या स्तुतीमुळे आपण बिघडू नये एवढाच विचार मी केला.

त्या रात्री आम्ही तेथून निघून वसंतराव ओक यांचे नाचणगावी जाण्या-साठी पुलगाव येथे उतरलो. मा. कृष्णराव मोहरीर आमच्याबरोबर आले होते.

नंतर आम्ही राजा भोरकर यांच्या खामगावी गेलो होतो. यथावकाश साधारण १३ जूनपर्यंत पुण्यास पोचलो.

पुण्यास पोचण्याच्या आधी आमच्या घरचा बंदोबस्त करावयाचा होता. नागपूर मुक्कामात माझ्या आजोबांची २ पत्रे मला मिळाली होती. मी घरी जाऊ नये अशा विचारात होतो. पण आजोबांची आलेली पत्रे पू. डॉक्टरांना दाखविली होती. ती वाचून व घरची परिस्थिती लक्षात घेऊन, डॉक्टर म्हणाले, "तू आजोबांची सेवा शेवटपर्यंत कर. त्यांना तुझ्यावाचून कोणी संभाळणारे नाही." परममित्र अमरेंद्र गाडगीळ यांचेकरवी मी आजोबांचा संबंध ठेवला होता. आजोबांचे एक पत्र आले व ते मला अमरेंद्राने पाठविले होते. त्यात आजोबांनी मला परत बोलाविले होते. मी त्याप्रमाणे घरी पोचलो व दैनंदिन व्यवहार सुरू झाला.

जून १९३७ पासून

१९३७ साली जूनमध्ये नवीन ५ शाखा काढून पुण्याच्या शाखांची संख्या २३ केली. महत्वाचा कार्यक्रम गुरुदक्षिणेचा ! त्यासाठी २३ जुलैपर्यंत रोज कार्यवाह, मु. शिक्षक यांची सतत १२ दिवस बैठक घेतली व गुरुदक्षिणा ७५० रुपयांपर्यंत वाढविण्यात यश प्राप्त झाले.

आता पुणे जिल्ह्याचे काम सुरू करणे व प्रांतिक बैठकीसाठी धुळे, कुलाबा, कोल्हापूर येथे कार्य सुरू करण्याच्या दृष्टीने मी काशीनाथपंत लिमये यांच्याशी पत्रव्यवहार केला. जून १९३७ पासून पुणे जिल्ह्याचे संघचालक मा. भाऊराव अभ्यंकर यांना योजण्यात आले व मला जिल्हा कार्यवाह करण्यात आले. पुणे शहरातील माझे संबंध थोडे कमी झाले तरी स्वयंसेवकांचा परिचय व गुण-विकास मजसमोरच चालू होता.

पुणे जिल्हा कार्य

पुणे जिल्ह्यात तालुकानिहाय कार्यवाढ करता यावी या दृष्टीने जुन्नर येथे १९३६ पासून माधव काटदरे गेला होता. लोणावळा येथे १९३६ पासून श्री. जोशी यांनी कार्य सुरू केले होते. खेड वाडे येथे नाना पालकर, सासवड येथे बापूराव जोशी, भोर येथे विनायक म. दांडेकर, दौंड येथे दादा ठकार,

बारामती येथे नारायण कानडे, वामन फाटक, वामन पागे हे तिघे, तळेगाव दाभाडे येथे एकनाथ कुलकर्णी, घोडनदी येथे भय्या गौतम, इंदापूरमध्ये मधु देव अशा अनेक स्वयंसेवकांना पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय शाखा सुरू करण्यासाठी पाठविले. प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन त्या त्या कार्यकर्त्यांच्या अडचणी बाजूला करण्याचा प्रयत्नही केला जात होता.

पुणे जिल्ह्यातील कामाच्या दृष्टीने मी जिल्हा कार्यवाह. तेव्हा तालुका शाखांच्या भेटीसाठी मी दुपारी बसवर सायकल टाकून गावी पोचत असे व तेथील शाखा, बैठक, गप्पा आटोपल्या म्हणजे रात्री १२ ते १ च्या दरम्यान सायकलीने परत निघत असे – घरच्या ती. आजोबांच्या पहाटेच्या कामासाठी ! या पद्धतीने भोर, सासवड, खेड, शिरूर, दौण्ड या गावांतील संघाचे काम जोपासण्याची खटपट चालू होती. पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या बैठका ३ महिन्यांतून एकदा पुण्यात घेतल्या जात. पुणे जिल्ह्याचे हिवाळी शिबिर १९४० पर्यंत पुणे शहराबरोबरच घेतले जाई.

संघ म्हणजे काय ?

संघ म्हणजे शाखा, तर शाखा म्हणजे येणाऱ्या प्रत्येक घटकाचे विविध कार्यक्रमाद्वारे गुण जाणणे व त्यांचा विकास करणे.

हिंदुसमाजातील कोणत्याही पोटजातीचा कोणीही घटक संघाच्या शाखेवर हिंदुसमाजमनाचा होतो व त्यांचे गुण जाणूनच त्या त्या स्वयंसेवकाला कार्य करण्याची, प्रामाणिक तयारी करण्याची संधी दिली जाते संस्कार केले जातात.

प्रत्येक संघशाखेत हीच एकमेव दृष्टी निर्माण केली जाते.

त्यामुळे संघाची प्रत्येक शाखा म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघच असतो.

त्या शाखेवर सर्व अनुभव, स्थित्यंतरे, परिवर्तने एकेका घटकामध्ये घडून येतात–येत जातात.

प्रांतिक बैठकीच्या दृष्टीने कुलाबा जिल्ह्यातील कामासाठी अलिबाग येथे रघुवीर क्षीरसागर यांना पाठविले. ६ महिन्यात तेथे शाखा सुरू झाली. धुळ्याकडे नासिकहून व कोल्हापूर येथे सांगलीहून स्वयंसेवक पाठविण्यात आले.

पुण्याचे काम मा. विनायकराव पाहू लागले तरी माझी जबाबदारी कमी झाली नव्हती. पुण्यातील प्रत्येक उत्सवाला नवे प्रतिष्ठित अध्यक्ष व उत्सवाची संपूर्ण व्यवस्था एकेका शाखेकडे सोपवून त्या त्या शाखेला काम करणाऱ्या स्वयंसेवकांचा गट मिळवून देण्याचे दृष्टीने प्रत्येक उत्सवाची योजना केली जावी असे मी स्वतः करीत असे. त्यामुळे कार्यकर्त्यांची स्वाभाविक ओळख, विश्वासार्ह लोकांची यादी वाढत जात होती.

मी सर्व पाहात असलो तरी माझी इच्छा संघचालक मंडळींशी स्वयंसेवकांनी आदरपूर्वकच वागावे. तशा तऱ्हेने गंज पेठेतील शाखेत मा. संघचालक, शहर कार्यवाह यांना आवर्जून बोलावून त्यांचे मोठेपण संघबंधूंना आपल्या वागण्याने पटविण्याचा माझा प्रयत्न मनापासून होता.

१९३७ पर्यंतच्या कार्यात त्याची मी कसोटीही पाहात असे. पुणे शहर, पुणे जिल्हा व १९३८ साली प्रांतिक बैठक घेता यावी यासाठी प्रांत स्तरावरचे प्रयत्न हे मी करीत होतो.

पुणे शहराच्या दसरा उत्सवाला वरचढ प्रतिष्ठेची मंडळी बोलाविण्याचे दृष्टीने सतत दृष्टी ठेवली होती. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कामत, केशवराव कानिटकर, सुरू, महाजनी इत्यादी अनेकांना संघाच्या उत्सवाला बोलाविण्याचे काम करण्यासाठी योग्य मंडळी हुडकण्याची खटपट असे. जेथे कोणी मिळणार नाही तेथे स्वतः पुढे व्हावयाचे असा माझा खाक्या होता. १९३७ मध्ये तृतीय वर्ष शिक्षित झाल्याने पुण्यात माझा जरुरीपेक्षाही जास्त वचक होता. पुणे जिल्ह्याच्या कामात स्वयंसेवक बंधूंचे भरपूर सहकार्य घेऊन तालुकानिहाय शाखा सुरू होत होत्या. त्या शाखांचे उद्घाटनाचे कार्यक्रम जिल्हा संघचालक मा. भाऊराव अभ्यंकर यांच्या उपस्थितीत करण्याच्या योजना १९३७ मध्ये लागोपाठ झाल्या. तळेगाव दाभाडे येथील शाखा उद्घाटन पुण्यातील २०० सायकलस्वार स्वयंसेवकांनी तेथे येऊन अत्यंत उत्साहपूर्ण पद्धतीने पार पडले. बारामती, इंदापूर, दौंड या शाखाही अशाच सुरू करण्यात आल्या.

१९३७ साली पुण्यातील सर्व उत्सव उत्तम तऱ्हेने पार पडले व अधिक कार्यकर्ते उपलब्ध झाले. हिवाळी शिबिरही अरण्येश्वर येथे अधिक विस्तृत जागेवर संपन्न करण्यात आले. आमच्या घरी सतत पुणे कार्यकर्त्यांच्या बैठकी होत असत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सततच्या आठवणीने सुपापरगणा, सुरत या ठिकाणी शाखा काढण्याच्या दृष्टीने आठवण दोन बैठकीत करण्यात आली. सुपा येथे घोषातील बाळू लिमये यांना २ महिने पाठविण्यात आले. सुरत येथे शामराव वैद्य यांनी ६ महिने जाऊन शाखा निर्माणकार्य केले. एका बैठकीत सुरतला कोण जाण्यास तयार आहे असे विचारताच श्री. शाम (सांब) वैद्य यांनी ताबडतोब मान्यता दिली. त्यांच्या घरी जाऊन आईंना भेटून सर्व योजना सांगून सुरतेला शाम वैद्य गेले व ६ महिन्यात २ शाखा सुरू करून परत आले.

मनातल्या कल्पनांना मिळणारी ही साथ वाढतच चालली असे आढळून आले.

स्वयंसेवकांशी संबंध येताना मी संघाचे वाढते कार्य! प्रत्येकाशी बोलत असे स्वयंसेवकांनी स्वतःची सिद्धता करीत राहिले पाहिजे, सांगतील तेव्हा कोठेही कार्यासाठी जाता आले पाहिजे. हा माझा वैचारिक दण्डक होता.

स्वयंसेवकांचा जीवनक्रम

पू. डॉक्टरांशी बोलण्याच्या दृष्टीने एकदा कॉलेजमधील विद्यार्थी बैठकीसाठी आले. श्री. पाटणकर नावाच्या विद्यार्थ्याने प्रश्न विचारला की, "मी लग्न करून संघाचे कार्य करावे की लग्न न करता करावे?" पू. डॉक्टरांचे उत्तर इतके चपखल होते की, आम्ही सर्व चकित झालो. पू. डॉक्टर म्हणाले की, "असा नियम ठरलेला नाही. ज्याने त्याने आपला स्वभाव, प्रवृत्ती याचा विचार करूनच ते ठरवावे. पण एक कसोटी आहे की, प्रत्येक तरुण कार्यकर्त्याने स्वतःच्या स्वभावात पाहावी. आपण संघाच्या कार्यक्रमास १ तासापासून २४ तासापर्यंत जातो. परत आल्यानंतर ज्या स्वयंसेवकाला असे वाटेल की २–३ तास वा अधिक तास वेळ फुकट गेला. अशा स्वयंसेवकांनी योग्य वेळी लग्न करावे व १ तासाची शाखा पक्की ठेवून जमेल तेवढे अधिक काम करावे. ज्यांना संघाचे कार्यक्रमात गेलेला वेळ सत्कारणी लागला, चांगला गेला असे वाटेल त्यांनी लग्न न करण्याचा विचार करून पाहावा. सच्छीलपणे राहणे जमेल असे वाटले तर

लग्न न करण्याचे ठरवावे. पण पुढे केव्हाही कोणत्याही कारणाने मनाची चल-विचल झाली तर लग्न करून संघाचे काम करीत राहावे. कोणत्याही कारणाने आपण समाजात दुराचाराला कारणीभूत होता कामा नये हा संघजीवनातील फार मोठा दंडक आहे." पू. डॉक्टरांचे हे उत्तर पुण्यात बरेच कर्णोपकर्णी झाले होते. कार्यकर्त्यांवर याचा सुपरिणाम दिसून आला. जीवनक्रमातील केवढे रहस्य पू. डॉक्टरांनी उलगडून सांगितले असेच अनेकांना वाटले.

१९३७ साल पुणे जिल्ह्यातील कार्यवाढीत व स्थिरतेत गेले. तिसऱ्या वर्षाच्या १३ स्वयंसेवकांच्या पुण्यातील उपस्थितीमुळे पुणे शहराला शारीरिक शिक्षण प्रमुख, बौद्धिक प्रमुख, कार्यालय प्रमुख इत्यादी स्थानावर मंडळी नेमता आली. शाखा व्यवस्थेत सर्व स्थानांवर नेमणूक करता येणे व ते ते काम जबाबदारी दिलेल्या स्वयंसेवकांनी मनापासून करणे हे संघटनेच्या मजबुतीचे लक्षण असते. त्या दृष्टीने पुणे शाखेचे पाऊल सतत पुढे होते. तिसऱ्या वर्षाच्या शिक्षित १३ स्वयंसेवकांनी पुणे शाखेत मौलिक भर घातली. त्याबद्दल मला फार समाधान वाटले.

मी जिल्ह्याचे काम पाहू लागलो तरी पुण्यातील महत्त्वाच्या गोष्टीत भाग घेण्यात मी मागे राहिलो नाही याचे मला समाधान वाटते. १९३८ मधील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मकरसंक्रमणचा उत्सव औंधचे राजे भवानराव पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली झाला अन् त्या दिवशी सुप्रसिद्ध माटेमास्तर यांनी विचारपूर्वक संघाची प्रतिज्ञा घेतली.

या कामी संघाच्या कार्यवाढीमध्ये मी अनेक हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते रा. गो. भिडे, ज. स. करंदीकर, अण्णासाहेब भोपटकर, तात्यासाहेब केळकर यांना भेटत असे. पुण्यात १८ शाखा सुरू झाल्यानंतरही मी सर्वांना भेटावयास गेलो होतो. जवळ जवळ सर्वच मंडळींनी सूर लावला की, देवकुळे, नागपूरचे हे कार्य फार अर्धवट आहे. समजा ना की नागपूरची संत्री पुण्यात पिकणे फार कठीण आहे. तुम्ही करता आहात–करा काम, पण बघा जमणार नाही. पुण्यात स्वयंसेवकांच्या उत्साही सहकार्याने १८ शाखा सुरू होऊनही मंडळींचे म्हणणे लक्षात घेता येईना. १९३६ व १९३७ या वर्षांत "केसरी" द्विसाप्ताहिक या वृत्तपत्राने संघाच्या स्वयंसेवकांचे "कार्याच्या फोलपणाबद्दल" चे, "तारुण्य वाया जात असल्याबद्दल" चे, "संघाच्या कार्यशैलीबद्दल" चे असे

लेख प्रसिद्ध करण्याची मोहीम सुरू केली होती. किर्लोस्कर मासिकानेही असे काही लेख प्रकाशित केले होते. त्या लेखांचे वाचन शाखांशाखांवरून मुद्दाम करण्यात यावे, आणखी शाखा काढण्याचा एक विचार समारोपादाखल बोलला जावा असेही मी योजले. संघाच्या शाखांवरून वरीलपैकी कोणी संपादक, प्रतिनिधी वा वार्ताहर कधी आले नाहीत आणि लेखांतील वर्णने वस्तुस्थितीशी विसंगतच असल्याचे अगदी साधा स्वयंसेवकही सांगू शकत असे.

संघाच्या चालू शाखांतून १ तास शारीरिक, बौद्धिक, लष्करी व खेळांचे कार्यक्रम होत. ज्या शाखेवर कार्यक्रम उत्तम होत त्या शाखेवर संख्या चांगली असे. बौद्धिक कार्यक्रमाद्वारे प्रत्येक स्वयंसेवक आपले विचार मोकळेपणाने सांगण्यास कसा तयार होईल हे पाहिले जाई. याशिवाय शाखेच्या साप्ताहिक बैठका, पद्य–प्रार्थना यांचे पाठ, आजारी स्वयंसेवकांच्या भेटी, शाखेच्या कार्याचा साप्ताहिक आढावा, सहल (पायी वा सायकलने) यासारखे कार्यक्रम विचारात घेतले जात. गंजपेठ शाखेवर हे नियमित होत असलेले मी पाहात असे. तृतीय वर्ष शिक्षितांवर हा सर्व भार सोपविला होता. गंजपेठ शाखेचे एक

संघाचा गणवेष

लष्करी कार्यक्रमासाठी सर्वांचा सारखा असा खाकी कापडाचा गणवेष, खांद्यावर R. S. S. बॅजेस, बंदुकीप्रमाणे 'दंड' बूट, पटीज्, पुंगळ्या ऑफिसर्स लोकांना क्रॉसबेल्ट, केन इत्यादी सर्व गोष्टी १९३३ ते १९४० अत्यंत निष्ठापूर्वक संघात वापरल्या गेल्या. १९४० मध्ये 'समता' कार्यक्रम संस्कृत आज्ञा, पांढरा शर्ट, साधे अर्धे काळे बूट यासारखे बदल करण्यात आले. पण दर आठवड्यास एक दिवस शाखेवर पूर्ण गणवेषासह समता कार्यक्रम घेण्यामुळे सर्व स्वयंसेवकांत स्वच्छता, नीटनेटकेपणा, शिस्त यांची स्वाभाविक आवड निर्माण होते हा अनुभव व वअशी ही आवड जीवनातील सर्वच गोष्टींना इष्ट वळण लावते. पुण्यातील फळेदलाल लक्ष्मणराव सीताराम काची यांनीही संघाचा जुना पूर्ण गणवेष घालून स्वतःला व इतरांना एक गोड धक्का दिला होता. संघाचा गणवेष निष्ठापूर्वक वापरणाऱ्या हिंदू बांधवांना पुष्कळ मौलिक गोष्टी प्राप्त झाल्या.

पालक बळीराम शेठ रजपूत यांनी स्वयंसेवकांना जेवण द्यावयाचे आहे असे मला सांगितले. किती मंडळी बोलावू असे विचारले तेव्हा ते म्हणाले, २५ पर्यंत बोलवा. मी शाखेच्या ९०–१०० उपस्थितीतून २५ पोटजातीचे १–१ संघबंधूस बोलाविण्याचे ठरविले. लाडूचे पक्वान्न केले होते. सर्व मंडळी जेवावयास बसल्यानंतर मी प्रत्येकासमोर बळीराम शेठ यांना नेले. परिचय करून दिला. नाव व पोटजात सांगत गेलो. महार, मांग, ढोर, घेड, चांभार, गुजराथी, किराड २ जाती, काची ८ जाती, लिंगायत, ब्राह्मण, मराठा, मारवाडी २ जाती, जैन २ जाती, महानुभाव अशा सर्व जातींचे, डाळवाले २ अशा जातींचे स्वयंसेवक शाखेत येणारेच होते. सर्वांचा परिचय झाल्यावर बळीराम शेठ यांच्या डोळ्यांत पाणी आले. कारण विचारता ते म्हणाले, सात जन्म घेऊनही हे पुण्य लाभणार नाही. मला अनंद झाला. जेवण उत्तम रीतीने पार पडले व संघकार्यास धारच चढली. १९३८ मधील गुरुदक्षिणे-साठी प्रत्येक स्वयंसेवकनिहाय बोलणे झाले व पुण्याची ११०० रु. गुरुदक्षिणा जमा झाली. कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला.

ईस्टरच्यी १९३८ ची सुटी

१९३८ च्या इस्टरच्या सुटीचाचा फायदा घेवून मा. भाऊराव अभ्यंकर यांनी वकील मंडळींचे एक जेवण ठरविले. संघाला मिळालेल्या उद्यान कार्यालयात भोजनाचा बेत झाला. ३५० आमंत्रणातून ११० वकील मंडळी येऊ शकली. जवळ जवळ ५०–६० मंडळींच्या " क्षमस्व " चिठ्ठया आल्या. (परगावी गेले म्हणून).

या जेवणासाठी खर्च भाऊराव व दोन तीन वकील मंडळींनी केला. जेवणाचे आधी मा. भाऊरावांनी संघाच्या ३–४ वर्षाच्या कार्याची माहिती सांगून डॉ. हेडगेवार यांचा परिचय करून दिला. हा कार्यक्रम फारच चांगला झाला. पुण्यातील कार्याला गती देणाराच ठरला. मी त्यात सर्वस्वाने सहभागी होतो.

१९३८ चा दसरा उत्सव

पुणे शहराच्या १९३८ च्या दसरा उत्सवासाठी युरोप खंडात प्रवास करून आलेले जनरल नानासाहेब शिंदे या बडोदा राज्याच्या सेनापतींना बोलवावे

असे मी सुचविले व त्याप्रमाणे बडोदा शाखेतर्फे ते आमंत्रण त्यांनी स्वीकारले व पुण्यातील कार्यकर्त्यांना धन्य वाटले. तयारी चालू होती. जवळ जवळ २००० तरी गणवेषधारी स्वयंसेवक घोषपथकासह संचलनात येतील अशी खटपट सुरू झाली. दसरा उत्सवाच्या आमंत्रणपत्रिका सर्वत्र गेल्या. ५–६ दिवस अगोदर जनरल शिंदे यांचे पत्र आले की, मी येऊ शकत नाही. मा. विनायकराव यांचे घरी प्रमुख कार्यकर्ते जमले. आता काय करावे याची चर्चा सुरू झाली. त्यांना तार करावी, दुसरा कोणी पाहावा वगैरे बोलणे सुरू होते. मी मा. विनायकरावांना सांगितले की दुपारच्या ३। च्या गाडीने जाऊन पुढे गुजराथ मेलने बडोद्यास जाऊन जनरल शिंदे यांना भेटून त्यांचे येणे पक्के करून येतो. काही म्हणाले, "वसंतराव, कसे जमणार ? ते सेनापती आहेत !" माझ्या मनाची धारणा अगदी वेगळी होती. संघाच्या विजयादशमी उत्सवासाठी यावयाचे अध्यक्ष किती दीर्घ विचाराने ठरविले अन ते एकदम येत नाही कळवितात ! वाटेल त्या परिस्थितीत त्यांना आणावयाचेच हीच माझी धारणा ! मी गेलो व बडोद्याला सकाळी ७ ला पोचलो. टांगा करून श्री. बाबूराव आपटे हे बडोद्याचे मा. संघचालक होते. रावपुरा भागातील त्यांच्या घरी पोचलो व परिचय होताच येण्याचे कारण सांगितले. जनरल नानासाहेब शिंदे यांना भेटावे हेच आवश्यक ! मा. बाबूरावांनी किंचित अडचण सांगितली ! मी म्हटले, मला त्यांच्याकडे घेऊन जा व हवे तर लांबून दाखवा. मी पुढचे काम करीन. माझे स्नान, चहा कार्यक्रम उरकून आम्ही शिंदे यांच्या निवासस्थानी गेलो. मा. बाबूरावांनी माझा परिचय करून दिला. मी पुण्याहून आलो असे कळताच जनरलसाहेबांनी उठून मला नमस्कार केला. मी नम्रपणे पत्राची हकीकत सांगितली व होणारा घोटाळा वर्णन केला. त्यांना बोलाविण्याचे कारण सांगितले. दसरा उत्सवाचे महत्त्व सांगितले. २००० गणवेषधारी स्वयंसेवकांचे संचलन त्यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याचे सांगून प्रकृतीची चौकशी केली. तेव्हा जनरल नानासाहेब म्हणाले, तसे विशेष काही नाही, पण प्रवास नको असे वाटले म्हणून कळविले. त्यावर मी माझ्या बाजूने सर्व प्रकारे त्यांची समजूत काढली. फर्स्ट क्लासने या, व्यवस्था काय ठेवू सांगा, असे सर्व तऱ्हेने महत्त्व पटविल्यावर जनरल नानासाहेब म्हणाले, देवकुळे, माफ करा, मला काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे मी साधा कार्यक्रम समजलो म्हणून मी येत नाही असे सहज कळविले. आता मी येतो. माझी व्यवस्था न्या. मू. माडगावकर

यांच्याकडे राहील. त्याची काळजी करू नका. विजयादशमीच्या आदल्या दिवशी सकाळी मी माडगांवकर यांच्याकडे भेटेन. चहा-फराळ घेऊन मी व मा. बाबूराव आपटे घरी परतलो व दुपारी बडोद्याहून निघून पुण्यास पोचलो. १९३८ चा हा दसरा उत्सव उत्तमच झाला. दसऱ्याच्या दिवशी ६॥ ते ८ या वेळात दोन हजार स्वयंसेवकांचे संचलन भर पावसात झाले. समारोप डेक्कन जिमखाना मैदानावर झाला. जनरल नानासाहेब यांचे भाषण अत्यंत उत्साहवर्धक व स्फूर्तिदायक झाले. संघकार्यात बोलल्याप्रमाणे वागणे याचेच महत्त्व सर्वाधिक असल्याने संघशाखेचे वर्णन सर्वसाधारण लोकांसाठी असे करता येते की, ज्या ठिकाणी एक तरी हिंदुसमाजाचा घटक माझ्या वागण्याकडे पाहा–चुकत असेल तर सांगा, असे म्हणू शकतो ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा समजावी.

पहिली प्रांतिक बैठक

दसरा संपताच २४–२५ डिसेंबर १९३८ या दिवशी पहिली प्रांतिक बैठकीची तयारी सुरू झाली. १॥ वर्षाच्या प्रयत्नाने प्रांताच्या तेराही जिल्ह्यांत संघकार्य सुरू झाले होते व तेराही जिल्ह्यांतून प्रांतिक बैठकीला कार्यकर्ते येतील असा संभव दिसू लागला. जनरल नानासाहेब शिंदे यांच्या उपस्थितीतील दसरा उत्सवाची चर्चा करीत संध्याकाळी मा. विनायकराव आपटे, मी, २–४ संघबंधू शिवाजी मंदिरात बसलो होतो. मी सुचविले की, आज दसरा आहे. तुमच्या वकील मंडळींचे या वर्षी जेवण झाले आहे. प्रतिज्ञा घेण्याच्या दृष्टीने कोणी येतील का ? कोणाला बोलावू ? मा. विनायकरावांनी माझी सूचना ताबडतोब स्वीकारून डाव्या हाताचे ब. ना. भिडे व उजव्या हाताचे श्री. आप्पासाहेब लेले यांना बोलाव म्हणून सांगितले. जवळच्या स्वयंसेवकांस स्तंभ, ध्वज, फुले आणावयास सांगून मी. ब. ना. भिडे व लेले यांना बोलावून आलो.

ध्वज लावून, हार घालून तयार होऊन विनायकरावांनी मा. ब. ना. ऊर्फ बाबा भिडे व श्री. लेले वकील या दोघांना संघाची प्रतिज्ञा प्रथम म्हणून दाखविली. त्याचा २–४ वाक्यांत अर्थ सांगून एकेकाला प्रतिज्ञा दिली. दसरा उत्सवाच्या मुहूर्तावर या दोन प्रतिज्ञा झाल्याचे समाधान वाटले.

यानंतर प्रांतिक बैठकीची जागा, कार्यक्रम या बाबतीत मा. काशीनाथपंत यांचेशी पत्रव्यवहार करून सर्व पक्के केले.

सदाशिव पेठेतील गोपाळ हायस्कूलच्या हॉलमध्ये प्रांतिक बैठकीची जागा ठरली. लोकांच्या राहण्याची सोय उद्यान कार्यालय येथे ठरविण्यात आली. दोन दिवसांच्या प्रांतिक बैठकीला पुण्यातून काही मंडळींना बोलाविले होते. प्रश्नोत्तरांचा म्हणून १॥ तास ठेवण्यात आला होता. मा. काशीनाथपंत लिमये, बापूसाहेब मोडक (ठाणे), डॉ. मुळे (सोलापूर), वैद्य वकील (कुलाबा), मा. पटवर्धन (रत्नागिरी), भाऊसाहेब मोडक (सातारा), डॉ. खानोलकर (नगर), डॉ. चितळे (महाड), दादा नाईक (मुंबई), भाऊराव अभ्यंकर, विनायकराव आपटे, भाऊसाहेब देशमुख, लेले वकील, ब. ना. भिडे वकील बॅ. आगरवाल इ. मंडळी उपस्थित होती. अनेक जिल्हा कार्यवाह, माधवराव गोडबोले असेही संघबंधू होते. एकूण ७६ ते ८० संघघटक या प्रांतिक बैठकीस उपस्थित होते. सर्व जिल्ह्यांचे अहवाल, मोठ्या शहरांचे अहवाल

अशी उदाहरणे अनेक

१९४४–४५ च्या सुमारास बी. ई. परीक्षा पास झालेले एक संघबंधू शिवाजीनगर रेल्वे स्टेशनवर गाडीची वाट पाहात उभे होते. चांगलाच परिचय असल्याने चौकशी केली, तेव्हा हातातील कागदपत्र मजकडे देऊन म्हणाले, 'एका सरकारी खात्यातील जागेसाठी मुलाखतीकरिता जात आहे.' तेव्हा मी म्हटले, 'कशाला नौकरी करतोस? स्वतःचा धंदा काढण्याचे दृष्टीने प्रयत्न करणे जास्त बरे! आपले कार्य करण्यासाठी भरपूर वेळ मिळण्यासाठी आपापला धंदा असणेच इष्ट!' ते संघबंधू मुंबईला जाऊन आले पण नौकरी न पत्करता स्वतःचाच उद्योग सुरू केला, आज सर्व दृष्टींनी ते स्वयंसेवक आपल्या धंद्याकडे लक्ष देतात. प्रांतात संघकार्यासाठी हिंडू शकतात! अशी उदाहरणे अनेक असल्याने अनेक जण संघकार्यासाठी वेळ देऊ शकतात.

सांगण्यात आले. पू. डॉक्टरांनी विचारलेले प्रश्न व माहिती या दृष्टीने कार्यकर्त्यांनी उत्तरे दिली होती.

प्रश्नोत्तरांच्या तासाच्या वेळी एक-दोन प्रश्न नागपूरच्या कार्याबद्दल विचारले गेले. पू. डॉक्टरांनी त्या प्रश्नांची उत्तरे दिली. नंतर मा. ब. ना. (बाबा) भिडे यांनी परवानगी मागून प्रश्न विचारले. बरेचसे प्रश्न आचारधर्माबद्दल होते. पू. डॉक्टरांनी सांगितले की, संघात सर्व हिंदूंचा समावेश आहे. त्यामुळे भगवा ध्वज हा गुरु, त्याला प्रणाम, त्याचे पूजन एवढाच आचारधर्म संघात पाळणे शक्य आहे. हिंदूंच्या एकजिनसी संघटनेसाठी आपण आहो ही भावना महत्त्वाची ठेवली जावी. मा. बाबांनी प्रार्थना-प्रणाम यातील पद्धती, दररोजच्या शाखेची गरज, वेळ याबाबत शंका विचारल्या. ही प्रश्नोत्तरे केव्हा संपणार असा प्रश्न सर्वांनाच पडला. पू. डॉक्टरांच्याही ते लक्षात आले; तथापि त्यांनी सर्वांनाच सांगितले की, प्रश्नोत्तरांचाच विषय आहे, तेव्हा बाबांचे प्रश्न संपेपर्यंत मी उत्तर देणारच, वेळ संपली तर आपण थांबू. पहिल्या प्रांतिक बैठकीतील हा प्रश्नोत्तर कार्यक्रम संपविताना पू. डॉक्टर यांनी सांगितले की, संघकार्याबद्दल नीट विचार करणाऱ्याला प्रश्न येणारच व ते एकदा समजून घेतले तर कार्य करणे सोपे असते. आजच्या प्रश्नोत्तरात बाबा भिडे यांनी विचारलेले प्रश्न कार्याची माहिती घेण्यासाठीच होते. त्याबद्दल बाबांनी काळजी करू नये.

पू. डॉक्टरांचे समारोपाचे भाषण त्याच दिवशी रात्री झाले. महाराष्ट्र प्रांताची पहिली बैठक अशा तऱ्हेने झाल्याबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले. १९३८ चा संघशिक्षा वर्ग भावेस्कूल (पेरु गेट)च्या प्रशस्त जागेत झाला होता व १९३८ चे शिबिरही अरण्येश्वर मैदानातच झाले.

प्रांताच्या बैठकीमुळे महाराष्ट्र प्रांताचे कार्य नीट रीतीने चालू झाले. अनेक महत्त्वाच्या गोष्टी या वर्षात घडल्या व कार्याचे पाऊल चांगल्या तऱ्हेने पुढे पडले. पू. डॉक्टरांना समाधान वाटल्याची पत्रे पुण्यातील कार्यकर्त्यांना आली. पू. आप्पाजी जोशी यांचे पुणे शहराचे कार्य व त्यातील कार्यकर्ते यांच्याशी अगदी जवळचे संबंध होते. पू. आप्पाजी यांनी १९३८ पासून दर वर्षी रक्षा-बंधनाच्या निमित्ताने पुण्यातील सुमारे ५० पर्यंत कार्यकर्त्यांना रक्षा पाठ-विण्यास सुरुवात केली. त्या त्यांच्या मृत्यूपर्यंत सतत येत असत.



नगर जिल्ह्यातील संघकार्य

१९३६ ते १९३८ वा पुढेही पुणे विभागातील नगर शहर व जिल्ह्यात संघाचे काम फारच कठीण परिस्थितीत वाढले. नगर येथील आयुर्वेद महाविद्यालयात चांदा येथील श्री. बाबूराव मोरे व मध्यप्रांतातील अन्य तरुण मंडळी नगरमध्ये आयुर्वेद शिक्षणाकरिता आली व त्यांनी संघाचे कार्य सुरू केले. त्या वेळी नगरमध्ये पटवर्धन बंधूंचे बडे घराणे समाजवादी तत्त्वज्ञानाने भारले गेले होते व त्यांच्यासमोर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य म्हणजे प्रतिगामी, राष्ट्रघातक असल्याच्या त्यांच्या कल्पना ते हिरीरिने मांडत असत. संघाचे कार्य नगरमध्ये होऊ न देण्याची त्यांची खटपट कशीही होती, तरी श्री. बाबूराव मोरे हे फार निष्ठावान स्वयंसेवक होते, उत्तम संघटक होते. त्यांनी नगरमधील तथाकथित विरुद्ध खटपटींचे स्वागत केले व नगरमधील संघकार्य पद्धतशीरपणे वाढविले. तो सर्व इतिहास मीही डोळ्यांनीच पाहिला व सर्व संघबंधूंना बाबूरावांचे योजनेप्रमाणे वागण्यास सांगितले.

१९३९ च्या तृतीय वर्ष शिक्षणासाठी श्री. अनंतराव देवकुळे व अन्य २० जण गेले होते. श्री. अनंतराव देवकुळे हे १९३२ पासून प्रल्हाद नावाचे स्काऊट पथक चालवीत होते. १९३४ पासून दर गुरुवारी बौद्धिक वर्गाला यावे असे मी सुचविले. श्री. माधवराव लिखिते व अनंतराव यांचे हे प्रल्हाद पथक महाराष्ट्र स्काऊट असोसिएशनशी संलग्न होते. १९३६ च्या सुरुवातीस त्या असोसिशनशी मतभेद झाले भारतनिष्ठेवरून ! तेव्हा अनंतराव यांनी पथक संघात विलीन करावयाचे ठरविले व शिवाजी मंदिरात बालशाखा म्हणून स्वतंत्र सुरू केली. श्री. अनंतरावांना लहान मुलांना वागविणे, शिस्त लावणे, उत्तम जमत असे. सुमारे २०० पर्यंत उपस्थिती शिवाजीमंदिर बालशाखेची असे. पू. डॉक्टरांनी १९३६ मध्ये ती शाखा स्वतंत्रपणे पाहिली व अनंतरावांचा आणि त्यांचा परिचय वाढला.

कर्नाटक प्रवास

१९३७–३८ पासून पुणे शाखेच्या कार्यातील माझे लक्ष किंचित कमी कमी झाले. पू. डॉक्टर, मा. काशीनाथपंत यांचेशी बोलून मी १९३९ च्या सुरुवातीस कर्नाटकातील पाच जिल्हा स्थानी ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या प्रचा-

रार्थ जावे असा विचार केला. पुणे येथून बेळगाव, धारवाड, हुबळी, गदग, विजापूर या गावांतील संबंधी लोकांची माहिती मिळवून १५ दिवसांचा प्रवास आखला. जाताना प्रत्येक गावी २–२ दिवस व परत येताना १–१ दिवस याप्रमाणे थांबून जास्तीत जास्त मंडळींच्या भेटी घेऊन १९३९ च्या मे महिन्यातील वर्गाला (ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पला) येण्याच्या दृष्टीने तयारी याबद्दल प्रचारात्मक खटपट करून आलो. गदग या गावाशिवाय चारही ठिकाणचे मिळून २७ स्वयंसेवक पुणे ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पात आले.

कर्नाटकातील प्रवासात बेळगाव येथे काँग्रेसचे कर्नाटकसिंह श्री. गंगाधरराव देशपांडे यांना भेटलो. पुण्यात माझे आजोबा वासुकाका जोशी यांची ओळख असल्याने मला ते ओळखत असत. बेळगावच्या मुक्कामात त्यांच्या भेटीत चर्चेवरून निघाले की, युवकांना शारीरिक दृष्ट्या मजबूत करण्याचे धोरण राष्ट्रीय कार्य ठरले पाहिजे. रा. स्व. संघाचे कार्य चालले असले तरी संघासारखे आणखी २–४ संघ काम करतील. पूर्वीच्या काँग्रेस सेवा दलासारखी दले आणखी निघाली पाहिजेत. श्री. गंगाधरराव म्हणाले, " देवकुळे, संघातले तुम्ही ! तुमचे विचार फारच प्रगल्भ दिसतात. " मी मात्र पुढे विचारले की, " हर्डीकरांनी सुरू केलेले दल बंद का झाले ? " श्री. गंगाधरराव म्हणाले, " देवकुळे, ते मात्र मला सांगता येणार नाही ! " यानंतर हुबळी मुक्कामात मी डॉ. हर्डीकर यांना त्यांच्या निवासस्थानी मुद्दाम भेटलो. डॉ. हर्डीकरांचा दिवाणखाना फार उत्तम होता. वाघाची कातडी, मोठे कोच, झुंबरे यांनी सजविलेला होता. डॉक्टर हर्डीकरांना मी सांगितले की, " मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक स्वयंसेवक आहे. पण मला उत्सुकता आहे की, आपण स्थापन केलेले हिंदुस्थानी सेवा दल बंद का झाले ? ते पुन्हा सुरू व्हावे. तरुण मंडळी योग्य मार्गावर राहाण्यासाठी दल, संघटना पुरेशा संख्येत वाढल्या पाहिजेत. " डॉ. हर्डीकर यांनी मला उत्तर दिले, " देवकुळे, मी प्रयत्न पुष्कळ केले. पण लोक येईनासे झाले. मग निरुपायाने मी सर्व बंद केले. " कर्नाटकातील वरील दोन्ही नेत्यांच्या भेटीमुळे माझी संघनिष्ठा अधिक स्थिर झाली.

भवानी पेठेतील मार्कंडेय शाखा

इ. स. १९३९ मध्ये जानेवारी महिन्यात विभाग कार्यवाह असताना एक दिवस गंज पेठेत चालणाऱ्या प्रभात शाखेवर गेलो. तेव्हा शाखा भरलेली

नाही. कार्यवाह मळ्ळ्या मिठापेळ्ळी व मुख्य शिक्षक आले नाहीत असे दिसून आले. त्याच वेळेस त्यांचे घरी जाऊन त्या दोन्ही मंडळींची भेट घेतली. ते दोघेही भवानी पेठेत राहणारे! भवानी पेठेतील बहुतांशी पद्मशाली पुण्यातील संघबंधू तिथलेच असल्याने कार्यवाहांना सुचविले की, दुसरे दिवसापासून त्यांची प्रभात शाखा पद्मशाली पुण्याच्या मोकळ्या जागेत भरवावी. त्यांनी मान्य केले व मी स्वतः दुसऱ्या दिवसापासून त्या शाखेवर जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे १९४३ पर्यंत त्या शाखेवर जात असे. १५ पासून ५०–६० पर्यंत उपस्थिती राहू लागली. अनेकांना भेटणे, शाखेवर सर्व कार्यक्रम (लष्करी, शारीरिक, बौद्धिक, खेळ) घेणे सुरू केले. नरसय्या मिठापेळ्ळी नावाचे मध्यम वयाचे संघबंधू लेखन-वाचनाची गोडी असलेले होते. दर आठवड्यास बौद्धिक वर्गासाठी त्यांना विषय देऊन तेलगू भाषेत त्यांना बोलावयास सांगत असे. ते फार उत्तम रितीने विषय तेलगूमध्ये मांडत असत. त्यामुळे शाखेवर पद्मशाली, स्वकुळसाळी, नाना पेठेतील काही व्यापारी, किराड अशा मंडळींचा या प्रभात शाखेवर चांगला संबंध आला. श्री. मुरलीधर शेट किराड (१९८३ मधील सहसंघचालक) विठ्ठलराव रजपूत, इंद्रजित डावरे (वकील), रामकृष्ण इट्टम, शंकरराव अंदे, विठ्ठल गड्डम्, यल्लाप्पा कस्तुरे अशा मंडळींचा या शाखेवर

वेळ होत नाही!

समाजात माणसे विविध तऱ्हेने वावरत असतात; पण समाज-राष्ट्रहित साधणाऱ्या अनेक गोष्टींपासून ते दूरच असतात – कारण सांगतात, 'वेळ होत नाही.' संघाच्या दैनंदिन शाखेवर १ तासभर जाण्यासाठी याच अडचणी! अर्थात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संघकार्याचे – शाखेचे – साजाजिकदृष्ट्या महत्त्व समजून येताच ते फार आत्मीयतेने संघकार्यात गढून जातात. मग त्यांना वेळ काढता येतो. अनेक व्यक्ती आपल्या वेळेचा नीट विचारच करीत नाहीत. दिवसभराच्या कार्यक्रमात, सुटीच्या दिवसात फुकट जाणारा वेळ संघकार्यात घालवावा असे म्हणणाऱ्या व तसे वागणाऱ्या संघबंधूंनी इतरांनी वेळ कसा काढावा यासाठी आपले अनुभव सांगून अनेकांना कार्यास प्रवृत्त करणे जरूर आहे.

चांगला संबंध आला. श्री. शंकरराव अंदे हे भक्तीमार्गी, वारकरी पंथी, पद्मशाली समाजात मान्यता पावलेले असे घरंदाज गृहस्थ. शाखेबद्दल अत्यंत जागरूक होते. या शाखेच्या कार्यात पहाटे ५॥ पासून मी भाग घेत असे. सप्टेंबर १९३९ मध्ये पू. डॉ. हेडगेवार यांच्या पुण्याच्या भेटीमध्ये या शाखेचे नामकरण करण्याचा कार्यक्रम भवानी पेठेतील मार्कंडेय मंदिरात योजला. सर्वांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तयारी केली होती. पू. डॉक्टरांचे आगमन ठरल्याप्रमाणे झाल्यावर त्यांनी प्रथम मूर्तीचे दर्शन घेतले व मार्कंडेयाच्या सत्वशील वागणुकीचे बहारीचे वर्णन केले व 'मार्कंडेय' (प्रभात शाखा) नाव सार्थ करण्याचे प्रेमळ आवाहन केले. थोड्या दिवसांनी मुरलीधरशेट किराड यांच्या घराच्या मोकळ्या जागेत ही शाखा भरू लागली. सर्व काम तेच पाहू लागले. आठवड्यातून एकदा गणवेषाचा कार्यक्रमही घेण्याची माझी खटपट शाखेत संघप्रेम वाढविण्यासच उपयोगी पडत होती. १९४८ च्या संघ-सत्याग्रहात या शाखेतून ३७ संघबंधूंनी (सर्वात जास्त संख्या) भाग घेतला होता. शहराच्या या भागात विडी बनविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर चाले. घरोघरी चाले. तसेच मिठापेल्ली, इट्टम गड्डम, अशा मंडळींचे हातमागही होते. घरोघरीच्या संबंधांमुळे घरातील स्त्रियासुद्धा शाखेच्या कार्याच्या दृष्टीने घरातील मंडळींना उठवून शाखेवर पाठविणे, अशा प्रकारचे बहुमोल सहकार्य मिळाले होते. मार्कंडेय प्रभात शाखेचे कामात मला मिळालेले यश अत्यंत समाधान प्राप्त करून देणारे ठरले. दररोज शाखा संपल्यावर श्री. डावरे वकील, विठ्ठलराव रजपूत, मुरलीधर किराड अशी आम्ही मंडळी गोकुळवस्ताद, हमालांची तालीम अशा निरनिराळ्या तालमीत १–१ महिना कुस्ती खेळत असू. नंतर रामेश्वरापर्यंत येऊन तेथील अमृतेश्वर दुकानात रबडी (दुधाची मलई) खात असू. हे कार्यक्रम सतत चालू होते. त्यात फार मजा येत असे. आजही या शाखेचे काम व मंडळींचे संबंध चांगले आहेत.

पू. डॉक्टर पंधरा दिवस होते. त्या अगोदर प्रकृती बिघडल्यामुळे ते एप्रिल १५ ते २२ – १९३९ विश्रांतीसाठी देवळाली येथे मा. बाबासाहेब घटाटे यांच्याकडे राहाण्यास येणार होते. पू. गुरुजी पण त्यांच्याबरोबर होते. मी सर्वांना भेटण्यासाठी २–३ दिवस देवळाली येथे गेलो होतो. मी गेलो तेव्हा डॉक्टर मनमाडला कार्यक्रमासाठी गेले होते. रात्री केव्हा तरी २–३ वाजता ते

आले. त्या वेळी त्यांना ताप आला होता. तसेच झोपले. सकाळी उठल्यानंतर कमीजास्त गोष्टी झाल्या. माझ्या कर्नाटक प्रवासाची हकीकत व परिणाम सांगितला. डॉक्टरांनी आनंद व्यक्त केला. इ. स. १९३९ च्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमध्ये मी मुख्य शिक्षक होतो. त्या वेळी शिक्षकांच्या शिकविण्याची पद्धत याबद्दल चर्चा केली. प्रत्येक विषयाच्या शिक्षणातून चांगले तयार होणारे संघबंधू लक्षात घेऊन त्यांना उत्तेजन दिले पाहिजे, असे सांगत असे. १९३९ मध्ये कर्नाटकातील चार गावांतून आलेल्या स्वयंसेवकांचा परिचय वाढावा असे प्रयत्न केले. पू. डॉक्टरांनी कर्नाटकामधील स्वयंसेवकांचा परिचय करून घेऊन त्यांना कार्याबाबत मार्गदर्शन केले होते.

१९३९ साली महाराष्ट्र प्रांताचे ४ विभाग करण्यात आले. (१) पुणे, मुंबई, ठाणे, सोलापूर. (२) नासिक, धुळे, जळगाव. (३) नगर, सातारा, कोल्हापूर, सांगली. (४) रत्नागिरी, कुलाबा. या विभागांचे विभाग संघचालक व विभाग कार्यवाह योजले गेले. नंतर पुढे त्यांत बदल झाले. पहिल्या विभागाचे संघचालक मा. भाऊराव अभ्यंकर व विभाग कार्यवाह मला योजले गेले होते. १९३९ मध्ये पुणे विभागाची एक बैठक हिवाळा शिबिर पद्धतीने अरण्येश्वर भागात घेतली होती. त्याचा समारोप मा. आप्पाजी जोशी यांनी केला. त्या प्रसंगी वर्धा जिल्ह्यातील संघबंधूंच्या संघनिष्ठेबद्दल त्यांनी दिलेले उदाहरण अजून स्मरणात आहे. मा. आप्पाजी म्हणाले, "वर्धा जिल्ह्यातील संघबंधूंना मी आज देव वाटतो. पण हा आप्पाजी संघस्थानावर येतो आहे, भगव्या ध्वजाला प्रणाम करतो आहे, प्रार्थना करतो आहे, तेथपर्यंतच मी त्यांचा देव आहे पण उद्या जर हा आप्पाजी संघस्थानावर येणार नाही, आचार पाळणार नाही, तर ह्या आप्पाजीच्या देहाचे तुकडे तुकडे करून वर्धा जिल्ह्यातील संघबंधू ते कोल्ह्याकुत्र्याच्या तोंडी टाकतील." एका अद्‌भुत निष्ठेचा हा परिचय !

डॉ. आंबेडकर व डॉ. हेगडेवार

१९३९ साली ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या संध्याकाळच्या कार्यक्रमाच्या प्रसंगी योजनेप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वर्गाच्या भेटीसाठी आले होते. पू. डॉक्टर हेडगेवार हे पुण्यातच असल्याने स्वाभाविक दोघांची भेट झाली व संघस्थानावर आले. सुमारे ५२५ पूर्ण गणवेषधारी स्वयंसेवक संघस्थानावर

होते. डॉ. आंबेडकर यांनी डॉ. हेडगेवार यांना प्रश्न विचारला की, "या स्वयंसेवकांमध्ये अस्पृश्य किती असतील ?" पू. डॉक्टर म्हणाले, "चला, आपण ओळीत हिंडूनच पाहू." दोघेही ओळींतून हिंडून आले. डॉ. आंबेडकर म्हणाले, "यामध्ये अस्पृश्य कोणीच नाही." डॉ. हेडगेवार म्हणाले, "आता तुम्ही विचारा." तसे डॉ. आंबेडकरांनी विचारले की, "यात अस्पृश्य असतील त्यांनी एक पाऊल पुढे या." कोणी आले नाही. तेव्हा डॉ. आंबेडकर म्हणाले, "हे बघा." त्यावर पू. हेडगेवार म्हणाले, "या ठिकाणी आपण अस्पृश्य आहोत ही जाणीव कधीच दिली जात नाही. आता हवे तर तुम्हाला ज्या कोणच्या पोटजाती अभिप्रेत असतील त्यांची नावे घेऊन विचारा. तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी "वर्गात कोणी महार, मांग, ढोर, चांभार असे असतील त्यांनी पुढे एक पाऊल टाका" असे म्हणताच किती तरी स्वयंसेवकांनी पुढे पावले टाकली. ती संख्या पू. डॉक्टर यांनी मोजून घेतली. ती १०० च्या वर भरली. ते पाहून डॉ. आंबेडकर आश्चर्यचकित झाले व म्हणाले, "संघाची ही किमया काही वेगळीच आहे ! यापुढे जे सांगाल ते मी संघासाठी करीन." ही अपूर्व भेट व सुखसंवाद ऐकण्यासाठी त्या दिवशी संघस्थानावर मी पू. डॉक्टर यांच्या जवळच उभा होतो. अन्य मंडळी लांब होती. १९३९ साली पुण्याचे हिवाळी शिबिर स्वतंत्रपणे उत्तम झाले. पुणे जिल्ह्याचे अन्यत्र झाले. विभागाची शिबिर-वजा बैठक अगोदरच झाली असल्याने मी प्रवासास जाण्याचा विचार करीत होतो.

गुजरातेत संघकार्य

श्री. शामराव वैद्य सुरतेला जाऊन शाखा सुरू करून आले होते. जनरल नानासाहेब शिंदे यांना भेटण्याच्या निमित्ताने बडोदा येथील कार्याचा अल्प-परिचय झाला होता. अहमदाबाद येथे पुण्याचे नारायणराव जानोरीकर यांनी एक शाखा १९३९ च्या मार्च महिन्यात सुरू केली. ती श्री. दादासाहेब मावळणकर यांच्या आवारातच होती. मी ती पाहाण्यासाठी मुद्दाम गेलो असताना एक दिवस भोजनासाठी दादासाहेब यांच्या घरी होतो. संघाचे तत्त्वज्ञान त्यांना मान्य होते तरी पण मुसलमानांबद्दलच्या दृष्टिकोणात त्यांनी नापसंती दर्शविली. ती पुढे १९४६ च्या अहमदाबादमधील दंग्यानंतर बदलली. के. एम्. मुन्शी यांना १९४६ मध्ये पुणे शाखेच्या गुरुदक्षिणा (गुरुपौर्णिमा) उत्सवास बोलाविले होते. तेव्हा श्री. मुन्शी यांनीही मुसलमानांच्या वागणुकीबद्दल तक्रार

मांडली होती. त्यांचे भाषण छापूनच त्यांनी बरोबर आणले होते. त्यात त्या वर्षी अहमदाबाद, डाक्का, नेल्लोर या ठिकाणी झालेल्या दंग्यांच्या प्रकारावरच नाखुषी व्यक्त केली होती.

मी गुजराथेतील सुरत, भडोच, बडोदा, अहमदाबाद, मेहेसाणा या जिल्हा ठिकाणांना भेट देऊन तेथून पुण्याच्या वर्गास कोणी येतील का पाहावे असा प्रयत्न करण्याकरिता जाण्याचे ठरविले. १५ दिवसात (वरील पाचही ठिकाणचे पत्ते घेतले) तो प्रवास पुरा करून आलो. प्रत्यक्षपणे १५ पर्यंत तरुण मंडळी येण्याचे ठरवून मी परत आलो. बडोदा येथील मुक्कामात व्यायाम ज्ञानकोश (२३ खंड) रचणारे आबासाहेब मुजुमदार–तसेच जनरल नान्नासाहेब शिंदे या मंडळींना भेटून आलो.

ही माझी खटपट पू. डॉक्टर यांना फार चांगली वाटली.

हवेली तालुका कार्य

मधल्या काळात १९३९ च्या जानेवारी महिन्यात श्री. ब. ना. उर्फ बाबा भिडे यांना हवेली तालुका संघचालक होण्याबद्दल पृच्छा केली. मा. भाऊराव

शाखा – मेळावा – बैठका

दैनंदिन शाखा म्हणजे २४ तासात एकदा एकत्र येऊन विविध कार्यक्रमाद्वारे शारीरिक – बौद्धिक – लष्करी – प्रत्येक घटकामध्ये स्वयंस्फूर्त विचाराधिष्ठित स्वसंरक्षणक्षमता, विचारशीलता व शिस्तबद्धता निर्माण केली जावी हे अपेक्षित ! तर अचानक मेळावा हा परस्परसंबंधांची जाणीव करून देणारा व संकटकाळी स्वकर्तव्यतत्परता आणणारा ठरतो.

बैठकी अनेक प्रकारच्या असतात ! साप्ताहिक बैठका किंवा कार्यक्रम, कार्यकर्त्यांची बैठक – विविध क्षेत्रांतील मंडळींची बैठक – या बैठकांमधून संपर्क साधणे, केलेल्या कार्याचा आढावा घेणे – पुढील कार्याची आखणी करणे असे उद्देश ठेवता येतात.

अभ्यंकर यांनी स्वतः जावून बाबाराव भिडे यांनी हवेली तालुक्याचे काम पाहावे असे सांगितले. मा. बाबा यांचेबरोबर श्री. हरिभाऊ ओक हे कार्यवाह म्हणून काम पाहू लागले. नंतर श्री. आप्पा पेंडसे त्यांच्याबरोबर होते.

प्रामुख्याने बाबांनी तालुक्यातील १४६ गावाच्या फिरतीनंतर स्वयंसेवकांची मागणी केली. तेव्हा मी बाबांना सुचविले की, सर्वांसमोर कामाचे स्वरूप एकदा मांडा व तेथेच किती जण येण्यास तयार आहेत ते विचारा. अशा बौद्धिक वर्गाच्या कार्यक्रमानंतर २०० संघबंधूंनी तयारी दाखविल्याचे पाहून मला फार आनंद झाला. स्वयंसेवक संघशाखेतून तयार होत असतात. त्यांनी आपली काम करण्याची क्षमता प्रत्येक दिवशी वाढवीत जावी व वेळ येताच, हाक येताच, त्या हाकेला ओ द्यावी. या वृत्तीचा परिपोष करणे हा माझ्या कार्यविषयक दृष्टिकोणाचा भाग हवेली तालुक्यातील कामासाठी तयारी दाखविलेल्या संघबंधूंनी संपूर्ण यशस्वी केला.

पुढे मा. बाबांच्या बरोबर आप्पा पेंडसे यांच्यानंतर अनंतराव देवकुळे जावू लागले.

पुण्याच्या कार्यात मा. विनायकराव संघचालक होते. पुणे शहर कार्यवाह म्हणून बापूराव जोशी, रामभाऊ गोडबोले, वसंतराव तांबे ही मंडळी एकामागे एक पुढे येत गेली.

प्रार्थना व लष्करी शिक्षण बदलले !

१९४० साली ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पसाठी आलेल्या नागपूरच्या शिक्षकांनी दोन गोष्टींचा परिचय करून दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर म्हटली जाणारी प्रार्थना मराठी व हिंदी अशी होती. ती पूर्ण संस्कृतमध्ये करण्यात आली आणि संघातील सर्वमान्य लष्करी शिक्षणाच्या कार्यक्रमातील इंग्रजी भाषा बदलून समता या नावाचे संपूर्ण कार्यक्रम, रचना, विभागणी, आज्ञा संस्कृतमध्ये करण्यात आलेला नमुना यांचा परिचय ! दुसरे महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले अन् त्या वेळच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी वरील तत्कालीन लष्करी शिक्षण खाजगी रीतीने दिले जाऊ नये अशी ऑर्डर काढली होती. त्यामुळे वरील बदल करून संघटनेने आपली कार्यप्रवणता व्यक्त केली.

संघाचे कार्य भारताच्या सर्व प्रांतात पोचले होते. त्यामुळे मराठी--हिंदी प्रार्थनेऐवजी अधिक ध्येयसमावेशक अशी संस्कृत भाषेत प्रार्थना करण्यात आली.

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिंदुभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महामंगले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ॥ १ ॥

प्रभो शक्तिमन् हिंदुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वां नमामो वयं ।
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं
शुभामाशिषं देहि तत्पूर्तये ॥ २ ॥

अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम्
सुशीलं जगद्येन नम्रं भवेत् ।
श्रुतं चैव यत्कंटकाकीर्ण मार्गम्
स्वयं स्वीकृतं नस्सुगं कारयेत् ॥ ३ ॥

समुत्कर्ष निःश्रेयसस्यैकमुग्रम्
परं साधनं नाम वीरव्रतम् ।
तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् ॥ ४ ॥

विजेत्री च न संहता कार्यशक्तिर्
विधायास्य धर्मस्य संरक्षणम् ।
परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रम्
समर्था भवत्वाऽशिषा ते भृशम् ॥ ५ ॥

। भारत माता की जय ।

वरील संस्कृत प्रार्थनेचा अर्थ हिंदु जीवनाच्या श्रेष्ठ दर्जाची ओळख करून देऊन हिंदुराष्ट्रासाठी समर्पण भावना निर्माण करण्याम मदत होते. प्रार्थना बदलली अन स्वयंसेवकांनी ती बिनतक्रार मान्य केली याबद्दल अनेक तथाकथित विचारवंतांना फार आश्चर्य वाटले. पण संघ कालानुरूप काय कसे

बदल करू शकतो याचा परिचय व्हावा हाच प्रत्यक्ष परिणाम अनुभविण्यास मिळाला. मार्च एप्रिल १९४० मध्येच लक्षात आले की नागपूरच्या तृतीय वर्ष शिक्षणाला भारताच्या सर्व प्रांतांतून लोक येत आहेत तेव्हा मूळ भाषेत म्हणजे संस्कृत भाषेतच प्रार्थना म्हटली जाणे योग्य. या संबंधात खेडूत व निरक्षर हिंदूंबद्दल प्रश्न होताच पण वाणीचे ज्ञान कोणीही कोणाला देऊ शकतो. संघाबद्दलची हृदयस्थ भावना अत्यंत प्रखर असल्याने ही संस्कृत प्रार्थना मे १९४० पासून सर्व शाखांतून गायिली जाऊ लागली.

दुसरा बदललेला कार्यक्रम म्हणजे पूर्वीचे इंग्रजी भाषेतून दिले जाणारे शिक्षण. ही लष्करी शिक्षणाची जशीच्या तशी आवृत्ती होती व त्याला बंदी घालण्यात येताच केंद्र नागपूर येथील भारतीय अधिकाऱ्यांनी ५--६ लोकांना सांगून लष्करी शिक्षण हा संपूर्ण कार्यक्रम आज्ञांसह संस्कृतमध्ये आणला.

१९४० पासून समता या कार्यक्रमांत—

गट – ७ लोकांचा
गण – २१ लोकांचा + १ गणप्रमुख
वाहिनी – ३ गण + १ वाहिनीप्रमुख
अनिकिनी – ३ वाहिन्या + १ अनिकिनी प्रमुख
प्राणाकिनी – ३ अनिकिन्या + १ प्राणिकिनी प्रमुख

अर्थात याप्रमाणे सर्व रचना साध्य केल्यानंतर दक्ष, आरम, स्वस्थ, दक्षिण वृत्त, वाम वृत इत्यादि, तसेच दक्षिण दिगंतर – दक्षिण भ्रम – प्रचल, स्तभ, चतुर्व्यूह, तृतिव्यूह इत्यादि सर्व समानार्थी संस्कृत आज्ञा, शिशिर संमेलन, रक्षक दल यासारख्या खास आज्ञा यांचे शिक्षण सुरू झाले. हिंदु समाजातील सर्व वैयक्तिक, सामूहिक दोष काढून टाकून गुणप्रकर्ष व वृद्धी यासाठी या कार्यक्रमावर ठरलेल्या मर्यादेपर्यंत भर दिला जावा असा संकेत आहे.

१९४० साली झालेल्या या संघटनापोषक बदलामुळे इतर कोणाला काही वाटले असले तरी माझ्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांना संघटनेच्या जिवंतपणाचाच प्रत्यय आला व मनाला विशेष समाधान वाटले.

१९४० मधील पू. डॉ. चे शेवटचे दिवस

१९४० सालात सर्व कार्यक्रम चांगल्या तऱ्हेने पार पडत गेले. ऑफिसर्स

ट्रेनिंग कॅम्पसाठी नू. म. वि. हायस्कूल ठरले होते. पू. डॉक्टर नेहमीप्रमाणे १५ दिवसांसाठी आले होते. यावेळी प्रकृती मात्र जास्त खराब होती. भयंकर घाम! १-१ तासाने आतील अंगरखा बदलावा लागे. पू. गुरुजी ७-८ दिवस बरोबर होते. नंतर ते नागपूरला गेले. पू. डॉक्टर यांनी पुणे वर्गात ३ प्रांतांचे स्वयंसेवक पाहून आनंद व्यक्त केला. ते १५ मे ला नागपूरला जाण्यास निघाले. बरोबर तात्या तेलंग होते. मीही कल्याणपर्यंत जाण्याचे ठरवून बरोबर गेलो होतो. वाटेत पू. डॉ. मला म्हणाले, "वसंता, आजपर्यंत तू मला अडचणीमध्ये मार्ग विचारलास, मीही सांगत होतो, आता मात्र तुझ्या अडचणी तुलाच सोडवाव्या लागतील." हे उद्‌गार पू. डॉक्टरांच्या आंतरिक संवेदनेचे असतील असे कधी वाटले नाही.

पू. डॉक्टर नागपूरला पोचले अन् आजारीच झाले. उठणे, बसणेही कठीण झाले. मा. बाबासाहेब घटाटे यांच्या बंगल्यावर हलविल्याचे कळले. दि. २१ जून सकाळी ९॥ वाजता ते इहलोक सोडून गेले हे टेलिफोनने कळले. अत्यंत दुःख झाले. मी लगेच दुपारच्या गाडीने जावे असा विचार मा. विनायकरावांना सांगून ती. आजोबा यांनाही रडत रडत पू. डॉक्टरांच्या मृत्यूबद्दल सांगून नागपूरला जाणार असल्याचे सांगितले. नागपूरला दि. २२ ला सकाळी

कार्यवाढीचा महत्त्वपूर्ण आधार

प्रेम करणे – प्रत्येक हिंदू घटकासंबंधी प्रेमभावना ठेवणे. पू. गुरुजींनी एकदा उदाहरण दिले की, एखाद्या दगडी भिंतीवर पिंपळाचे लहानसे रोप दिसते. ते त्यावेळेस काढले तर त्याचे मूळ अत्यंत कोमल असते. तथापि ते कोवळे मूळ हळूहळू भिंत फोडण्याइतके काम करते. आज हिंदू अंतःकरणे अशीच कठोर वाटतात पण खऱ्याखुऱ्या कोमल प्रेम-भावनेचा सतत वर्षाव केला तर हिंदूंची कठोर अंतःकरणे समाजाभिमुख होतील याबद्दल कार्यकर्त्याला शंका वाटू नये. कार्यार्थी प्रेमानेच आपल्या कार्याची जोपासना करावी. १५ वर्षांच्या सतत कार्यरत राहण्यामुळे कार्यकर्त्यांचे अंतःकरण कोणत्याही हिंदुंच्या दुःखाने व्यथितच होईल. असा निर्वाळा पू. गुरुजींनी दिला आहे.

पोचताच रेशीमबागेवर गेलो. तेथे पू. डॉक्टरांच्या पार्थिव देहाचे दहन झाले. तेथे आच्छादन उभे केले होते. मी तेथे पोचलो तेव्हा डॉ. मुंजेही परगावाहून आले होते. ढसढसा रडत होते. " डॉक्टर, माझ्या अगोदर तू का गेलास ? " इत्यादि घरगुती संदर्भात बोलत असताना ऐकून माझ्याही हृदयाचे पाणी पाणी झाले. पू. डॉक्टरांनी ५–६ वर्षे माझे प्रत्येक बाबतीत कौतुक करून मला उत्तेजन दिले होते. मला भरवशाचा स्वयंसेवक म्हणून माझी गणना उच्च स्तरावर केली होती. संघतत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड घालण्याची अजब पद्धती त्यांनी परिचित करून दिली होती. दादाराव परमार्थ यांच्या करवी माझ्या कार्याचे उत्तम मूल्यमापन त्यांनी केले व त्यामुळे कशापेक्षाही संघ-कार्याची प्रतिष्ठा जास्त आहे हे मी मानत गेलो. आज १९८३ मध्येही मी त्या मूल्यासह संघकार्यात उभा आहे. या कार्याला उशीर लागतो, हवे आहे तितके ते वाढण्यास वेळ लागतो–पण मला वाटते, त्याला उपाय नाही. समाजकार्य करण्यासाठी जे पुढे येतात ते स्वभावाने, वागणुकीने दांभिक, स्वार्थी असले तर खरे कार्य होताना दिसत नाही. समाजाच्या उत्थानासाठी पाहिजे असलेली शक्ती, पवित्र–प्रामाणिक हेतूंनी प्रेरित असली पाहिजे हेच खरे–म्हणजे माणसे तशी हवीत !

नागपुरात २–३ दिवस थांबलो. दि. २३ जूनला सकाळी सुमारे २०० मंडळी–संघबंधू–कन्हान नदीवर डॉक्टरांच्या रक्षा विसर्जनासाठी गेलो होतो. पू. गुरुजी, मा. बाबासाहेब घटाटे, कृष्णराव मोहरीर असे सर्वजण होते. पू. गुरुजींनी पुण्याच्या सर्वांची चौकशी केली व दि. २१ जुलै १९४० रोजी मासिक श्राद्धासाठी यावे असा निरोप दिला.

मासिक श्राद्ध व नवीन सरसंघचालक

दि. २१ जुलैला, पुणे व महाराष्ट्रातून सुमारे ५०–६० स्वयंसेवक बंधू मासिक श्राद्धासाठी उपस्थित होते. भारतातून सर्व प्रांतांतील मंडळी आलीच होती. रेशीमबागेवरील संध्याकाळच्या कार्यक्रमात पू. गुरुजी यांची नवीन सरसंघचालक म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली. मा. आप्पाजी जोशी यांनी याबाबतचे विचार अत्यंत भावनावेगाने व हृदयस्पर्शी पद्धतीने मांडले. १–२ दिवसांत सर्वजण आपापल्या गावी गेले.

पुढे पू. गुरुजींनी नागपूर येथील उत्सवात दिलेल्या जबाबदारीच्या पूर्ततेबद्दल आश्वासन दिले. पूर्वीच्या चुकांची क्षमा मागून सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. मला पू. गुरुजींना अगदी जवळून पाहावयाचे होते, परिचय वाढवावयाचा होता व तशी संधी मी त्यांच्या गुजराथच्या प्रवासात घेतली. ऐन गणपतीच्या दिवसातच (सप्टेंबर १९४०) गुजरात प्रांताच्या दौऱ्यावर ते जाणार असे कळल्यावरून त्यांना पत्र लिहून गुजरातच्या दौऱ्यात मी तुमच्याबरोबर आलो तर चालेल का असे विचारले. तेव्हा पू. गुरुजींनी मान्यता देऊन मुंबईस येण्याची तारीख. वेळ कळवून त्या वेळेस येण्यास सांगितले. मी त्याप्रमाणे उपस्थित राहिलो. सुरत, भडोच, बडोदा, अहमदाबाद, मेहेसाणा एवढ्या गावी गुरुजींचे कार्यक्रम झाले. स्वयंसेवकांच्या बैठकी व प्रगट भाषण असे २–२ कार्यक्रम सर्वत्र झाले. दोन ठिकाणी गणपती उत्सवात पू. गुरुजींना पाचारण केले गेले. मी काय अनुभविले? कशाकरिता पू. गुरुजींबरोबर गेलो?! पू. डॉक्टर व गुरुजी यांच्यात काय साम्य आहे हे पाहावे म्हणून गेलो होतो. पू. गुरुजी संघशाखेबद्दल जी भूमिका सर्वत्र सांगत, ती पू. डॉक्टर यांच्याप्रमाणेच असल्याचे पाहून, ऐकून मला फार बरे वाटले.

गुजरात प्रवासातील सुमारे १० दिवसांतील अनेक प्रसंगांतून पू. गुरुजी हे डॉक्टरच आहेत, तसेच त्यांच्या अंतःकरणात डॉक्टरांबद्दल महान आदर आहे हेच लक्षात आले.

प. पू. डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी निर्माण केलेली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची दैनंदिन १ तासाची शाखा म्हणजे त्या शाखेवर उपस्थित राहून सर्व कार्यक्रमात भाग घेणाऱ्या समाजघटकाला दांभिकतेच्या सर्व प्रकारांचा वा वागणुकीचा त्याग करून, बोलल्याप्रमाणेच वागून स्वसंरक्षणक्षमता, शिस्त व आज्ञापालन, हिंदुसमाजातील घटकांबद्दल प्रेम व विश्वास यासारख्या गोष्टींचा कायावाचामने स्वीकार करावासा वाटू लागतो. ही गोष्ट मी अनुभविली, इतरांनी अनुभवून प्रगट केली. मीही त्याचा अनुभव घेतला, घेत आहे व घेत राहीन ! अजून पुष्कळ कार्य व्हावयाचे आहे !

पुणे विभागातील कार्याच्या दृष्टीने जिल्ह्याजिल्ह्याच्या भेटी मा. भाऊराव अभ्यंकर यांच्याबरोबर करणे चालू होते.

१९४० साली विभाव बैठक शिबिराच्या स्वरूपातच झाली. वैयक्तिक जीवनामध्ये काही बदल १९४० साली झाला. आम्ही चौघे भाऊ. मी, अनंतराव, जयंतराव, श्रीकृष्ण. पैकी दोघे मुंबईस त्यांचा एकत्र उद्योग करीत होते. वडिलांचे वय ६० च्या पुढे झाले. १९३८ च्या सुमारास त्यांचे डोळ्याचे ऑपरेशन अयशस्वी होऊन त्यांना दिसेनासे झाले. अनंतराव व मी प्रामुख्याने त्यांच्याकडे पाहाणारे–दोघांपैकी कोणीतरी विवाहबद्ध व्हावे अशी गरज निर्माण झाली. त्या दृष्टीने चर्चा झाली. पण अनंतरावांनी स्पष्ट सांगितले, " तू विवाह कर किंवा नको करू, मी विवाह करणार नाही. " या अनंतरावांच्या निर्णयानंतर मी विवाहबद्ध होण्याचे ठरविले. माझ्या भाग्याने, मी पत्करलेले संघजीवन मान्य करणारी, स्वत: समाजकार्यात भाग घेण्यास उत्सुक असलेली, पूर्वी समितीचे काम करणारी पण जास्त शिकू न शकलेली अशी वधू पाहाण्यात आली. मित्रमंडळींपैकी अमरेंद्र गाडगीळ यांच्याकडून थोडी चाचपणी केलेली अशी मुलगी मी पसंत केली. लोकरीतीप्रमाणे तो विवाह ११–६–१९४० ला झाला. पत्नीचे नाव– अगोदरचे कुसुम दत्तात्रय दावलभक्त (गौतम) व नंतरचे नाव सौ. उषा देवकुळे –खरोखर माझ्या संघसमर्पित जीवनाला सतत साथ देऊन या वृत्तान्तातील जीवनास ४० वर्षे साथ करणारी अशी पत्नी मला परमेश्वरकृपेनेच मिळाली. विवाहाच्या दहाव्या दिवशीच पू. डॉक्टर गेले. नवविवाहित जीवनाचा कसलाही विचार न करता मी नागपूर प्रवास, येणे-जाणे सर्व केले पण सौ. उषाने मला साथच दिली. त्यामुळे सर्व सुसह्य झाले.

१९३३ ते १९४० ची दहा वर्षे पू. डॉक्टरांच्या आशीर्वादाने प्रगतिपर व एका गावातून प्रांतापर्यंतच्या कामात माझे कर्तृत्व खर्च होत गेले. समाधान वाटले.

संघकार्यात गटबाजी, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, मोठेपणाची हाव इत्यादि गोष्टींना स्थान नव्हते. मलाही त्याचा तिटकारा होता. दहा हजार शिस्तबद्ध गणवेषधारी स्वयंसेवकात आपण उत्तम गणवेष घालून उभे राहावे हीच महनीय इच्छा ! व ती सतत म्हणजे प्रथमपासून मनात बाळगून स्वयंसेवकांची संख्या वाढावी, शाखा उत्तम चालविता यावी या दृष्टीने सर्व तयारी करीत आलो व

आजही उत्तम शाखा अगदी नव्याने सुरू करून चालविण्याची मनाची तयारी आहे हे माझे भाग्य !

१९४१ चा ऑफिस ट्रेनिंग कॅम्प चांगल्या तऱ्हेने पार पडला. मा. भाऊराव अभ्यंकरच सर्वाधिकारी होते. सर्व कार्यालयाचे काम, निवासस्थानातील शिस्त संभाळण्याचे काम सर्वस्वी मजवर होते. स्वयंसेवकांच्या गैरसोयी होऊ नयेत म्हणून जरुरीच्या सर्व गोष्टी त्यांना उपलब्ध करून देण्याची सर्व तयारी मी ठेवून कार्यालयाचे काम पाहात होतो.

पू. गुरुजींचा ५ ते ६ दिवसांचा मुक्काम १९४१ च्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमध्ये बराच गाजला. चटपटपणा व हजरजबाबी वातावरणात स्वयंसेवकांच्या बैठका झाल्या. ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पला आलेल्या सर्वांच्या प्रतिज्ञा व्हावयाच्या. त्या १९४१ मध्ये होताना एका स्वयंसेवकाने गुपचुप बरोबर आणलेल्या ब्लेडने आपली करंगळी कापली अन् ते रक्त ध्वजस्तंभावर १–२ थेंब टाकले. नंतर त्याने प्रतिज्ञा घेतली. मी त्याबद्दल फारशी वाच्यता केली नाही पण पू. गुरुजींना ते कळले तेव्हा त्यांनी नापसंती व्यक्त केली. अर्थात जे घडले ते सर्व अकल्पितच होते.

कार्यकर्त्या संघबंधूंची प्रतिमा

प्रत्येक कार्यकर्ता काचेच्या तावदानाप्रमाणे असावा. त्याने स्वतःच्या वागणुकीने अनेकांना आकृष्ट करावे ह्याची अत्यंत गरज असते. पण आपल्यापर्यंत पोहोचणाऱ्या स्वयंसेवकाला – संघबंधूला कार्यातील आपल्या पलीकडचेही दाखविण्याची क्षमता असावी. आपल्यापेक्षा श्रेष्ठ कार्यकर्ता तो की जो आपल्याभोवती अनेक स्वयंसेवकांना गोळा करून उत्तम मार्गदर्शनाने त्यांना पुढे पुढे नेणारा असतो. काही ध्येय – लक्ष्य गाठण्याची संकल्पना समोर घेऊन ते गाठण्यासाठी शर्थ करून अनेकांच्या आत्मविश्वासांत त्याला भर टाकता येते.

पू. गुरुजी संघशाखेसंबंधी अत्यंत जागरुक होते. ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या संघस्थानावर प्रत्येक गणाजवळ जाऊन उभे राहून चाललेला कार्यक्रम कुठे चुकत आहे काय याची शहानिशा करीत. अनेक वेळा मलाही बरोबर नेत. दंड धरणे, पायात वाकून उभे राहणे, पायांची हालचाल काटकोनात करणे इत्यादी गोष्टींमध्ये काही दोष असला तर दाखवीत.

बैठकीत बसल्यानंतर योग, आसने यावर चर्चा निघाली तर पू. गुरुजी हात न लावता पद्मासन पट्दिशी घालून दाखवीत. स्नान करण्याच्या आधी अंगाला तेल लावावे, चोळावे – काय योग्य ? काय अयोग्य ? अशा चर्चा चालत. पू. गुरुजी मला त्यामध्ये घेत. ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पमध्ये दुपारी ४ ते ५ व रात्री ९॥ ते १०॥ सर्वाधिकारी यांच्या खोलीत गुरुजींच्या उपस्थितीत आंबे, चिवडा, लाडू असे भेटीचे पदार्थ सर्वांनी खावे असा संकेत असे. फळे कशी कापावी याबद्दल गुरुजी बोलत असत. या सर्व बाबतीत पू. गुरुजी मला भागीदार करीत. " वसंतराव, बरोबर ना ? " असा पुकारा असे.

१९४१–४२ पासून निरनिराळ्या प्रांतांत काही नवीन योजना कार्यान्वित करण्यात आल्या. महाराष्ट्र प्रांतात मा. बाबाराव भिडे यांनी हवेली तालुका सोडून प्रांत स्वयंसेवक म्हणून प्रांताची जबाबदारी घ्यावी असे गुरुजींनी सांगितले. त्याप्रमाणे व्यवहार सुरू झाला. मी विभाग कार्यवाहाचे काम पाहात होतो. प्रांताचे–पुण्याचे कामात मला पाहावे लागे. त्यातील अनेक अनुभव व परिस्थिती मी सविस्तरपणे बाबांना २–३ दिवस भेटून सांगितली. मा. बाबांनी एक दिवस मला सुचविले की, " आता वसंतराव तुम्ही हवेली तालुक्याचे काम पाहावे. ते मी मान्य केले.



१९४३ ते १९५३

हवेली तालुका कार्य

१९४३ पासून मी हवेली तालुका संघचालक म्हणून काम पाहू लागलो. हवेली तालुक्याचे काम माझे बंधू अनंतराव यांनी खूप प्रमाणत पाहिले होते. त्या कामाची ओळख करून घेण्याचे काम प्रथम करणे जरूर होते. त्याप्रमाणे २–३ महिन्यात जवळ जवळ ४० गावी जाऊन परिचित असलेल्या संघबंधूंना जाऊन भेटलो व शाखा नियमित सुरू करण्याबद्दल कल्पना सांगितल्या.

पुण्यातून २५ स्वयंसेवक मिळाले होते, पैकी २० जण तयारीचे दिसले. त्यांना गावांची वाटणी करून दिली. २६ गावांपर्यंत वाटणी करता आली. आपापल्या गावी रोज, एक दिवसाआड, आठवड्यातून तीनदा, आठवड्यातून एकदा अशा योजना करून दिल्या. मी गावोगाव जाण्याचा परिपाठ सुरू केला. संध्याकाळच्या वेळी निघून रात्री १२–१ पर्यंत परत यावयाचे असा कार्यक्रम चालू केला.

माननीय बाबांना दर आठवड्याला रिपोर्ट देण्याची पद्धत ठेवली होती. १९४५ सालापर्यंत २६ गावी (अर्थात त्या वेळी पुणे पालिका हद्द लहान होती) संघाच्या दैनिक शाखा चालल्या होत्या. साप्ताहिक बैठक हा कार्याचा आढावा घेण्याचा कार्यक्रम तालुक्याच्या कामात आणला. काही जण तक्रार करीत होते पण त्यांना समजून दिले की, दर आठवड्यास आढावा घेतला नाही तर कार्याची योग्य जोपासना होणे कठीण होत जाते.

सर्व शाखांतून सर्व उत्सव व्हावे म्हणून प्रयत्न तालुका साप्ताहिक बैठकीद्वारे केला जाई. संघबंधू कार्यात पक्के बसावे म्हणून १९४५ पासून तालुक्यातील स्वयंसेवकांच्या सहली पुणे जिल्ह्यातील स्थळे पाहाण्याकरिता काढाव्या असे ठरले.

पहिली सहल नसरापूरजवळ बनेश्वरची (२४ मैल दूर), दुसरी पुरंदर, सासवड, जेजुरी, तिसरी भाटघर धरणाची, चौथी भीमाशंकरची, पाचवी

सिंहगडची, सहावी पंढरपूर, सातवी रायगड. आठवी शिवनेरी अशा सहली झाल्या. साधारण २५ गावांतून १५० पर्यंत स्वयंसेवक रायगड सहलीत आले होते.

या सहलीच्या कार्यक्रमामुळे हवेली तालुक्यातील गावोगावच्या स्वयंसेवकांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली होती.

साप्ताहिक बैठकीला १२ गावचे ३० पर्यंत स्वयंसेवक आलटून पालटून असे येत असत.

रामजी जोशी, विनायक जोगळेकर यांनी कार्यवाह म्हणून मजबरोबर काम केले. भालू थेटे, हरि राहतेकर, राजा दाते, गोसावी, नारायण व रमाकांत एकबोटे, सखदेव, करंदीकर, दत्ता गोखले, भालू थेटे अशी मंडळी सतत मजबरोबर होती.

या सहल कार्यक्रमांत धाडसी कृत्यांचा समावेश होता. भाटघर धरणांत मगरी असल्याची वार्ता होती. तथापि गोखले–थेटे या दोघांनी नकळत उड्या टाकून धरण पार करण्याचे ठरविले. बऱ्याच खटपटीने एक नाव त्यांच्या मागे धावली. दोघे सुखरूप पैलतीरी पोचले. शिवनेरीवर एक अत्यंत अवघड कडा चढण्याचा सर्वांनी प्रयत्न केला. यशस्वी झाले.

१९४२ च्या "चले जाव" चळवळीमध्ये काही ना काही प्रमाणात गावोगावच्या मंडळींचा भाग होता. अशा लोकांचा गावोगाव परिचय करून घेतला गेला व चर्चाही झाल्या.

१९४६ मध्ये चिंचवड येथे महाराष्ट्र प्रांताचा १ लाखाचा मेळावा घेण्याच्या दृष्टीने तयारी झाली होती. राजकीय कारणावरून ह्या मेळाव्यास बंदी घालण्यात आली.

पहिली संघबंदी

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा दिल्ली येथे प्राणघात झाला व संघावर त्याचा आरोप ठेवण्यात आला. ४–२–१९४८ रोजी संघावर बंदी घालून हजारो संघीयांना पकडून स्थानबद्ध करण्यात आले. म. गांधी यांच्या प्राणघातामध्ये संघाचा कसलाही संबंध नव्हता हे तीन-चार न्यायालयांतून सिद्ध झाले. श्री. दादासाहेब आपटे यांनी फार परिश्रम घेऊन श्री. व्यंकटेश शास्त्री (मद्रास) यांच्या मध्यस्थीने त्या वेळचे गृहमंत्री श्री. वल्लभभाई पटेल यांच्या संघा-

बद्दलच्या जाणिवेमुळे १२ जुलै १९४९ रोजी संघाधरील बंदी उठली. बंदी काळात ३॥ महिने येरवडा जेलमध्ये मा. भाऊराव अभ्यंकर, भाऊसाहेब देशमुख, मा. विनायकराव आपटे, अनंतराव देवकुळे, पुणे जिल्ह्यातील डॉ. गोडबोले, हरिभाऊ भिडे आदि मंडळी होती. ३॥ महिन्यात रोज आसनांचा वर्ग मी घेत असे.

ही संघावरील बंदी १२ जुलै १९४९ ला उठल्यानंतर सर्वत्र शाखा पूर्ववत सुरू व्हावयाच्या होत्या. त्या कामासाठी गावोगाव जावयाचे होते. पू. गुरुजींच्या स्वागतासाठी देशभर दौरा आखण्यात आला होता. देवदुर्लभ असे स्वागत सर्वत्र झाले. प्रत्येकी १ रु. असा निधी गोळा करण्यात आला. १ लाखाहून अधिक इतका निधी पुण्यात जमू शकला.

१९४८ च्या बंदीनंतर जो सत्याग्रह झाला त्यामध्ये हवेली तालुक्यातील १५ गावांतून १०० स्वयंसेवकांनी भाग घेतला होता. त्याबद्दल मला समाधान वाटले. पुण्यातील मार्कण्डेय प्रभात शाखेतील ३७ स्वयंसेवकांनी सत्याग्रहात

सहली – चंदन – रंजन

एका उपशाखेपासून अनेक उपशाखांचे संघबंधू पायी, सायकलने किंवा अन्य वाहनातून सहल कार्यक्रम १ ते ८ दिवसापर्यंत आखू शकतात; परस्परांची उत्तम ओळख व परस्पर सहकार्य यांचा उत्तम लाभ होतो. हवेली तालुक्यातील स्वयंसेवकांच्या सुमारे १४–१५ सहली या दृष्टीने अत्यंत लाभदायक झाल्या.

चंदन म्हणजे खाण्यापिण्याचे कार्यक्रम! एकाने सर्वांची किंवा सहकार्य करून सर्व संघबंधूंनी एकत्र खाणे, पेयपान करणे इत्यादि करण्यामुळे अनेक भेद नष्ट होतात, हा अनुभव!

रंजन कार्यक्रमामुळे संघबंधूंच्या अंगातील कलागुणांचा परिचय होत जातो. तो कार्याची प्रेरणा वाढवितो. सर्वांना वाव दिला जाणे मात्र गरजेचे असते.

भाग घेतला होता ही गोष्ट मला अभिमानाची वाटली. कारण १९३९ ते १९४३ त्या शाखेवर मी रोज जात होतो.

१९५० मध्ये संघाचा महाराष्ट्र प्रांताचा जो ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्प झाला त्याला शाळांचे सहकार्य मिळाले नाही. पुण्याच्या ३६ घरातून २५ ते ५० स्वयंसेवकांची राहाण्याची, झोपण्याची व्यवस्था केली होती. आमच्या घरी २५ जण राहिले होते. जेवण, न्याहरी, बौद्धिक वर्ग यासाठी स्वतंत्र जागा घेतल्या होत्या. अडचणींतून मार्ग काढणे हाच संघकार्याचा मूलभूत वैशिष्ट्याचा भाग होता. तो अनुभविला.

पू. डॉक्टर म्हणत असत की, संघाला जे अभिप्रेत आहे ते घडवून आणावे लागेल. घडवून आणणे ही स्वयंसेवक कार्यकर्त्यांची जबाबदारी! १९५० साली वर्ग होणे सर्व दृष्टींनी कठीण होते पण मार्ग काढला व तो यशस्वी झाला.

अखंड O. T. C. त भाग

पू. गुरुजींनी मा. बाळाराव देवरस यांच्या सल्ल्याने १९५० पासून अखंड ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पची एक कल्पना ऑक्टोबर १९५० पासून अमलात आणण्याचे ठरविले. प्रत्येक महिन्याला नागपूरला वर्ग व्हावा व त्या वर्गासाठी देशभरातून स्वयंसेवक येत राहातील. एक महिन्याच्या लगातार कार्यक्रमामुळे होणारी तयारी स्वयंसेवकांना अत्यंत उपयुक्त होत जाईल दर महिन्याला येणारे स्वयंसेवक संख्येतही मर्यादित राहतील व प्रत्येकाकडे लक्ष देणे जास्त चांगले होईल. अशा कल्पनेने हे ठरविले गेले.

१ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर १९५० असा पहिला वर्ग योजण्यात आला व पुण्यातर्फे मला तृतीय वर्ष शिक्षित म्हणून शिक्षक या नात्याने जाण्याची संधी देण्यात आली. एका दृष्टीने मला त्याचे थोडे आश्चर्य नाही तरी कुतूहल वाटले. अर्थात वेळ काढून जाणे एवढेच मला करावयाचे होते. ते मी केले. या वर्गात पू. गुरुजी यांचे बोलणे ४–५ दिवस मिळून १९ तास झाले. अन्य बौद्धिक वर्ग अगोदर व नंतर झाले. पण पू. गुरुजींनी एकच विषय मांडला व तो म्हणजे स्वयंसेवक वर्षानुवर्षात कसा घडतो. १५ वर्षांत तो समाजस्थितीशी कसा एकरूप होतो, होऊ शकतो. या भाषणातून पू. डॉक्टर यांच्याबद्दलच्या त्यांच्या

भावना अत्यंत उत्कटतेने मांडल्या होत्या. पू. डॉक्टरांसारख्या महापुरुषाने संघकार्याची रचना किती दूरदृष्टीने हिंदुसमाजातील सर्व दुर्गुण नष्ट करण्याच्या दृष्टीने ठरविली ती किती प्रभावी ठरली आहे हेही पू. गुरुजींनी सांगितले.

अखंड ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पचा कार्यक्रम ३–४ महिन्यांनी बंद करावा लागला. कारण येणाऱ्या स्वयंसेवकांची संख्या फारच कमीजास्त होऊ लागली. मला ह्या पहिल्या वर्गात शिक्षक म्हणून जायला मिळाल्यामुळे एक प्रकारचे समाधान मिळाले व अनेक गोष्टींची उजळणी होऊन मन स्थिर झाले. चित्रशाळेतील माझ्या उद्योगातून वेळ काढूनच मी गेलो होतो. याचाही एक धडा मिळाला.

अखंड ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या पहिल्या वर्गातून परत आल्यावर महाराष्ट्र प्रांताच्या शिबिरवजा मेळाव्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता. विभाग कार्यवाह या नात्याने पुणे, नगर, सातारा हा नवा विभाग करण्यात आला होता.

विभाग कार्यवाह

मा. काशीनाथपंत लिमये (प्रांत संघचालक) यांचे माझे शिस्त व संघाच्या कार्यातील कार्यक्रम याबाबत जमत असे. मा. काशीनाथपंत पुण्यात आले की आमच्या घरी फराळ, चहा, फळे नंतर त्रयोदशगुणी विडा अत्यंत आवडीने खात असत. मा. विनायकराव आपटेसुद्धा दर आठदहा दिवसांनी घरी येत असत तेव्हा चहा फराळाबरोबर संघकार्याच्या दृष्टीने अनेक संघबंधूंबद्दल चर्चाही होत असत. अनेकांचे परिचयातून कळणारे गुण आम्ही एकमेकाला सांगत असू.

मा. भाऊराव अभ्यंकर भारतातील प्रवास, निरनिराळ्या प्रांतांतील हिंदू वा पक्षीय पुढाऱ्यांशी त्यांचे जवळचे संबंध असत. यातून त्यांच्या घरी अनेक लोकांना चहापाणी, फराळ होत असे.

पुण्यातील चारी संघचालक मंडळींचा सुखसंवाद व्हावा म्हणून मी प्रत्येकाकडे दर पंधरा दिवसांनी सर्वांना एकत्र बोलावीत असे. फराळ, फलाहार, नवीन खाद्यपेये यांचा समाचार हेच बैठकीचे उद्दिष्ट असे. पुणे, पुणे जिल्हा, पुणे विभाग व प्रांत असा परस्परसंबंध त्यातून अनायास साधत असे. १९५० नंतर मी विभाग कार्यवाह असल्याने सर्व संघचालकांचा हा एकत्र येण्याचा

कार्यक्रम मी सुमारे ८–१० वर्षे तरी चालविला होता. १९५२ पासून पुढे १९६६ पर्यंत तरी चालू होता.

तसेच विभाग कार्यवाह या नात्याने पुण्यात उपस्थित असणाऱ्या शहर, जिल्हा, विभाग यातील प्रचारकांचा दर बुधवारी साप्ताहिक चहापानाचा कार्यक्रमही नियमितपणे चालू होता. १९६६ पर्यंत तो चालू होता. तो आमच्या घरी होत असे. प्रचारकांचा गुणगौरव हीच त्यात भूमिका होती. कार्यकर्त्यांच्या, अधिकाऱ्यांच्या एकत्र येण्यामुळे कार्यात सुसंवाद राहातो ही त्यामागची भूमिका होती.

१९५३ ते १९६३

विभाग कार्यवाह असताना पुण्यातील कार्याबद्दल मी थोड्या असमाधानात असताना मा. काशीनाथपंत मला म्हणाले की, "१९५४ पासून तुम्ही पुण्याचेही काम प्रमुख कार्यवाह म्हणून पाहा. त्याप्रमाणे १९५४ व १९५५ दोन वर्षे मी पुन्हा पुणे शहराचे काम पाहिले. श्री. बंडोपंत परचुरे हे शारीरिक शिक्षण प्रमुख होते. पुण्याच्या ज्या ज्या मंडलात एकही शाखा नव्हती, अशा मंडलात शाखा निर्माण करण्याचा प्रयत्न हा २ वर्षांतील कार्याचा विशेष भाग होता. कार्यवाह, मुख्य शिक्षक यांच्या बैठकीचा एक कार्यक्रम थोड्या सक्त शिस्तीने घेण्याचा प्रयत्न केला. १९५४ च्या दिवाळीमध्ये ४ दिवस 'जबाबदारी' या विषयावर कार्यकर्त्यांसाठी सलग भाषणे केली.

जोगेश्वरी मंडळात शाखा

१९५४ मध्ये पुण्यातील शाखा कार्याचा आढावा घेताना असे आढळले की, जोगेश्वरी मंडळात शाखा नाही. तेव्हा कार्यकर्त्यांच्या बैठकीत आवाहन केले की, १ मार्च १९५४ पर्यंत त्या मंडळात शाखा निघावी, न झाल्यास मीच सुरू करीन. त्याप्रमाणे १ मार्च रोजी जोगेश्वरी मंडळात शाखा सुरू करण्याचे काम मीच पार पाडले. श्री. सुहास जोशी व फडके असे दोघेजण बरोबर घेऊन फरासखान्यासमोरचे जागेत शाखा सुरू केली. जागा स्वच्छ केली. १ महिन्याने पोलीस मंडळी येऊन त्यांनी जागा सरकारी असल्याचे सांगितले. १–१॥ महिना तसाच घालवून नंतर शाखा अन्यत्र नेली. पहिल्या दिवसापासून सर्व कार्यक्रम सुरू केले.

१९५८ मध्ये एका अखिल भारतीय कार्यक्रमाची योजना झाली होती. इंदूर (मध्यप्रदेश) येथे भारतातील विभाग कार्यवाह या पदापर्यंतचे अधिकारी व प्रचारक यांचा एक शिबिरवजा मेळावा पू. गुरुजींनी योजला होता. आठ दिवसांचा हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व विविध कार्यक्रमांनी बहरलेला

होता. रंगपंचमीचा सण या आठ दिवसांत होता. इंदूरचे वैद्यराज रामनारायण शास्त्री हे मा. प्रांतसंघचालक या मेळाव्यातील प्रमुख यजमान होते. मध्य-प्रदेशातील पद्धतीला धरून त्यांनी पक्वान्नांच्या जेवणानंतर दुपारी पू. गुरुजींवर रंग उडवून सर्व कार्यकर्त्यांना रंग खेळण्याचे आवाहन केले. १॥–२ तास रंगाची धमाल सबंध शिबिरात चांगली जाणवली. श्री. मोहरीर, देवरस, क्षीरसागर इत्यादी अनेक कार्यकर्ते यात सामील झाले होते. संस्मरणीय असा तो कार्यक्रम झाला. पू. गुरुजी यांनी या शिबिराच्या निमित्ताने पुढील १०–१५ वर्षांच्या काळात केल्या जाणाऱ्या कार्याचा आराखडा सर्वांसमोर मांडला. संघातील अनेक कर्तृत्वसंपन्न संघबंधूंनी राष्ट्रीय हितबुद्धीने निरनिराळ्या क्षेत्रातील काम पूर्ण शक्तीने निर्माण करावे अशी भूमिका मांडली.

या आठ दिवसांच्या भारतीय स्तरावरील कार्यक्रमामुळे राजकीय, मजूर, जागतिक हिंदुधर्म, विवेकानंद शिला स्मारक, वृत्तपत्र या गोष्टी भारतीय स्तरावरून संघकल्पनेतून चालविण्यासाठी श्री. दीनदयाळ उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, दत्तोपंत ठेंगडी, दादासाहेब आपटे, एकनाथजी रानडे अशा मंडळींकडे एकेक काम देण्याची कल्पना मांडली.

आजचा संघ व संघपरिवार हा विस्तीर्ण व्यवहार १९५८ मधील या शिबिरात झालेल्या विचारमंथनातून निघाला हे मात्र खरे!

समाज वा राष्ट्र यांच्या हितासाठी करावयाचे निरनिराळ्या क्षेत्रांतील काम घडवून आणावे हीच संकल्पना अगदी थोडक्यात मांडली गेली व त्यातून व्यापक व्यवहार सुरू झाला हे आज सहज लक्षात घेता येईल.

मला स्वतःला संघाच्या शाखांचे कार्य करण्याबद्दल व होण्याबद्दल जी उत्सुकता होती, त्याबद्दलचा पाठही या शिबिरात मिळाला. माणसाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी परिवार कल्पनेचेही महत्त्व फार मोठे आहे यावर माझा विश्वास होता व आजही आहे. मला स्वतःला मात्र संघकार्यातील शाखा वाढविणे, उत्तम चालविणे व त्यातून सर्व क्षेत्रांत प्रामाणिक कार्यकर्त्यांची योजना केली जावी यासंबंधी आस्था वाटत होती. या दृष्टीने इंदूर येथे झालेल्या कार्यक्रमात मला भाग घ्यावयास मिळाला हे मी भाग्य समजतो.

इंदूरच्या शिबिराचा समारोप मात्र अगदी संस्मरणीय ठरला. पूजनीय गुरुजी बोलू लागले. शिबिराच्या कल्पनेपासून तो तहत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदु-

राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कटिबद्ध झाल्याच्या भावनेचा प्रत्येक स्वयंसेवकाने स्वीकार करून शक्य असेल त्या सर्व वैध मार्गांनी हे सर्व घडवून आणावे वगैरे सांगितले. पू. गुरुजींनी समारोपाच्या भाषणाला सुरुवात केली अन् थेंब थेंब पाऊस पडू लागला अन तो इतका पडला की आम्ही बसलो होतो तर मांडीपर्यंत पाण्यातच बसून आम्ही भाषण ऐकले. पू. गुरुजींनी यत्किंचितही जाणीव दाखविली नाही की पाऊस येत आहे ! सर्व जणांनी पाण्यात बसूनच संपूर्ण समारोप ऐकला. देशाच्या चिंतनातील हे प्रसंग अत्यंत साधेच मानले गेले – मानावे लागतील.

पुण्यातील मोतीबाग कार्यालय

सर्व कार्यक्रम यथापूर्व चालू होते. पुण्यात संघाचे कार्यालयाच्या जागेचा प्रश्न निकडीचा झाला होता. शनिवार पेठेतील सरदार बिवलकरांची जागा अहिल्यादेवी होळकर हायस्कूलने मागितली होती. मा. बाबाराव भिडे, काशीनाथपंत लिमये यांनी निरनिराळ्या जागा पाहाण्याचा प्रयत्नही चालविला होता. संघाला जागेची जरूर आहे असे कळताच सरदार बिवलकर स्वत: मा. बाबांना (भिडे) भेटले व निरोप दिला की, " माझी जागा मी संघालाच देऊ इच्छितो. रुपये × × हजार द्या व ते पाच वर्षात द्या. " इतक्या सवलतीने व आत्मीयतेने प्राप्त होणाऱ्या जागेचे साठेखत नंतर खरेदीखत होऊन आजचे ' मोतीबाग कार्यालय ' संघाच्या कार्यास उपलब्ध झाले. या जागेत बंगल्याची विहीर होती व आहे. त्याचा उत्कृष्ट वापर कार्यालयासाठी झाला. संघाचे कार्य परमेश्वरी कार्य म्हणूनच ही अशी जागा अशा सवलतीने प्राप्त झाली.

पानशेत पूर

१९६१ साली पानशेत व खडकवासला या धरणांच्या फुटण्यामुळे पुण्यात झालेला कहर संघकार्याला अनेक दृष्टींनी बाधक झाला. शेकडो स्वयंसेवकांचे घरदार, भांडीकुंडी, अन्य सामान अक्षरश: डोळ्यादेखत नाहीसे झाले. वीज नाही, पाणी नाही अन् काहीच नाही. दुकानदारांचा सर्वच्या सर्व माल पुराने गिळंकृत केला किंवा विघडविला. काय करावें, कसे करावे, राहावे कोठे, खाणेपिणे काय घ्यावे, कसे घ्यावे, सर्व प्रश्नच प्रश्न उभे राहिले. सबंध पुण्याच्या संबंधाचा हा प्रश्न झाला.

जागांच्या सोयी, अन्नधान्याची मदत, कपडेलत्ते, पांघरुणे यांच्या सोयी झाल्या पण कसेबसे जीवन घालविणे प्राप्त झाले. यात पुणे संघाच्या स्वयं-सेवकांनी सर्व मानवी प्रयत्न केले. मी विभाग कार्यवाह व बाळासाहेब साठ्ये विभाग प्रचारक होते. पुण्याच्या गुरुदक्षिणेबद्दलचा व अन्य खर्चाचा प्रश्न समोर होताच. पुण्यातील पुराने नुकसान न झालेले जेवढे जुने व ज्ञात स्वयंसेवक होते त्या सर्वांची नावे काढून, याद्या काढून, सर्वांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधून गुरुदक्षिणेत वाढ करण्याची विनंती केली व त्याचा परिणाम चांगला होऊन १९६० पेक्षा पाच-दहा हजारांनी दक्षिणा वाढू शकली व आपत्तीतून बाहेर निघण्याचे मनोधैर्य प्राप्त झाले. माझे विभाग कार्यवाहाचे काम चालू होते.

१९५० साली आमची कनिष्ट कन्या पौर्णिमा हिचा जन्म दि. २५ ऑक्टोबर १९५० रोजी झाला. त्यानंतर तिच्या प्रत्येक वाढदिवसाच्या दिवशी म्हणजे कोजागिरी पौर्णिमेला रात्री दुग्धपानाचा कार्यक्रम आम्ही सुरू केला. दि. २५ ऑक्टोबर १९५१ ला पहिल्या वाढदिवसाच्या कार्यक्रमास १०० मंडळी सर्व पक्षांची, सर्व क्षेत्रांतील बोलाविली होत. सर्वश्री एस. एम्. जोशी, ना. ग. गोरे, बाबुराव भिडे, बाबुराव गोखले, संघातील सर्व संघचालक, कार्यवाह, मुख्य-शिक्षक अशी सर्व मंडळी बोलाविली होती. सर्वांनी माझे आजोबा–वासुकाका जोशी–गणपती विसर्जनाचे दिवशी पुण्यातील सर्वांना बोलावित असत त्याची आठवण दिली.

हा कार्यक्रम सतत १० वर्षे आम्ही चालू ठेवला होता. १९६० साली त्याची सांगता पण केली. संघकार्याचे दृष्टीने मला सर्वांची जवळीक महत्त्वाची वाटत होती. पण भाऊराव अभ्यंकर या दिवशी आमचे येथे बराच वेळ बसत. आलेल्या, येणाऱ्या सर्वांना ते अगत्याने बसवून बोलून संघकार्याची माहिती सांगत असत. १० वर्षे हा कार्यक्रम सतत चालल्यामुळे अनेकांना त्यात गोडी उत्पन्न झाली होती. १९६१ पासून हा कार्यक्रम बंद करण्यात आला.

१९६३ ते १९७३

या दहा वर्षांच्या काळांत कसल्याही सोयीपेक्षा गैरसोयीच जास्त निर्माण झाल्या. पुणे विभाग कार्यवाहाच्या जागेवर अन्य संघबंधूची निवड झाली. तसेच मा. बाबाराव भिडे यांच्या प्रांतिक जबाबदारीत मला काही करता येणार नाही असे वातावरण उत्पन्न झाले. मी शांत राहिलो. मात्र दोन कार्यक्रम – ज्या मध्ये माझा सल्ला विचारला ते कार्यक्रम म्हणजे दर सप्ताहात एकदा मोती बागेमध्ये सर्व जुन्या-नव्या पदाधिकारी व विद्यमान कार्यकर्ते यांनी यावे. अशा प्रत्येकाला पुण्यातील एक शाखा आठवड्यातून एक वा अधिक वेळा जाऊन पालक या नात्याने त्या शाखेचे काम पाहावे आणि त्याचा अहवाल या साप्ताहिक बैठकीत देत जावा. कार्यक्रम मा. बाबांनी सुचविला. मला तो फार आवडला.

दुसरा कार्यक्रम म्हणजे पुण्यातील प्रत्येक जुन्या स्वयंसेवकाने आपल्या घरी साप्ताहिक बैठक भरवावी. ह्या साप्ताहिक बैठकीत चर्चा, पद्य वगैरे कार्यक्रम व्हावेत. मी या दोन्ही कार्यक्रमांना पूर्ण अनुकूलता दर्शविली. त्यात जे सुचविले, मला सांगण्यात आले ते सुरू करून दर सोमवारी आमचे घरी बैठक ९ ते १० घेऊ लागलो. ह्या साप्ताहिक बैठकीसाठी तीन लांबलचक आळींचा समावेश बैठकीचे क्षेत्राचा म्हणून केला आहे. या तीन आळीमध्ये ५–६ हजार कुटुंबे आहेत असा अंदाज काढला आहे. एवढ्या कुटुंबातून संघाची माहिती सांगता यावी, त्यांना संघकार्याशी पूर्ण परिचित करावे ही कल्पना ठेवली आहे.

सांगतील त्या शाखेवर आठ दिवसातून एक वा अधिक वेळा जातो. हे दोन्ही चालू आहे व ते राहीलच.

१९६८ पासून वैयक्तिकदृष्ट्या माझ्या चित्रशाळा प्रेसच्या व्यवसायात बरेच बदल – स्थित्यंतरे झाली. वास्तविक तो उद्योग उत्तम तऱ्हेने चालणे अशक्य नव्हते. १९४४ साली माझे आजोबा (वासुकाका जोशी) गेले अन त्यावेळी चित्रशाळा प्रेस सुस्थितीत होता. त्या प्रेसचा ट्रस्ट बनविण्यात आला. एकूण पाच ट्रस्टी होते. ह्या ट्रस्टींनी बहुमताच्या कल्पनेप्रमाणे प्रेसचा व्यवहार

चालविला व १९६८ मध्ये पावणेचार लाख रुपये देणे झाले म्हणून काहींनी राजीनामा दिला व बाकी राहिलेल्या ट्रस्टींच्या मार्गात कोर्ट-कचेरी, अडचणी आणल्या. कामगारांना योग्य न्याय दिला नाही. अन चित्रशाळा प्रेसची वाताहत करून टाकली. ९६ वर्षांचा जुना नावलौकिक असलेला प्रेस दुर्लक्षामुळे, वेळेवर आवश्यक गोष्टी न सुधारल्यामुळे तो दुसऱ्याकडे देण्यात आला. माझी १९६८ ते ७५ याच कामात निष्कारण गेली. मलाही तो टिकविता येण्यासारखी संधी मिळाली नाही. अत्यंत दुःख झाले. माझे प्रेस क्षेत्रातील यशस्वी बंधू जयंतराव माझे मदतीस आले पण अन्य ट्रस्टींनी त्यांना काम करता येणार नाही असेच वातावरण निर्माण करून ठेवले. त्याला माझा उपाय नव्हता. परमेश्वराची इच्छा म्हणूनच तो प्रेस गेला एवढेच म्हणणे सयुक्तिक वाटते. अर्थात माझ्या मनाची दुसरी एक बाजू आहे की मी प्रेस टिकवून ठेवणे फार जरूर होते. मला ते जमले नाही—हा माझा दोषच आहे. मानसिक उपद्रव टाळावा म्हणून पहिलीच विचारसरणी मान्य केली आहे. याच काळात म्हणजे १९६५ – ६६ च्या सुमारास माझा मुलगा रविंद्र बी. कॉम. झाल्यानंतर नागपूरला तृतीय वर्ष शिक्षित झाला. विस्तारक प्रचारक म्हणून नगर जिल्ह्यात गेला याबद्दल मला फार समाधान वाटले. माझे बंधू अनंतराव थोडेसे माझ्या मागून संघात आले पण संघकार्य प्रचाराने सर्वांना जागरूक ठेवावे—राघोभरारी कार्य सतत करीत आले व त्यांच्या शैलीने संघकार्याची जडणघडण कशी वाढेल याबद्दल सतत जागरूक राहिले. मा. बाबांचे बरोबर १०–१५ वर्षे तरी प्रांतात हिंडले.

चि. रविंद्र याने १९७३ पासून स्वतःचा असा एक छापखाना चालविला आहे.

माझी मोठी मुलगी सौ. ज्योत्स्ना अच्युत कुलकर्णी ही सी. पी. एड. झाली व दोन मुलासह संसारात राहून कल्याणमध्ये लहान मुलांसाठी संस्कार वर्ग कल्याण येथे चालविते. माँटेसरी पद्धतीची शाळा चालविते.

माझी नंबर दोन ची मुलगी पौर्णिमा ही एम. ए. झाली व राष्ट्रसेविका समितीच्या कार्यात नासिक येथे चांगलीच पुढे जात आहे. याचे समाधान मी मुद्दाम नमूद करतो. ५० वर्षांचा संघव्यवहार घरगुती दृष्टीने इतका आहे हे भाग्य समजणे इष्ट वाटते.

१९७३ ते १९८३

१९७३ मध्ये मला साठ वर्षे पूर्ण झाली. घरगुती धार्मिक समारंभ, नाते-वाईकांत जाणे इत्यादी गोष्टी घडल्या. चित्रशाळा प्रेसची जबाबदारी महाजन ॲण्ड असोसिएटस लि., या फर्मकडे देण्यात आली. पण मी १९७३ व ७४ मध्ये चित्रशाळा प्रेसमध्ये रोज जात होतो. १९७५ मध्ये ऑगस्ट ८ तारखेला तो पूर्णपणे बंद करण्यात आला. वाईट वाटले.

१९७५ च्या फेब्रुवारी महिन्यात माननीय बाबांनी मला विचारले की, 'वसंतराव, या वेळच्या संघ शिक्षा-वर्गासाठी सर्वाधिकारी म्हणून काम कराल का?' मी सांगितले की, 'दोन दिवसात सांगतो.' घरी थोडा विचारविनिमय केला. कारण ३० दिवस पुण्यात परंतु घराबाहेर राहावयाचे होते. दोन दिवसांनी माझी मान्यता व स्वीकृती मा. बाबांना कळविली. मला बरे वाटले. मे महिन्यात पूर्णत्वाने करावयाचे काम व त्यातील जबाबदारी फार मोठीच होती. शिवाय माझे काही शारीरिक दोष कसे घालवता येतील हाही विषय महत्त्वाचा होता. मी माझी तयारी सुरू केली.

एप्रिल १९७५ मध्ये मा. बाबा म्हणाले 'वसंतराव, तुम्ही सर्वाधिकारी होणार की कसे?' मी म्हणालो, 'माझी मी पूर्वतयारी केली आहे, आता मलाच ते काम करू द्या. मला विचारलेत तेव्हापासून मी माझी व्यावहारिक दृष्ट्या सर्व तयारी केली, ती आता इतक्या थोड्या अवधीत बदलणे कठीण आहे.' मा. बाबांच्या मनात काय होते कळले नाही. नंतर रीतसर ४ मे पासून संघ शिक्षा वर्ग सुरू झाला. मग ओ. टी. सी. म्हणजे संघ शिक्षा वर्गांच्या सर्वाधिकारी जबाबदारीचे रहस्य मी १९३८ मध्येच समजावून घेतले होते. पू. गुरुजींनी सर्वाधिकारी नात्याने नागपूरला काम कसे केले, किती चोखपणे आलेल्या प्रत्येक स्वयंसेवकाशी जिव्हाळ्याचे संबंध उत्पन्न केले. संघ शिक्षा वर्गात आलेल्या प्रत्येक स्वयंसेवकाचे बाबतीत जागरूक राहून, संघकार्याबद्दल स्पष्ट कल्पना देणे व त्या दृष्टीने त्याच्या १-२ वर्षाच्या कार्यक्रमाची रूपरेषा आखणे ह्या गोष्टी पू.

गुरुजींनी केल्या अन त्यामुळे पू. डॉक्टर हेडगेवार यांना गुरुजींबद्दल अत्यंत विश्वास वाटू लागला. या घटनेची हकिकत लक्षात ठेवून मी १९७५ च्या पुणे संघ शिक्षा वर्गाबाबत काळजीपूर्वक वागण्याचा निर्धार केला. अगदी १–१ दिवस मोजत प्रत्येक दिवशी संघकार्याबद्दल जागरुकतेने जाणीव ठेवून सर्व व्यवहार व वागणूक ठेवण्याचा मी प्रयत्न केला. प्रांताच्या अधिकाऱ्यांनी क्वचित् कोठे अधिक्षेप करण्याचा प्रयत्न केला. मी अर्थातच याबाबत सतर्क राहून माझ्या मनाची समतोल स्थिती बिघडू दिली नाही. मनुष्याच्या व्यवहारात घडणारे ते सर्व मी मान्यच केले, कारण त्यामुळेच समाधान लाभले !

१९७५ च्या संघ शिक्षा वर्गात मी माझी जबाबदारी निष्कलंक रितीने सांभाळली व प्रत्येक स्वयंसेवकाला जाणीवपूर्वक वागण्याचे आवाहन केले. शिक्षार्थी स्वयंसेवकांच्या व्यक्तीगत भेटी मात्र पूर्ण समाधानकारक रितीने घेता आल्या नाहीत. संघ शिक्षावर्ग हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम म्हणावा लागेल. या कार्यक्रमामुळे गावोगावच्या, प्रामुख्याने तरुण हिंदू युवकांना संघाचा अगदी जवळून परिचय करून देऊन त्यांच्या ठिकाणी संघ कार्याबद्दल जिव्हाळा व आत्मीयता निर्माण करण्यासाठी सामूहिक व वैयक्तिक प्रयत्न व संस्कार करता येतात. संघ कार्याची सतत वाढ व मजबुती यासाठी संघ शिक्षा वर्ग हे अत्यंत उपयुक्त ठरले आहेत. सतत ४ आठवडे वा अधिक दिवस एकत्र निष्ठावान कार्यकर्त्यांच्या सहवासात राहून संघाची अत्यंत आत्मीयतापूर्ण ओळख होण्यासाठी संघ शिक्षावर्ग हा प्रभावी कार्यक्रम आहे. अशा या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी घेताना ४० वर्षांनंतरही भीती वाटली नाही; पण जबाबदारी पार पाडण्याची हुरहूर मात्र अवश्य वाटली. शेकडो कार्यकर्ते यात भाग घेतात, त्यामुळे एकट्यावर काहीच नसले तरी त्या कार्यक्रमाचा प्रमुख म्हणून वागताना दर तासाची काळजी घेणे आवश्यक वाटत होते. माझ्या हातून ती जबाबदारी नीटपणे पार पडली याबद्दल मला समाधान वाटले. आणि परमेश्वराचे आभार मानले.

१९७५ च्या वर्गात श्री. यशवंतराव गायकवाड (वसई) (सध्याचे विश्व-हिंदु परिषदेचे कार्यवाह) हे वर्गाचे कार्यवाह होते. अत्यंत मनमिळाऊ व गोड स्वभावाचे हे संघबंधू सबंध वर्गाच्या काळांत कशांतही उणीव राहू नये असा प्रयत्न करीत होते. त्यांची व माझी अनेक विषयावरून चर्चा झाली.

विचारपूर्वक संघकार्यासाठी वेळ देत देत त्यांचा मानस सर्व वेळ संघकार्यासाठी देण्याची होता. त्यांची तयारी ते करीत होते. जे काम करण्यावाठी मला वेळ मिळणार नाही, ते काम त्यांना सांगितले, ते पूर्ण होत असे. वर्गाची जागा नवीन मराठी शाळा व रमणबाग शाळा अशी होती. सुमारे ५०० पर्यंत स्वयंसेवक या वर्गासाठी आले होते. मात्र या वर्गानंतर आणीबाणी मिसा येईल अशी अंधुकशीही कल्पना आली नव्हती.

आणीबाणी आणि दुसरी बंदी

१९७५ जूनमध्ये भारतात आणीबाणी पुकारण्यात आली व सर्व विरोधी पक्षांच्या प्रमुखांना भारतवर्षातील निरनिराळ्या तुरुंगातून स्थानबद्ध करण्यात आले. ४ जुलै १९७५ रोजी रा. स्व. संघावर दुसऱ्यांदा बंदी घालण्यात आली. ४ जुलै १९७५ रोजी सर्व संघचालक व अन्य प्रमुख कार्यकर्ते यांना स्थानबद्ध करण्यात आले. बाकी बरेचजण मोकळेच राहिले. संघ शाखा बंद झाल्या. पण मंदिरांतून दररोज गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी आदी धर्मग्रंथ नियमाने वाचण्यास सुरुवात केली. आम्ही साप्ताहिक बैठक व शाखातील स्वयंसेवकांनी पुण्यात केसकर विठोबा मंदिरात गीतावाचन सकाळ-संध्याकाळ सुरू केले. संबंध कायम राहावा, वेळ येताच संबंध असले म्हणजे सर्व घडविता येते हा अनुभव ! पूर्वीचा-जुना ! सप्टेंबर १९७५ अखेर सर्व जैसे थे राहिले. तेव्हा राज्यनिहाय दट्टे आले, की ४ महिने झाले तरी संघ कार्यकर्ते हिंडतच आहेत. मग चक्रे फिरून १९४८ च्या याद्या काढून जिल्हानिहाय पकडी सुरू झाल्या.

पुण्यात दुसरी म्हणजे ४ जुलै नंतरची पकड १७ ऑक्टोबर १९७५ ला झाली. तशीच महाराष्ट्रभर झाली. श्री. अनंतराव देवकुळे आदि दि. १७।१०।७५ला आत गेले. मी थोडा मागे राहण्याचा विचार केला. अनंतराव यांना नेल्यानंतर त्याच रात्री मी एका मित्राच्या घरी गेलो. पण रिक्षातून गेलो. त्या रिक्षावाल्याने ते ठिकाण पोलिसाला सांगितले. सकाळी त्या मित्राकडे चौकशीस शिपाई आले. त्याने मी नाही म्हणून सांगितले. एकेक तासाने बिनपोषाखातील लोक येऊन गेले. चौकशी करून गेले. हे फार झाले असे ठरवून त्या मित्राकडून त्याच्या स्कूटरवर सामान टाकून विद्यापीठाचे बाजूस एका अर्धांगपीडित पेशंटला आसनांचे पाठ द्यावयाचे होते म्हणून ४ दिवस तिकडेच राहण्याचे ठरवून

गेलो व ते सोयीचे झाले. ज्या मित्राने मला रात्रीच्या वेळी जागा दिली त्याचे आभार मानले. पुढे ५–६ दिवस आसनांचे पाठ संपल्यावर बंगलोरला जावे की अलोरे येथे जावे याचा विचार केला. जेथे दि. २६ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर १९७५ आसनवर्ग ठरला होता तेथे जावे याचा विचार केला. अलोरे येथे मला अटक होईल अशी शंका होतीच.

विचारांती असे ठरविले की अलोरे येथेच जावे. जे होईल ते होऊ द्यावे. म्हणून दि. २२–१०–७५ रोजी अलोरे येथे जाऊन पोचलो. दुपारी ४ ला पोचलो अन् ५॥ मला वारंट आले. रत्नागिरी जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांचे वारंट घेऊन रत्नागिरीचेच २ पोलीस येऊन पोचले. जेवणखाण रीतसर झाले पण वारंटाप्रमाणे पोलिसांनी सरकारी विश्रामगृहात व्यवस्था करून तेथे झोपण्यास सांगितले. दि. २३ ला (आक्टोबर ७५) सकाळच्या ८ च्या गाडीने पुण्याकडे परत निघून दुपारी ५ ला पुण्यास पोचलो. कुठल्या पोलीस स्टेशनला जावयाचे हे काही ठरेना. पण प्रथम इंजिनियरिंग कॉलेज, मग लष्कर, शेवटी विश्रमबाग पोलीस स्टेशनमध्ये सर्व पत्ता लागला व संध्याकाळी ७–७॥ च्या सुमारास परिचयाचे गुप्त पोलीस भेटले. त्यांच्या परवानगीने तेथून घरी जाऊन सर्व सामान बदलून स्थानबद्धतेच्या दृष्टीने लागणाऱ्या गोष्टी बरोबर घेऊन जेवण करून पोलिसांच्या गाडीतून येरवडा जेलच्या दरवाजाशी रात्री ९ ला पोचलो. प्रवेश मिळून आत जाण्यास २ तास लागले. तेथपर्यंत ठिकठिकाणाहून आलेले संघबंधू, विशेषत: सांगलीचा मोठा गट, मालवणचे श्री. पाटकर वकील यांचेसह आत गेलो.

जेलमध्ये १९४८ पेक्षा वेगळी काही रचना झाल्याचे भासले. तसेच आलेले कार्यकर्ते १९४८ च्या यादीतलेच असावेत असे लक्षात आले. साधारण १९७५ वा अलीकडील १० वर्षांतले कार्यकर्ते दिसले नाहीत. यावरून हे लक्षात आले की १९४८ ची यादीच फक्त सरकार-दरबारी आहे.

मिसाखाली स्थानबद्धता दिलेल्या व्यक्तीला पहिला वर्ग द्यावयाचा असा कायद्याचा आधार घेऊन मा. भाऊराव अभ्यंकर, मा. बाबा भिडे यांनी जेल सुपरिन्टेडेंटकडून मिसाखाली येणाऱ्या सर्वांना पहिला वर्ग देण्याचा आग्रह केला व तो त्यांनी मानला. येरवडा जेलमध्ये संघ स्वयंसेवक, महाराष्ट्रातील सर्व संघचालक व कार्यकर्ते २५० आले होते. भारतीय जनसंघ, समाजवादी, साम्यवादी, संघटना

काँग्रेस इत्यादि १६० होते. अशा ४१० मंडळींना येरवडा जेलमधील ६–७ बराकी व सुमारे ७० एकेरी खोल्या (लॉक-अप) यामध्ये ठेवण्यात आले होते.

प्रत्येकाला स्वतंत्र कॉट, गादी, चादर, मच्छरदाणी, टेबल-खुर्ची, टेबल-लॅम्प, पेन इत्यादी गोष्टी; तसेच ताट, वाट्या, तांब्या या सर्व गोष्टी देण्यात आल्या. कपडे वर्षातून दोन सेट देण्यात आले.

यानंतर वाचावयाची पुस्तके, लिहिण्याचे सामान, खाद्यपेये अशा सर्व गोष्टी बाहेरून आणावयाची परवानगी मिळाली होती. ज्याच्या त्याच्या घरच्या लोकांना १५ दिवसातून एक भेट मिळत होती.

निरनिराळ्या गटांचे कार्यक्रम सुरू झाले. संघाचेही कार्यक्रम पद्धतशीर सुरू झाले. रात्री खोल्यांना कुलुपे घालावी, न घालावी, पाण्याची सोय, दिवे मालवण्याची वेळ इत्यादी बाबतीत सोयीने मागण्या करण्यात आल्या. ज्या बाबतीत मान्यता मिळाली नाही त्यासाठी धरणे धरणे, उपास करणे इत्यादी उपाय चालू होते.

पू. बाळासाहेब देवरस, प्रांतभरचे सर्व संघचालक, कार्यवाह अशी सर्व मंडळीही होती. समाजवादी गटांतील ग. प्र. प्रधान, शिरूभाऊ लिमये, पाटील, राजहंस, भाई वैद्य आदि मंडळी होती. प्रत्येकाने आपापल्या व्यवस्था लावून घेतल्या होत्या.

निरनिराळे वर्ग व बैठका सुरू झाल्या. श्री. अनंतरावांनी झोपमोड बैठक दुपारी १ ते २ जवळ जवळ सर्व तरुणांची सुरू केली. भय्यासाहेब गौतम यांनी, वाग्भट, चरक, सुश्रुत या आयुर्वेदीय ग्रंथाचे वाचन व पाठाप्रमाणे काही आयुर्वेदीय भस्मे, वटी, माझा करण्याच्या योजना सुरू केल्या.

ग. प्र. प्रधान यांनी इंग्रजी बोलण्याचे वर्ग, फ्रेंच वर्ग, राज्यशास्त्र वर्ग, जर्मन वर्ग इत्यादी वर्ग सुरू होत होते – झाले होते.

मी दि. २३ ला (२३–१०–७५) आत गेलो अन २५–१०–७५ पासून आसन वर्ग सुरू केले. किती दिवस वर्ग घ्यावे लागणार, किती दिवस आंत राहावे लागणार ? याचा अंदाज कोणी सांगू शकत नव्हते. आसन वर्गाला सर्व पक्ष व गटाचे लोक येऊ लागले होते. जेलच्या नियमाप्रमाणे स्थानबद्धांना जेवण बनवून घेऊन व्यवस्था करण्याचे अधिकार सर्वांनी वापरले. जेलमधून मिळेल ते सर्व वापरून कमी पडेल ते सर्व बाहेरून मागविण्याची

व्यवस्था चालू होती. संघाचे सहाही उत्सव शक्य तेवढ्या चांगल्या पद्धतीने पार पाडावयाचे, दत्तजयंती, गीता जयंती, इत्यादी सणांना किर्तन, प्रवचनादि व पूजादि कार्यक्रम, प्रसाद वाटप इत्यादी सर्व पद्धतशीर चालू होते. आसनांच्या वर्गात १५–१६ आसने व साधा प्राणायाम याचा पहिला वर्ग तीन महिने झाल्यावर दुसरा गट १५–१६ आसनांचा व अन्य प्राणायाम अशा तऱ्हेने एकूण ७ गट तयार करण्यात आले. २५ ऑक्टोबर १९७५ पासून १९७६ च्या दिवशी १ वर्ष संपले. २५ जून १९७६ च्या ४ दिवस अगोदर मिसा खालची स्थानबद्धता १२ महिन्यांची २४ महिने करण्यात आली. एका सरकारी ऑर्डरने हे घडले. आम्हा सर्व लोकांत अत्यंत निराशेचे वातावरण उत्पन्न झाले. भेटीला येणाऱ्या घरच्या लोकांनी उद्वेग, चिंता व रागही व्यक्त केला; पण कोण काय करणार? काढले असेच आणखी दिवस काढायचे असे बोलणे सुरू झाले. दुसरे वर्ष सुरू झाले.

संघ कार्याचे दृष्टीने सर्व गोष्टी प्रगत होत होत्या. रामभाऊ म्हाळगी सर्वांबरोबर अत्यंत उत्साहाने बोलत चालत होते. बाहेरून नवीन एक पक्ष स्थापन केला जाण्याची वार्ता रामभाऊंनी गटागटांत सांगितली व सर्वांची मते ऐकून घेतली. योगासने पुस्तकाची ६ वी आवृत्ती १९७६ मध्ये पू. बाळासाहेब देवरस यांचे हस्ते मा. रामभाऊंनीच प्रकाशित केली.

संघ कार्याचे दृष्टीने अन्य पक्षांचे-गटांचे जे प्रमुख होते त्यांचे व बाळासाहेब देवरस यांचे घनिष्ट संबंध आले. संघाबद्दलच्या ऐकीव कल्पना व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यांचा मेळ घालता येत नाही असे अन्य पक्षीयांनी मोकळेपणाने कबूल केले.

अन्य पक्षीयांच्या बैठका, कार्यक्रम होत. त्याला आम्हा सर्वांना बोलावीत. संघाच्या तर्फे होणाऱ्या कार्यक्रमांना अन्य सर्वांना बोलाविले जाई. व्यवहारावरून अन्य पक्षांचे कार्यक्रम बऱ्याच वेळा आपसातील कलहात संपत; तर संघाचे कार्यक्रम ठरल्याप्रमाणे अगदी शांतपणे पार पडत. १९७५ मध्ये संघ व अन्य विचारांच्या मंडळींतील हा फरक प्रकर्षाने जाणवत होता. संघ काही ध्येय समोर ठेवून ते गाठण्याच्या दृष्टीने सर्वघटक प्रगती करीत होते. तर अन्य विचारांच्या मंडळींना कार्यक्रम पार पाडतानाच सर्व कलहाला तोंड द्यावे लागे. सामाजिक शिस्तीला संघाची मंडळी पूर्ण बांधलेली होती; तर अन्य विचारांच्या मंडळींत त्याबद्दल मतभेदच होते.

एकच उदाहरण विशेष लक्षात घेण्यासारखे घडले, ते म्हणजे १९७७ च्या २६ जानेवारीचा प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम. सर्व विचारांच्या मंडळींनी मिळून ठरविलेला सर्व पूर्वयोजनेने चालू होता. शेवटचे वंदेमातरम् गीत म्हणणे सुरू झाले. ठरल्याप्रमाणे संपूर्ण गीत म्हणणे सुरू होताच, एक समाजवादी मित्र खडसून व्यासपीठाकडे धावले व म्हणाले, 'पुरे करा हे संघाचे गाणे!' दुर्दैव त्याचे व देशाचे! दुसऱ्या त्यांच्या समाजवादी मित्राने त्यांच्या कॉलरला पकडून मागे ओढून त्यांना खोलीत नेले. सर्वजण स्तब्ध होते; कारण वंदेमातरम् गीत चालू होते व ते ठरल्याप्रमाणे संपूर्ण म्हटले गेले.

संपूर्ण वंदेमातरम् गीताची गोडी व भावना किती उज्ज्वल आहेत! ते संपूर्ण म्हटले जात नाही वेळेसाठी! जेलमध्ये ठरल्याप्रमाणे प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी ते म्हटले, तर त्याचा आनंद मानावयाचा सोडून एका समाजवादी मित्राला ते बंद करावेसे वाटले! केवढा हा अधःपात! अशा अनेक गोष्टी जेलमधील कार्यक्रमात घडल्या, त्यामुळे संघ विचार व अन्य विचार यात कसा, केवढा फरक आहे हे कळले! संघ राष्ट्रजीवनाशी कसा निगडीत आहे. या राष्ट्राचा प्रत्येक घटक आपला मानण्यात काय रहस्य आहे, याची संघ कार्यकर्त्यांच्या मनाची ठेवण अन्य विचारांनी प्रेरित झालेल्या, वर्षेच्या वर्षे राजकीय जीवनात घालविलेल्या मंडळींना साधा आचारसुद्धा राष्ट्रीय दृष्टिकोणातून संयमपूर्वक सांभाळता येत नाही—ही मनाची दरिद्रता कशी जाणार?

जेलमध्ये डॉ. आढाव आम्हा सर्वांबरोबरच पण जेलच्या एका टोकाच्या खोलीत होते. बाग फुलविण्याचा प्रयत्न करीत होते. हाताने स्वयंपाक करून खात. अनेक कार्यक्रमांची खास आमंत्रणे दिली तरी कोणत्याही कार्यक्रमाला येत नसत, हे पाहून वाईट वाटत असे. मी त्यांना ५–६ वेळा तरी भेटलो होतो.

पुढे बाहेर आल्यावर जेलमधील अनुभवांची "संघाची ढोंगबाजी" अशी एक गलिच्छ पुस्तिका डॉ. बाबा आढाव यांनी छापून प्रसिद्ध केलेली पाहाण्यात आली. वाईट वाटले. राष्ट्रीय वृत्तीचा, सज्जन, निरुपद्रवी; पण ध्येयनिष्ठ विचारांचे इतके वावडे एखाद्या माणसाला असावे हे पाहून वाईट वाटले. आसनांच्या वर्गाला मुद्दाम बोलाविले होते; पण केव्हाही न येता आसनांच्या वर्गाला संघाची ढोंगबाजी यात समावेश केलेला पाहून दुःख झाले.

अन्य विचारांच्या मंडळींशी विचारविनिमयाचे अनेक प्रसंग आले. त्या त्या

वेळी संघदृष्ट्या भारतातील एकात्मतेमध्ये संघ पद्धत कशी परिणामकारक आहे याची भारतभरची वनसावी क्षेत्रातील अनेक ठिकाणची उदाहरणे पू. बाळासाहेब देवरस यांनी सर्वांच्या समोर नेमक्रेपणाने ठेवली. पू. बाळासाहेब यांचेबद्दलचा आदर सर्वांच्या मनात द्विगुणित, शतगुणित झालेला दिसला; पण वैचारिक संकुचितता जशीच्या तशीच राहिली.

संघाचे जेवढे कार्यकर्ते, अधिकारी, स्वयंसेवक तेथे होते, त्या सर्वांमध्ये सामंजस्य व समजूतदारपणा अवश्य होता; पण काही प्रसंगी जेलमध्ये म्हणून, अधिकार नसला तरी बाहेरच्या थाटाने कुत्सित स्वभावाचे दिग्दर्शन झाले. अर्थात् त्याच्या मर्यादा संभाळल्या गेल्या ही संघाची पुण्याई !

संघकार्यात मी जसा वाढलो, संघात काम करीत गेलो, वाटेल त्यापेक्षाही जास्त काम केले, समाधान पावलो. मला कसल्याही वैयक्तिक महत्वाकांक्षेची झळ संघकार्यात पोचलीच नाही. त्यामुळे काही प्रसंग मी विसरू शकलो. संघात जे जे घडते ते आपली निष्ठा वाढविण्यासाठीच ही माझी दृढ भावना होती व आजही तीच आहे.

मी संघचालक होतो, विभाग कार्यवाह होतो, काही अधिकार नसताना सर्वेसर्वा होतो. आणि आज मी एक स्वयंसेवक, साप्ताहिक बैठक, एक शाखा व साप्ताहिक एकत्र कार्यक्रम या तीन गोष्टींव्यतिरिक्त माझा संघकार्यात कुठेही भाग नाही. यात मला खरोखरच पूर्ण समाधान आहे. पुढे बदल झाला तरी तो मानीत.

नुकतेच जुलै १९८३ मध्ये मला बऱ्याच दिवसांनी "शाखा" या विषयावर बोलावयास सांगितले अन् मी जे बोललो ते इतके वस्तुस्थितिनिदर्शक झाले की, जणू मी १९३६ च्या गंजपेठ संघशाखेवर आहे, असेच मला वाटले.

येरवडा जेलमधील १७ महिन्यांत मी मनाने पुष्कळ शांत व स्वस्थ झालो.

वर म्हटल्याप्रमाणे स्थानबद्धतेत येरवडा जेलमध्ये २५-१०-१९७५ पासून मी आसन-वर्ग सुरू केला अन् निरनिराळ्या बराकींत ३-३ महिने नवीन नवीन आसनगटांसह वर्ग घेतले.

वयोमानाप्रमाणे २१ वयापर्यंतच्या अन्य मित्र व संघबंधूंना होणारे शारीरिक उपद्रव कमी होऊ लागले. याचे समाधान व आनंद मला फार मोलाचा वाटला. २५ ऑक्टोबर १९७६ रोजी आसनवर्गाला १ वर्ष पूर्ण झाले याचे

समाधान व्यक्त करावे असे मी म्हटले तर अनुभव घेतलेल्या मंडळींनी "मानपत्र" देण्याचे ठरवून एक चांगलाच मोठा घाट घातला. त्यांचे म्हणणे असे की, येथे अनेक वर्ग आहेत, चाललेत. पण आसन वर्गामुळे तुम्ही जन्माची शिदोरी बांधून देत आहात तेव्हा मानपत्र दिलेच पाहिजे.

योगासने पुस्तकाची ६ वी आवृत्ती तयार झाल्याचे वृत्त कळल्यानंतर रामभाऊ म्हाळगी मजकडे आले व म्हणाले, 'वसंतराव आपण ६ व्या आवृत्तीच्या प्रकाशनाचा समारंभ करू.' मी म्हटले की, 'मी कोणत्याच आवृत्तीचे प्रकाशन समारंभाने केले नाही – हे कशाला ?' रामभाऊ म्हणाले, 'वसंतराव, फक्त हो म्हणा. आम्ही सर्व करतो.' पू. बाळासाहेब देवरस यांच्या अध्यक्षतेखाली सर्व मिसाबंधूंच्या उपस्थितीत ६ व्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. कै. रामभाऊ म्हाळगी व अण्णा जोशी यांनी सर्व पुढाकार घेतला होता. धन्य असो.

जेलच्या १७ महिन्यांच्या वास्तव्यात महिलांसाठी योगासने, घेरण्डसंहिता व हठप्रदीपिका या दोन संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषांतर असे लेखन झाले.

माझा स्वतःचा योगाभ्यास एका दिशेने प्रगतिपर होऊ लागला. पहाटे ४ ते ६ ही माझी वेळही निश्चित झाली. ग्रंथांतरी वर्णन केलेल्या टप्प्यांनी आसने, प्राणायाम करण्याची कल्पना ठेवून पूर्वी कधी केला नाही इतक्या मोजमापाने माझा योगाभ्यास सुरू झाला. जेलमध्ये एक जेवण व दुसऱ्या वेळी दूध घेण्याचा उपक्रम सुरू करता आला तो तसाच चालू ठेवण्याने जीवनक्रमात बदल झाला.

जेलमधील कार्यक्रमात संघाचे सर्व उत्सव उत्तम तऱ्हेने पार पडत होते. २० मार्च (१९७७) ला पाडव्याचा उत्सव पू. डॉक्टरांचे स्मरणकार्य–पू. बाळासाहेब देवरस यांनी संपन्न केले. फार आनंद झाला.

वर एका ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे श्री. रामभाऊ म्हाळगींनी सर्वांची मान्यता घेतलेल्या नव्या पक्षाची स्थापना ४–५ पक्षांनी एकत्र येवून जनता पक्ष स्थापन केला होता. आणि १९७७ च्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत जनता पक्ष केंद्रस्थानी निवडून येऊन सरकार बनविण्याच्या सर्व गोष्टी पार पडल्या.

हे सर्व २० मार्च १९७७ ला रात्री पार पडले. जेलमध्ये ८–१० ट्रान्झिस्टर्सवर निवडणुकीचे निकाल ऐकले जात व २९५ वा अधिक सभासद निवडून येऊन जनता पक्षाचे सरकार अधिकारावर येण्याचे ठरले.

आणीबाणी रद्द करण्यात आली व संघावरची बंदी उठविण्यात आली. दि. २१ मार्च १९७७ ला सकाळपासून स्वयंसेवकांच्या सुटका होऊ लागल्या. आम्ही पुण्याचे, तेव्हा आम्ही सर्वात शेवटी रात्री ९ ला सुटलो. २० मार्चची सकाळ अन २१ मार्चची सकाळ यामध्ये एकदम फार मोठे स्थित्यंतर अनुभविताना क्षणभर ब्रह्मानंदाचाच अनुभव घेता आला.

१९७७ ला बाहेर आल्यानंतर संघाचे कार्याची फारशी पडझड न वाटता सर्व शाखा पूर्ववत सुरू झाल्या. मोतीबाग कार्यालयातील भिंत, जागा, पडझडी मात्र ७–८ दिवसांनी नीट झाल्या. पुण्यातील सर्व कार्य त्या मानाने फार लौकर पूर्ववत् झाले.

१९७७ हे साल मी ठरविलेल्या दोन गोष्टींनी व्यापले गेले. महाराष्ट्रात शंभर गावांना आसनांचे वर्ग घेण्याचा संकल्प सोडला व त्याप्रमाणे जुलै १९७७ मध्ये बार्शीला पहिला वर्ग फक्त पाच दिवसांचा झाला. त्यानंतर कोल्हापूर, माळीनगर, सोलापूर असे तीन वर्ग १९७७ मध्ये झाले.

इ. स. १९७८ साली दिल्ली येथे एका योग कार्यक्रमासाठी गेलो असताना वनवासी-आदिवासी अशा ९० वा अधिक क्षेत्रांतून संघाने चालविलेल्या कामाचे दर्शन झाले. दिल्लीच्या एका टोकाला शिबिरवजा पद्धतीने ७०० कार्यकर्त्यांचा मेळावा पाहण्याची संधी मला मिळाली. फार समाधान वाटले.

या देशात ख्रिश्चन धर्मानुयायांनी कोठेही कानाकोपऱ्यात जाऊन कसल्याही लोकांच्या जीवनात प्रभू येशूचा समावेश करण्याचे व्रतच पत्करले आहे. त्याची जाणीव सहृदय संघबंधू डॉ. देशपांडे यांना झाली व मध्यप्रदेशातील उत्तर भागात जनकल्याण केंद्राच्या स्थापनेतून वनवासी-आदिवासी लोकांच्या सेवेत प्रविष्ट होण्याचे ठरवून कार्य सुरू केले. श्री. रामभाऊ गोडबोले, मनोहर सहस्रबुद्धे इत्यादी अन्यान्य अनेक स्वयंसेवकांनी राज्यानिहाय आदिवासी-वनवासी क्षेत्रें शोधून काढून तेथे संघपद्धतीने व समाजसेवा करण्याच्या कल्पनेने जवळ जवळ ९८ ठिकाणी काम सुरू केले व त्या कामास गती देण्याच्या दृष्टीने शिबिर भरविले होते. ठिकठिकाणी हे कार्य ज्या प्रकारच्या लोकांसाठी सुरू केले ती प्रत्यक्ष मंडळी आपापल्या वस्तीच्या वेषात वह्या-पेन्सिली घेऊन टिपणे करताना पाहून बरे वाटले. संघस्वयंसेवकांनी मनावर घेऊन या क्षेत्रात जे योगदान केलेले दिसून आले ते फार महत्वाचे वाटले. ही हिंदुभूमी, येथील

कानाकोपरा आर्यवस्तीचा ठरावा, मंगल भूमिका स्थिर व्हाव्या यासाठी प्रयत्न करणारे संघाचे स्वयंसेवक ही एक सुखद व समाधानाचीच गोष्ट वाटली. सुमारे ५-६ तास तेथे थांबून आम्ही परत आलो दिल्ली संघकार्यालयात !

१९७८ जानेवारीपासून भारताच्या यात्रा करण्याचा उपक्रम समोर घेतला. सौ. उषाताई व मी ८ वर्षांच्या अंतराने (त्या ५६ व मी ६४ वर्षांचा होतो.) आता यात्रा करणे इष्ट व योग्य आहे असे आम्ही दोघांनी (मी व सौ. उषा) ठरविले अन् तो कार्यक्रम पुढीलप्रमाणे पार पडला —

(१) ५ ते १४ जानेवारी १९७८ – गोवा, गोकर्ण, महाबळेश्वर, गणपति पुळे, परशुराम मंदिर (२१०० कि. मी.)

(२) २९ मार्च ते १५ एप्रिल १९७८ – कानपूर, लखनौ, अयोध्या, वाराणसी, पाटणा, गया, नेपाळ, पशुपती, काठमांडू, अलाहाबाद, जबलपूर (४५०० कि. मी.)

(३) २२ जुलै ते १० ऑगस्ट १९७८ – श्रीशैल, कालाहस्ती, पद्मावती, गिरिबालाजी, रामेश्वर, कन्याकुमारी, दक्षिण भारत.

(४) १४ ते २४ ऑक्टोबर १९७८ – परळी वैजनाथ, औंढ्या नागनाथ, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, घृष्णेश्वर, शिर्डी, गाणगापूर इत्यादि.

(५) २७ नोव्हें. ते १९ डिसें. १९७८ – द्वारका, सोमनाथ, गिरनार, दत्तपादुका, अबूपहाड, दिलवाडा मंदिरे, पुष्करतीर्थ, नाथद्वारा, उदयपूर, ओंकारेश्वर, महांकालेश्वर.

(६) १७ मे ते १३ जून १९७९ – दिल्ली, हृषिकेश, हरद्वार, गंगोत्री, जमनोत्री, केदारनाथ, बद्रिनारायण, उत्तरकाशी, गौरीकुंड, सहस्रधारा, मसुरी इत्यादि.

(७) ६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट १९७९– आग्रा, दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास फत्तेपूर, स्वामीबाग, राधास्वामी, भारतीय संसद, अमृतसर, सुवर्णमंदिर, जम्मू, श्रीनगर, पहेलगाम, अमरनाथ, मार्तण्ड, अच्छाबल, कोकरनाग, अनंतनाग, चष्मेशाही, निशातबाग, चारचिनार तळे, बहिनाला बोगदा इ.

(८) २ जाने. ते १९ जाने. १९८१ – गंगासागर, जगन्नाथपुरी, तिरुपती, सलारजंग संग्रहालय, श्रीशैल्यम, कोणार्क मंदिर, बेलूर मठ, दक्षिणेश्वर मंदिर, कालीमाता मंदिर.

(९) २ एप्रिल ते ११ एप्रिल १९८१– दार्जीलिंग, माऊंटेनेरिंग स्कूल, चहाचे मळे, बुद्धमठ, गंगटोक, (सिक्कीम).

(१०) १२ ऑ. ते १८ ऑ. १९८२ – पाँडीचेरी, अरविंद आश्रम.

वरील ३ वर्षांतील यात्रांची सांगता २१–२–८२ रोजी गंगापूजन समारंभाने करण्यात आली. या यात्रांच्या निमित्ताने भारतातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा पुष्कळच परिचय झाला. गिरनारपर्वत चढताना गोरखनाथ देवळात संघ स्वयंसेवकांची ओळख झाली. तर केदारनाथ, बद्रिनारायण येथे संघ परिचित व स्वयंसेवक यांच्या भेटी झाल्या. संघकार्य हिंदु समाजासाठी उभे आहे, वाटचाल करीत आहे याची लांबदूर कानाकोपऱ्यात जाणीव पोचल्याचा अनुभव आहे.

नऊही यात्रांच्या शेवटी गंगापूजनाचा मोठा कार्यक्रम योजून त्या निमित्ताने पुणे संघातील सुमारे २०० पर्यंत, संघचालक, कार्यकर्ते यांना आमंत्रण दिले होते व सर्वांनी अगत्याने येवून तीर्थप्रसाद घेतला होता. २१ फेब्रुवारी १९८२ या दिवशी गंगापूजन झाले. संघाचे कार्य करता करता यात्रा करण्याची मनःस्थिती कशी समजून घ्यावी ? पण घरची साप्ताहिक बैठक व एका शाखेवर पालक म्हणून जाणे हे कार्य मला विशेष गुंतविणारे नव्हते. त्यामुळे कौटुंबिक जीवनाचा विचार करता करता माझ्या–आमच्या तीनही मुलांचे विवाह (ज्योत्स्ना, २९–७–६७, रविन्द्र १६–११–६९ व पौर्णिमा २१–११–७१)

होऊन त्यांचे संसार चांगले सुरू झाले ते पाहूनच १९७८ ते १९८१ या तीन वर्षांत आम्ही सर्व यात्रा केल्या.

संघाचे कार्य ज्या क्षेत्रांत व जसे मी करू शकलो, त्या क्षेत्रात सरस कार्यकर्ते काम करीत आहेत हेही मी समाधानाने पाहात पाहात, संघाचा अतूट संबंध संभाळीत आहे.

मी ज्यांच्याबरोबर काम सुरू केले. ते मा. काशिनाथपंत लिमये, मा. भाऊसाहेब देशमुख, भाऊराव अभ्यंकर, मा. विनायकराव आपटे, पुढे ५ वर्षांनी मा. बाबाराव भिडे आज आपल्यात नाहीत ही गोष्ट मला खेदाची वाटते.

मी काम करून थकलेलो नाही पण ऐन उमेदीने नवीन काही करावे हे मला शोभणार नाही. संघकार्याचा दीर्घ अनुभव व त्याची प्रेरणा एक टक्काही कमी पडलेली नाही याचे समाधान माझ्या मनात सतत आहे.

भारतीय योगविद्येचा शास्त्रीय अभ्यास १९३५-३६ पासून सतत केला. पुस्तक लिहिले. संघकार्यात कोठेही कमी न पडता तो व्यासंग व अभ्यास वाढविला. एक नवीन आसन–समकायासन १९७३ मध्ये बसविले.

जनतेमध्ये १५ वर्षांवरील स्त्री-पुरुषांना शारीरिक व मानसिक आरोग्य आणि स्वास्थ्य यासाठी होणारा उपयोग लक्षात घेऊन १३–४–७९ पासून पुणे तरुण भारतमध्ये १२४ लेखांक योग जिज्ञासेचे डिसेंबर ८३ अखेर पुढे मांडून लोकांना योगविद्येकडे वळविण्याचा प्रयत्न सतत चालू आहे.

संघाच्या कार्यातील मौलिक गोष्टींची जवळीक सतत ठेवली आहे. माणसे हवी आहेत. तशी प्रामाणिक व परिश्रमी माणसे निर्माण करता येण्याचे संघ-शाखा हे साधन अन्य अनेक साधनापेक्षा अत्यंत श्रेष्ठ आहे याची मला सतत जाणीव आहे.

पू. डॉक्टर हेडगेवार यांनी संघाच्या कार्याच्या प्रचारासाठी संघशाखेचे १ तासाचे शारीरिक, बौद्धिक, लष्करी (समता), कार्यक्रम सुचविले. संघाच्या त्या एका शाखेत राष्ट्र जीवनाप्रमाणे घेता येणारी अनुभूती, यासारख्या गोष्टींचा मी आत्मीयतेने विचार करू शकलो. कार्यात त्याचा अनुभव घेतला आहे.

माझ्या मनावर वेगळे परिणाम व्हावेत असे जेवढे नकळत वा कळून-सवरून ज्यांनी जे प्रयत्न केले त्याची पुसटही जाणीव मला नाही. मी संघ-

कार्यासाठी अखेरपर्यंत करावयाच्या कर्तव्याची जाणीव ठेवून माझे दैनंदिन जीवन खर्च करीत आहे.

पन्नास वर्षांत भारतवर्षाचा–हिंदूराष्ट्राचा–जयजयकार होईल अशी स्वप्ने मी पाहात आलो आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू जीवनाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे ३०० वर्षांपूर्वी जे प्रयत्न केले, त्याचीच आठवण सतत ५० वर्षे जागी ठेवण्यास संघाचे फारच मोठे साहाय्य मला झालेले आहे.

हे कार्य हिंदू जीवनावरच आधारलेले असल्याने हे वाढत जाणार, यशस्वी होणार अर्थात कठोर प्रामाणिक परिश्रम करणारे मजसारखे वा मजहून अधिक तेजस्वी तरुण मात्र सतत पुढे गेले पाहिजेत हीच गरज आहे.

आम्हासारख्यांचा आधार घेऊन आम्हाला जमिनीत पायाखाली ठेवून भिंत चढविणारे हवे आहेत, ते मिळतील याचा विश्वास ५० वर्षांच्या जागरूक संबंधानंतर व्यक्त करण्याची पूजनीय सरसंघचालकांची परवानगी घेऊन हे निवेदन संपवितो.

संघ स्वयंसेवकांची कार्यशक्ती

सामाजिक कार्यकर्ते वर्षानुवर्षे काम करतात व परिस्थितीबद्दल–शासना-बद्दल तक्रारच करतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कोणीही तक्रारी सांगणार नाहीत किंवा कोणाला दोष देत बसणार नाहीत. समोर घेतलेले कार्य सर्व प्रकारचे प्रयत्न करून यशस्वी रितीने घडवून आणावयाचे हाच बाणा आहे. आणि तोच बाणा सर्व घडवितो.

अरण्येश्वर येथील १९३६ चे पहिले २५० तरुण संघाचे शिबिर अन् नंतर तळजाई येथील १३–१४–१५ जानेवारी १९८३ मध्ये झालेले पश्चिम महाराष्ट्राचे प्रांतिक शिबिर हे संघाच्या वाढलेल्या कार्यशक्तीचे प्रतीक आहे. एक अस्पर्शित डोंगर घेतला. त्यावर आखणी केली. प्रक्रिया केल्या अन् पस्तीस वा अधिक हजार स्वयंसेवकांचे ३ दिवसांचे शिबिर व्हावे अशी योजना केली. या कामाला हजारोंचे हात, शेकडो मंडळींची बुद्धी, हजारोंचे सहकार्य लाभले अन् अभूतपूर्व असे शिबिर समतेच्या ठोस कार्यक्रमाद्वारे पार पडले. दोन हजार संघबंधूंचा घोष, पस्तीस हजार स्वयंसेवक मंडळींच्या पथ-संचलनाला सहाय्यभूत झाला. शिबिरांतील विविध स्थाने व्यासपीठ, ध्वजस्तंभ,

सरसंघचालक निवास, पाणी व्यवस्था, सर्व पाक व्यवस्था ह्या सर्व गोष्टी वाढलेल्या संघ-कार्यशक्तीच्याच द्योतक आहेत.

राष्ट्रकार्यासाठी याहीपेक्षा अधिक शक्ती हवी आहे. ती मिळविण्याची उमेद या कार्यक्रमातून मिळत जाईल हाच विश्वास आहे. तळजाई शिबिरा अगोदर १३ हजारांचे अरण्येश्वर शिबिर व १० हजारांचे चिंचवडचे शिबिर यांचा विसर कोणालाही पडू नये. तळजाई शिबिराच्या यशस्वीतेत वासुदेवराव भिडे (बाबांचे पुतणे), कै. ताल्या बापट यांची नावे प्रथम घेऊन नंतर सर्वांची घ्यावी लागतील.

दुसरा कार्यक्रम

विश्व हिंदू परिषदेने धर्म जोपासना व सर्व पंथोपंथांचा समताभाव श्रेष्ठ हिंदू धर्माला लाभावा या दृष्टीने ५०८५ या युधिष्ठीर युगाब्दामध्ये बुधवार १६ नोव्हेंबर ८३ (कार्तिक शु॥ ११) ते शुक्रवार १६ डिसेंबर ८३ (मार्गशीर्ष शु॥ ११ दत्तजयंती) अशा संपूर्ण महिन्याचा एकात्मता यज्ञ व रथयात्रा हा भारतव्यापी कार्यक्रम योजला. सुमारे ३ ते ४ महिन्यात तीन प्रमुख यात्रा (उत्तर दक्षिण २) हरद्वार ते रामेश्वर, काठमांडू ते कन्याकुमारी आणि (पूर्व–पश्चिम) गंगासागर ते सोमनाथ यांची योजना ठरविली. तयारी केली. या तिन्ही यात्रांना देशाच्या सर्व भागातून उपयात्रा मिळण्याची योजना केली.

कागदावर हाताने लिहून, प्रत्यक्ष छापून, सुंदर रंगीत छपाई करून हिंदू-बांधवांच्या हातात सर्व योजना दिली. देशभरातील संघाच्या अनेक स्वयं-सेवकांनी, या यात्रेमध्ये सक्त व शिस्तबद्ध रितीने भाग घेतला. गोंधळ, गडबड, उपद्रव, दिरंगाई, गबाळेपणा, आंधळेपणा या सर्व तथाकथित धार्मिक भूमिके-मध्ये आमूलाग्र परिवर्तन केले. लोकांच्या श्रद्धेला योग्य ते कार्यार्थी वळण देऊन श्रद्धा वाढविली. हजारों ठिकाणचे कार्यक्रम पूर्ण नियंत्रण ठेवून कसल्याही सबबीखाली यात्रेचा घोटाळा होऊ न देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हिंदूंची धार्मिक व अध्यात्मिक उन्नति साधण्यासाठी आधुनिकपद्धतीच्या जीवनाचे संपूर्ण साहाय्य घेऊन हा एकात्मता यज्ञ पार पडला. हा कार्यशक्तीच्या जोपासनेचाच उपक्रम म्हटला पाहिजे.

संपूर्ण भारतीय जनतेला नव्यायुगातील धार्मिक एकात्मतेचे दर्शन घडविले. माझ्या संघसंबंधाच्या ५० व्या वर्षी या एकात्मतायात्रेचे दर्शन अत्यंत समाधान देणारे असेच ठरले आहे.

या कामी कसल्याही सरकारी मदतीची अपेक्षा न ठेवता हा कार्यक्रम संपन्न करण्यात आला याबद्दल कोट्यावधी हिंदूधर्मीयांना सार्थ-अभिमान वाटावा व अधिक मोठ्या जबाबदारीसाठी तयारी करावी, हेच अपेक्षित आहे. अर्थात् तथाकथित सत्ताधारी मंडळींचा शाब्दिक विरोध दुर्लक्षिण्यात आला. पण देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी कर्तव्यबुद्धीने या यात्रेचे रक्षण करून आपले कर्तव्य बजावले.

तळजाई शिबिर, एकात्मतायज्ञ व गंगामाता रथयात्रा या दोन्ही घटना माझ्या संबंधाच्या ५० व्या वर्षांत घडताना पाहून नवीन मन्वन्तराची सूचक भूमिका लक्षात घेता येते. हे मात्र खरे !

शेवटी

काही संघबंधूंच्या प्रेमळ आग्रहाने व मित्रांच्या हार्दिक विनंतीमुळे मी हे माझ्या भोवतालचे संघजग वर्णन केले आहे. यामध्ये 'मी' असलो तरी 'मीपणा'चा अंशही नाही. माझी योग्यता व स्थान दहा हजार संघबंधूंत पूर्ण गणवेष घालून उभे राहाण्याची आहे हे मी विसरणार नाही.

पुण्याच्या पहिल्या शाखेत मी गेलो. पण आज पुणे शहर त्यावेळेपेक्षा खूपच वाढले आहे. भोवतालच्या लहान खेड्यांचा भाग पुणे कार्पोरेशन हद्दीत समाविष्ट झाला आहे. ह्या मोठ्या झालेल्या पुण्यात सध्या ५६ प्रभात शाखा, १२६ सायंशाखा, १२ प्रदोष शाखा व १२ रात्रशाखा – एकूण २०६ शाखा चालू आहेत. कार्याचे दृष्टीने एकूण १२ नगरे केली असून, प्रत्येक नगरात वेगवेगळे कार्यकर्ते व संघबंधू काम करीत आहेत. जनसंपर्कांतील वाढ समोर ठेवून २३ साप्ताहिक बैठकी चालू आहेत. मोतीबाग या मध्यवर्ती कार्यालया-शिवाय निरनिराळ्या ठिकाणी कार्यालये आहेत. मी डिसेंबर १९८३ मधील सामान्यस्थिती सांगत आहे. १९८४ मध्ये वरील सर्व बाबतीत प्रगतीच होणार. असा हा संघकार्याचा वाढलेला व्याप शहराच्या मानाने कमीच आहे व अधिकाधिक कुवतीचे व गुणी संघबंधू हवेच आहेत. सामाजिक परिस्थितीमध्ये

आवश्यक व कल्याणकारी बदल व्हावा यासाठी पुढची पावले चालूच राहाणार व मला अधिक समृद्ध असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वरूप पाहावयास मिळेल याबद्दल कसलीही शंका माझे मनात नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य परमेश्वरी कार्य आहे व त्यासाठी सर्व स्तरांवरील सज्जन समाजघटकांचा हातभार लागलेलाच आहे, लागणार आहे. अशीच कार्याची स्थिती समोर आहे. पूर्वी असे होते असे म्हणणारी मंडळी आहेत पण आज सर्वच काही वाढले आहे. तेव्हा आपला संबंध नीट टिकवून कार्यात रस घेणाऱ्यांना काहीच कमी दिसणार नाही अशी माझी धारणा आहे. पुण्याच्या आजच्या संघबंधूंत सर्व पोटजाती व सुमारे छत्तीस झोपडपट्टीतील घटक कार्यात आहेत ही परमेश्वराची कृपाच आहे.

१९८२–८३ या काळात मला अत्यंत उत्साह वाटणाऱ्या दोन घटना सांगतो व तसेच काही घडत जावे अशी परमेश्वराची प्रार्थना करतो. परममित्र सुरेश केतकर याजला अखिल भारतीय शारीरिक शिक्षण प्रमुखाच्या जागेवर काम करण्यास सांगितले आहे. परममित्र हरि विनायक ऊर्फ बापूराव दात्ये यांनी संघाच्या घोष विभागात जे कार्य केले त्याचा गौरव भारत सरकारच्या घोष विभागाने केलेली (शिवराजा) ही एक घोष-रचना स्वीकारून केला. या दोन घटना माझ्या मनाला अत्यंत समाधान देणाऱ्या आहेत.

संघाची ही वाटचाल अशीच चालू राहावी व भारत देशातील सर्व स्तरावर भारताच्या प्रगतीसाठी अत्यंत उच्चस्थानी निष्ठावान व कर्तृत्ववान प्रामाणिक संघबंधूंना स्थान मिळावे अशी परमेश्वराची प्रार्थना करून संपवितो.

माझ्या चर्चा

संघाचे कार्य करू लागल्यानंतर ५० वर्षात अनेक मतांच्या, पक्षांच्या, संघटणांच्या प्रमुखांशी, कार्यकर्त्यांशी माझ्या चर्चा वेळोवेळी झाल्या. त्यामध्ये संघाच्या दैनंदिन कार्यातून माणसात होणाऱ्या बदलांची कल्पना साधारण कोणी लक्षात घेऊ न शकलेले भेटत—भेटले. संघकार्याची वैशिष्ट्ये समजणे हे प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कठीण जाते असेही लक्षात आले.

(१) १९३९ सालात संघकार्यकर्ते सोलपुरातील एका वेदपाठशाळेत मला घेऊन गेले. वेदपाठशाळेचे चालक मध्यमवयीन गृहस्थ होते. परिचय झाला व चालकांनी सांगितले, 'देवकुळे, तुमच्या या संघाचे धोरण, ध्येय वगैरे सर्व आम्हाला पसंत आहे. पण या तुमच्या कार्यामुळे जातीजातींचा गोंधळ होईल असे वाटते. धर्माची बाजू संभाळताना त्याचा त्रास होईल.' मी म्हटले की, 'आपण संघस्थानावर गेला आहात का?' उत्तर 'नाही गेलो—पण विद्यार्थी गेले आहेत. आम्हाला तुमचे काम १४ आणे पसंत आहे.' मी म्हटले, 'मग हरकत नाही. आपण १४ आण्यात संघशाखेवर जाऊ लागण्यास हरकत नाही. तुम्हाला एकंदर व्यवहार, पद्धत समजली तर तुम्हीच निर्णय करा.' चालकांनी माझे म्हणणे मान्य केले.

(२) पुण्यातील नाना पेठेतील एक पालक अत्यंत सज्जन व परोपकारी-मुलगा संघशाखेत येऊ लागला होता. त्याबद्दल समाधान व्यक्त करून म्हणाले, 'पण वसंतराव, माझा मुलगा बिघडणार तर नाही ना?' उदाहरणे सांगून म्हटले, 'शेवटी तो तुमचा मुलगाच आहे. बिघडत आहे अशी शंका जरी आली तरी मला बोलवा—पुन्हा आपण बोलू.' आज ते नाहीत पण त्यांचा मुलगा उत्तम प्रकारचे संघीय जीवन घालवीत आहे. वडलांचे मागे कुटुंब उत्तम चालवीत आहे.

(३) राष्ट्रसेवादलाचे एक सैनिक पुण्यामध्ये दलाची शाखा चालविलेले. पुणे ते मुंबई गाडीत भेटले. माझ्या जागेजवळच एक जागा मोकळी असल्याने बसले. मीही थोडे सरकून त्यांना जागा दिल्याप्रमाणे केले. मला ते ओळखत होते, ते संघाचा म्हणूनच ! त्यांनी अगदी अदबीनेच म्हटले, ' काहो देवकुळे, संघाच्या शाखा कशा नीट चालतात ? आम्हाला ते काही नीट जमत नाही अजून ? ' मी मनापासून म्हटले की, ' खरे म्हणजे दलाच्या शाखा चांगल्याच चालल्या पाहिजेत. भारतातील सर्व तरुण गुंतविले जातील इतक्या दलाच्या, संघांच्या, व्यायाम-शाळेच्या शाखा–स्वसंरक्षण कला शिकण्याच्या–अशा शाखा चालल्या पाहिजेत. कोणाही तरुणांना टंगळमंगळ करण्यास वेळच मिळता उपयोगी नाही ! ' दल-कार्यकर्ते म्हणाले, ' खरे आहे पण ते कसे व्हावे ? तुम्ही हिंदु म्हणता, मुसलमानांच्या विरुद्ध सांगता, त्यामुळे तुमच्या शाखा चालतात; पण आम्हाला काय बोलावे कळत नाही. ' मी म्हटले, ' तुम्ही संघाच्या शाखेवर २–४ दिवस जाच. मुसलमानाविरुद्ध बोलण्याचा प्रसंग येतच नाही. पण ज्या निश्चयाने शाखा भरविली जाते व जो निश्चयी स्वयंसेवक तेथे येतो, तो आपला निश्चय इतरांना सांगतो. हिंदुसमाजाची सर्व प्रकारची सिद्धता ही शाखेची बिरुदावली आहे. मला वाटते राष्ट्रसेवादलाने थोड्या निश्चयी बाण्याने कार्य करणे जरूर आहे. ' दलकार्यकर्ते म्हणाले, ' खरे आहे. पण दलाच्या शाखा रोज चालल्या पाहिजेत असे अम्हाला सांगणारे एकाद-दुसरेच ! संघाच्या शाखामुळे आपले दल मागे पडते हे मात्र वारंवार म्हटले जाते. ' मी ' बरं का × × × राव, हे म्हणणे बरोबर नाही. कारण संघाची भूमिका अत्यंत सरळ आहे. परिस्थितीचा विचार करून समाजवादी तरुणांचे ध्येयनिष्ठ परिवर्तन केले पाहिजे. ते तुम्ही पाहा. ' त्या कार्यकर्त्यांची पुन्हा भेट झाली. २ वर्षांनी ते एका संघशाखेतच येऊ लागले व प्रगतिपर कार्य करू लागले.

(४) साम्यवादी विचारांचे एक कार्यकर्ते मुद्दाम भेटण्यास आले. परिचय करून घेतल्यावर ते म्हणाले, ' देवकुळे, तुम्ही संघाचे काम करीत आहात व हा संघ नागपूरचा आहे. हे तुमचे संबंध कसे टिकणार ? ' मी म्हटले, ' आमच्या पद्धतीने ते टिकणार ! ' त्यांनी विचारले, ' तुमची पद्धत ? ' मी म्हटले, ' होय. संघ ही भारतव्यापी हिंदुसंघटना आहे. समग्र हिंदुसमाज सर्व पोटजातींसह– हे आमचे कार्यक्षेत्र आहे. मात्र नागपूर आमचे केंद्रस्थान. जे भारताची काळजी

घेते. आम्ही त्यांना जमेल ते साहाय्य करतो. ही आमची संबंध टिकविण्याची भूमिका आहे.' त्यांनी म्हटले, 'देवकुळे, तुम्ही म्हणता पण व्यवहारात हे फार कठीण आहे.' मी विचारले, 'तुमचे म्हणणे काय आहे?' ते म्हणाले, 'आम्ही साम्यवादी–जगातला कामगार तेवढा एक या भूमिकेवरून आम्हाला सर्वत्र एकत्र विचार करता येतो. अठरापगड हिंदू पोटजाती, वेगवेगळ्या भाषा, देवांचे भेद यातून तुमचे कसे काय पाऊल पुढे पडणार?' मी सांगितले की, 'आम्ही त्याचा विचार नंतरच करू. आम्हाला आमचा धर्म, संस्कृती, आमचे लोक यांची सर्वार्थाने काळजी करावी–त्याला आम्ही लायक व्हावे असे वाटते. आमच्या या कामामुळे जे काही आम्ही हिंदूंकरिता म्हणून करतो, त्यातूनच आमचे पाऊल पुढे पडते. शिवाय जो जो आम्ही हिंदू-जीवनाचा मागोवा घेत मागे जातो. तो तो आम्हाला आपल्या समाजातील चांगल्या गोष्टींचा बोधच होत जातो. आजच्या काळात परस्परसंबंध, स्वतःचे रक्षण करण्याची तयारी, शिस्तीची आवड, गावोगावी, प्रांतोप्रांती एकाच विचाराने प्रवृत्त होऊन काम करणे ही आमची पद्धत आहे. पुन्हा ते कार्यकर्ते भेटले तर नमस्कार करतात.' मी विचारले, 'काय कसे काम चालले आहे?' तर उत्तर दिले, 'मी सर्व सोडून दिले आहे–घरी स्वस्थ आहे' म्हणाले!

(५) स्वतःला पुरोगामी समजणारे व संघाला प्रतिगामी समजणारे एक मुंबईकर मित्र सहज भेटले. अगदी बंधुवत, जवळच असलेल्या त्यांच्या घरी घेऊन गेले. खाण्यापिण्याच्या योजना करून म्हणाले, 'काय वसंता, कसा काय चाललाय तुझा संघ? मुंबईत, पुण्यात अन शहरातच चालणारा हा तुमचा संघ जास्त प्रगती करू शकणार नाही. थोडा तरी आधुनिक पेहराव संघाने घेतला पाहिजे.' त्याची सरबत्ती संपल्याचे ध्यानात आल्यावर मी म्हटले, 'तू मुंबईत बसूनच माझ्याशी हे बोलतो आहेत. अरे, संघाचे ध्येयच मुळी असे समोर ठेवले आहे की त्याला देशातल्या शेवटच्या हिंदूपर्यंत पोचावयाचे आहे. ती गोष्ट ४-२ वर्षांची नाही. त्यामुळे आज ४५ वर्षे होऊन गेली तरी कार्य कोठेही थांबलेले नाही. केलेल्या, झालेल्या कार्याचा आढावा घेऊन पुढचा टप्पा गाठावा लागतो! तो म्हणाला, 'अरे, पण आधुनिक प्रगतिपर विज्ञानाचे वावडे असल्याप्रमाणे तुम्ही जगाबरोबर कसे जाणार?' मी म्हटले, 'मित्रा, प्रत्येक प्रगतीचा इतिहास एक स्वतंत्र गोष्ट आहे. या देशाच्या हिंदुसंघटनेचा, हिंदु-

हिताचा, हिंदुसामर्थ्याचा कार्यक्रम म्हणजे देशाचे सामर्थ्य आहे. ही गोष्ट सर्व क्षेत्रात प्रविष्ट असलेले स्वयंसेवक जाणतात. म्हणूनच स्वयंसेवक-जीवन हे समजावून घ्यावे असे ते जीवन घडले आहे. अरे, या संघाच्या कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या लष्करी कवायतीचा, संचलनाचा तू विचार केला आहेस ? नसशीलच – कारण तू ठरविले आहेस की स्वतःला पुरोगामी समजून संघाच्या धर्मप्रवृत्तीला प्रतिगामी म्हणावयाचे. अरे, हिंदुसंघटनेच्या कार्यशक्तीला शिस्तीची अत्यंत गरज होती. म्हणूनच पू. डॉक्टर हेडगेवार यांनी ब्रिटिश लष्करी शिक्षणाचा जशाचा तसा स्वीकार संघकार्यक्रमात केला आहे व कोणाच्याही कल्पनेत ते आजपर्यंत आले नाही. संघाइतकी पुरोगामी कार्यशैली कोणीच स्वीकारली नाही असे माझे मत आहे.' आमचा पुरोगामी मित्र निरुत्तर झाला. मग आम्ही प्रकृतीच्या गोष्टी बोललो. खाणेपिणे केले व मी त्याचा निरोप घेतला.

(६) एका संघस्वयंसेवकाचे घरी बसलो होतो. तेवढ्यात एक शिक्षक व्यवसायातले गृहस्थ त्याला भेटण्यासाठी आले. येताच माझी ओळख करून घेतली व स्फूर्ती आल्याप्रमाणे म्हणाले, 'अहो देवकुळे, संघाबद्दल मला बोलावयाचे होते; पण ४–५ महिन्यात तशी संधी मिळाली नाही—मी बोलू का ?' मी म्हटले, 'अवश्य बोला'.... ते म्हणाले, 'देवकुळे, तुमच्यापैकी किती लोकांनी कार्ल मार्क्स किंवा लेनिनचे वाङ्मय वाचले आहे ?' मी उत्तर दिले, 'ते मला सांगता येणार नाही; पण मी मात्र वाचलेले नाही !' ते म्हणाले, 'बघा, देवकुळे, यामुळे तुम्ही मागे पडला आहात !' मी म्हटले, 'कशाकरिता वाचावयाचे ? कार्ल मार्क्स किंवा लेनिन यांनी स्वतःच्या देशातील स्थिती सुधारण्यासाठी केलेली चर्चा वाचून आपण काय करणार ?' ते म्हणाले, 'वाहवा देवकुळे, कमाल केलीत.' अहो रशियाने केवढी क्रांती आपल्या देशात केली, त्यापासून आपण बोध नको का घ्यायला ?' मी म्हटले, 'अहो, बोध घेतला पण तोच मार्ग आपल्याला उपयोगी पडेल अशी स्थिती आपल्याकडे आहे का ? आपण आपली स्थिती सुधारावी व जगाच्या चढाओढीत मागे पडू नये म्हणून तर आम्ही या आपल्या देशात हव्या असलेल्या संघटित शक्तींची जोपासना करीत आहो. आम्ही स्वीकारलेल्या मार्गाने आम्ही थोडे हळूहळू पुढे जात आहो; पण आमचा अनुभव मात्र असा आहे की, भारताला हवी आहे तशी प्रेरणा व शक्ती प्राप्त करून पुढे पुढे जाणारे हिंदुबांधव प्रगतीपर वाटचाल

करीत आहेत.' ते म्हणाले, 'नाही, देवकुळे तुमचे चुकते आहे—जगातील कितीतरी देशात या विचारसरणीचा उदो उदो चालला आहे—आपल्यालाही त्याचा उपयोग आहे असे मला नम्रपणे म्हणता येते.' मी म्हटले, 'ठीक, १९१७ मध्ये ती क्रांती झाली. भारतात १९२५ पासून त्या विचारसरणीने भारून गेलेल्या लोकांनी भारतात काम सुरू केले पण आज काय स्थिती आहे? ते तत्वज्ञान भारतात रुजले व उपयुक्त झाले का याची पाहणी करा. अन मग आग्रह धरा.' ते म्हणाले, 'रशियन जीवन किती समृद्ध व बलशाली झाले आहे! आपण तसे नाही का होणार?' मी म्हटले, 'रशियन तत्त्व-ज्ञानाच्या स्वीकारामुळे आपण रशियाच्या हुकमतीखाली जाऊ व पुन्हा १८१८ चीच पाळी येईल. आज लोकवाङ्मय गृहातून रशियन तत्त्वज्ञान व रशियाची प्रगती सांगता येते. भारतात मात्र त्याचा काहीही उपयोग झाल्याची नोंद २० व्या शतकात तरी कोठेही नाही. असेल तर सांगा—उलट १९५० नंतर ते तत्त्वज्ञान उतरणीवरच भारतात शिल्लक आहे.' ही वस्तुस्थिती ऐकून त्यांना बंगालची आठवण झाली व त्यांनी ते उदाहरण समोर मांडले. 'ठीक आहे.' मी म्हटले, 'पण त्या तत्त्वज्ञानामुळे बंगाल राज्यातील प्रत्यक्ष स्थिती काय आहे ते सांगा' — हरकत नाही. अन्य राज्ये अन बंगाल यांच्यात काय फरक आहे? भारतात अन्यत्र त्या तत्त्वज्ञानाचा लोपच झाला आहे?' 'पुन्हा भेटू' असे म्हणून ते शिक्षकमित्र निघून गेले. संघबंधू म्हणाले की, 'हे माझे साम्यवादी मित्र नेहमी याच भूमिकेवर असतात; पण वस्तुस्थिती सांगणारा भेटला की त्यांना काही सुचत नाही. तसे आत्ता झाले!'

(७) एकदा संघाच्या शिस्तीची प्रशंसा करणारे पण गणवेष घालण्या-वरून दिखाऊपणाबद्दल टीका करणारे एक सन्मित्र भेटले. त्यांच्या टीकेनुसार मीच विचारले, 'अहो, शिस्तीसाठी सर्वांचा एक गणवेष कसा बाधक आहे? प्रत्येक माणसाच्या अंगात शिस्त बाणण्यासाठी संचलन करावे लागते. ते संचलन उत्तम होण्यासाठी गणवेश तितकाच जरुरीचाच असतो. संघातील "समता" या विषयाचे शिक्षण तर शिस्तीसाठीच आहे हे समजावून घ्या.' लष्करी शिस्त व गणवेष यांचा संबंध माहीत नसल्यानेच ही टीका झाली हे त्यांच्याही लक्षात आले.

(८) संघाचे स्वयंसेवक नुसते संघस्थानावर तेवढे येतात, बाकी काही करीत नाहीत असे १९६० पर्यंत म्हटले जाई. मी सांगत असे की पारिजातकाच्या झाडावरचे फूल तयार झाले की खाली पडते व ते देवाला वाहता येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर स्वयंसेवक शिक्षण घेऊन तयार झाला की पारिजातकाच्या फुलाप्रमाणेच तो समाज व देश यांच्यासाठी आपले जीवन खर्च करू लागतो. त्याला वेगळे सांगावे लागत नाही; पण तो तयार होण्याचे आधी त्याच्यापासून अपेक्षा ठेवणे योग्य होणार नाही.

(९) संघात हुकूमशाही आहे, त्यामुळे तो भारताची लोकशाही नाहीशी करील अशी एका काँग्रेशी मित्राची कल्पना! एकदा भेटल्यानंतर तोच विषय निघाला. तेव्हा मी सांगितले की, संघ राष्ट्रीय पाठशाळा आहे. संघाला कोठे राजकारणात भाग घेऊन संघटना कार्यास खीळ घालावयाची नाही. संघ चालण्यासाठी एक चालकानुवर्तीत्व ह्या पद्धतीने मतभेद किंवा दोन स्वयंसेवकातील भांडणाचे मूळ नाहीसे करून कोणाच्या तरी एकाच्या निर्णयाने दोघांनी वागावे. तो एक निर्णय देणारे चालक म्हणजे संघचालक! हुकूमशाहीचा अर्थ संघाच्या पद्धतीत कोठेच येत नाही. आजपर्यंत संघ एकसंध व मतभेदाशिवाय प्रगती करीत आहे ते एक चालकानुवर्तीत्व या पद्धतीमुळेच. आणि हा एक-चालक स्वयंसेवकांच्या पसंतीतूनच पुढे येत जातो. शिवाय त्या त्या व्यक्तीची वागणूक सर्वांना पसंत पडलेली असते.

(१०) एकदा कॉलेज विद्यार्थ्यांच्या एका बैठकीत माझ्या उपस्थितीत एका विद्यार्थ्याने विचारले की, 'संघात भगव्या ध्वजाला गुरू मानतात याचा अर्थ काय?' मी म्हणालो, 'संघाच्या प्रत्येक कार्यक्रमात रोजच्या शाखेत प्रथम ध्वज उभारला जातो. त्याला सरसंघचालक या उच्चपदस्थ अधिकाऱ्या-कडूनही प्रणाम दिला जातो. अन् सर्व लहानमोठे स्वयंसेवकही प्रणाम करतात. दुसरी गोष्ट, दरवर्षी गुरुदक्षिणा ही भगवा ध्वज या गुरुसमोर प्रणामपूर्वक अर्पण केली जाते. असा भगवा ध्वज या गुरुचा व्यावहारिक अर्थ आहे. कितीही उच्चपदी जाणारी, पोचणारी व्यक्ती केव्हातरी बिघडतेच म्हणून व्यक्तीला गुरुस्थानी न ठेवता भगव्या ध्वजाला संघात गुरू मानलेले आहे व त्याचा आमच्या कार्याला फार चांगला उपयोग होतो.'

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
302
ता. क्र. 2990
दिनांक 3/3/

(११) संघाच्या दैनंदिन चालणाऱ्या शाखेवरील कार्यक्रमाबद्दल एका शंकेला उत्तर देताना संघाच्या शाखेवरील कार्यक्रमात दण्ड, शूल, खड्ग, योगचाप यांचे शिक्षण दिले जाते, ते कशासाठी ? आधुनिक काळात त्याची काय गरज आहे ? उत्तर – संघाच्या संघटनेत दाखल होणारा प्रत्येक हिंदू स्वतःचे, वेळेला इतरांचेही संरक्षण करण्यास उपयोगी पडला पाहिजे. त्यासाठी संरक्षण्यास उपयोगी पडणारी विद्या त्याला अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठीच प्रत्येक स्वयंसेवक शारीरिक शिक्षणाचे सर्व प्रकार शिकू शकला पाहिजे. नेहमीच्या संघशाखेचीच ती महत्त्वाची जबाबदारी आहे. स्वतःचे रक्षण करण्याचा आत्मविश्वास प्रत्येक स्वयंसेवकाला वाटणे हे तर दैनंदिन शाखेचेच काम आहे. रोज तद्नुकूल कार्यक्रम पार पडले पाहिजेत.

(१२) हिंदू महासभा आणि त्या सभेचे कार्यकर्ते महाराष्ट्रात पुष्कळ ठिकाणी भेटत असत. पुण्यातील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी होत. त्यापैकी काहीजण मला आवर्जून म्हणावयाचे, 'देवकुळे, तुम्ही संघाच्या नादी फार लागू नका. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास नागपूरची संत्री पुण्याकडे पिकणार नाहीत हे लक्षात ठेवा.' पुण्यामध्ये संघाच्या १९–२० शाखा चालू झाल्यानंतरही त्यांचे हे म्हणणे मी ऐकून घेतले आहे. त्यांना मी कोणत्यातरी शाखेवर वेळ देऊन बोलावीत असे. तेथे आल्यावर तेच संघाची स्तुती करीत. रा. गो. ऊर्फ बाबूराव भिडे यासारखे काहीजण मात्र संघावर प्रेम करू लागले. संघाच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रामाणिक कार्यपद्धतीचा पोच त्यांना येत नव्हता. संघातील संस्कारक्षम कार्यक्रमांची त्यांना पुरेशी कल्पना समजून घेता येत नव्हती, एवढाच दोष होता.

५० वर्षांत वस्तुस्थितीला धरून पू. डॉक्टर, पू. गुरुजी, दादाराव परमार्थ इत्यादि विचारवंत कार्यकर्त्यांच्या बौद्धिक वर्गातून, चर्चेतून ग्रहण केलेल्या तत्त्वदर्शी व्यवहार वाढण्यासाठीच चर्चेचे अनेक कार्यक्रम मुद्दाम घडवून आणले गेले. त्यातील काही नमुने दिले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य अगदी माझे स्वतःचे आहे अशा भावनेतून संघाचा विचार करीत राहिलो. अधिकार वा एखाद्या पदावर नियुक्ती नसली तरी जबाबदारीच्या बाबतीत मी कधीही दुर्लक्ष केले नाही, त्यामुळे वरील चर्चा घडल्या व मी काम करीत

राहिलो आहे. संघाच्या परमेश्वरी कार्यातील माझी भूमिका स्वच्छ मनाने अशीच राहिली व राहो. कारण अजून कार्य बरेच व्हावयाचे आहे.

पद्ये, गीते, प्रार्थना, बोधपट

पुणे शहरातील कामाला संघकार्याचे बाळसेदार स्वरूप येऊ लागले. काही नव्या शाखा, नवे स्वयंसेवक समोर येत असत. कार्याची सिद्धता चांगली झाली असे वाटते. अशा प्रसंगी शाखा उत्सवापैकी प्रत्येक उत्सवात स्फूर्तीप्रद गीत गावयास मिळावे यासाठी यशवंतराव लोंढे (आता दिवंगत) ऊर्फ कवि यतिश यांना आम्ही परिस्थितीनिदर्शक पद्यरचना करण्यास १९३६ पासून सांगू लागलो. ' नसे कशाची तमा, आम्हाला तीच गुरुपौर्णिमा, ' ' वर्षप्रतिपदा तरीच साजे ' इत्यादी नवीन पद्ये एकेका उत्सवाचे निमित्ताने आम्हाला म्हणण्यास मिळू लागली. कै. नानाराव पालकर यांनी फार सुंदर, अर्थपूर्ण व मार्गदर्शनपर पद्ये केली. भारतवर्षात अनेक शाखांतील कविवर्य संघबंधूंनी काव्ये, पद्ये केली व आम्ही ती गात राहिलो आहोत. या पुस्तकात पू. डॉक्टर व पू. गुरुजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणारी पद्ये श्री. बच्छराज व्यास व श्री. तिवारी या संघ-बंधूंनी केली आहेत. त्याची समर्पकता व सुंदरता अवर्णनीय वाटते !

संघाची संस्कृत प्रार्थना सुद्धा अत्यंत स्फूर्तीदायक ठरलेली आहे.

पूजनीय डॉक्टरांनी अनेक प्रसंगी संघटनेच्या वाटचालीत कुठेही थांबावे लागू नये म्हणून दिलेल्या सूचना बोधपटाच्या रूपाने आम्ही वाचतो. विचार करावयास शिकणे ही प्रत्येक हिंदूंची गरज यामुळे भागली जात आहे. श्री. अनंतराव देवकुळे यांची काही पद्ये अत्यंत रोचक व स्फूर्तीप्रद झालेली आहेत.

संघाची संस्कृत प्रार्थना दररोज प्रत्येक शाखेवर म्हटली जाते. ती शुद्ध, स्पष्ट, संथ गतीची असावी लागते. मी बरीच वर्षे प्रार्थना सांगत असे. पू. गुरुजींना माझी प्रार्थना पसंत पडत होती. अनेक वर्षे पद्येही मी गात होतो.

बोधपट म्हणजे काही स्मरणीय ठोकताळे की जे कार्याची नीट ओळख करून देतात. संघातील बौद्धिक वर्गाची योजना म्हणजे नुसती भाषणे नसतात. प्रत्येक स्वयंसेवकाला विचार करता यावा या दृष्टीने एका बौद्धिक वर्ग प्रसंगी ३ ते ५ दिवसांचे एकाच विषयाची सर्वांगीण मांडणी करणारे वर्ग घेतले

जातात. पू. डॉक्टर, पू. गुरुजी, मान्यवर दादाराव परमार्थ, मा. विनायकराव आपटे हे असे वर्ग घेत असत. प्रश्नोत्तरे हा बौ. वर्गाचा दुसरा भाग आहे. पद्ये म्हणणे, पाठ करणे, सामुदायिक गाणे हे नेहमी चालू असते. प्रार्थना, प्रतिज्ञा, ग्रंथ वाचन हे बौ. वर्गाचे भाग आहेत. प्रत्येक स्वयंसेवक आपले विचार मोकळेपणाने मांडण्यात तयार व्हावा ही बौद्धिक विभागाची सफलता मांडली जाते.

५० वर्षांत परिचित झालेले ज्येष्ठ–श्रेष्ठ दिवंगत माननीय अधिकारी आणि संघबंधू

भारतभूमीमध्ये परमेश्वरी संकेतानुसार संत–महात्मे निर्माण होतात व अनेक स्त्रीपुरुषांना ते जीवन सुसह्य करण्याचा मार्ग सांगतात हे खरे आहे. ते चालू आहे. चालू राहील.

पण परमेश्वरी योजनेनेच सुरू झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परमेश्वरी कार्यात हिंदुसमाजाच्या संघटनेचे – एकात्मतेचे ध्येय सोपे नसले तरी गाठण्याची उमेद व आत्मविश्वास या कार्याचे द्वारे जोपासला जाणार यात शंका वाटत नाही.

१२५–१५० वर्षांच्या इंग्रजी राज्याच्या संपर्कामुळे अन्य राष्ट्रांचेही संबंध आले. सहिष्णू वृत्तीच्या अतिरेकाने इंग्रजांनी धूर्तपणे घडविलेल्या आत्मविस्मृतीमुळे भारताबाहेरचे तत्त्वज्ञान व मार्ग उदा० साम्यवाद, समाजवाद भारताच्या प्रगतीसाठी उपयोगी पडतील असा आशावाद काही विचारवंतांच्या मनात आला. १९१७ मध्ये रशियात झालेल्या क्रांतीचा मोठा मानसिक परिणाम काही विचारवंतांच्या मनावर इतका झाला की ते स्वतःला भारताच्या राष्ट्रवादापेक्षा रशियाच्या साम्यवादानेच प्रभावित झाले व ते तत्त्वज्ञान शिरोधार्य मानून भारतावर ते लादू पाहात होते.

भारताच्या प्राचीन जीवनाचा – हिंदुसमाजाच्या धर्म–संस्कृतींचा प्राचीन काळातील समृद्ध व सर्वंकष पद्धतींचा पूर्ण विसर पडूनच अनेक विचारवंतांनी बाहेरच्या पद्धतींचा विचार केला. केवळ २० व्या शतकातच सुरू झालेले तत्त्वज्ञान केवळ २० व्या शतकातच लुप्त होत असूनसुद्धा केवळ स्वतःच्या अहंमन्य वृत्तीने प्राचीन भारताच्या लोककल्याणकारी जीवनाचा विचार करण्याची क्षमता नसल्याप्रमाणे डोळे झाकून हृदयकपाटे बंद करून त्याच सत्त्वहीन विचार-सरणीला चिकटून राहण्याची अनेकांची खटपट दिसते.

सामान्य जीवनाच्या पकडीत आपण बरे, आपला नोकरीधंदा करा ! कोठेही जाणे नको, येणे नको. सामाजिक संबंध अन राष्ट्रजीवनाचा तर विचारच नको अशा तऱ्हेच्या मनोवृत्तीचा इतका बुजबुजाट झाला आहे की, इंग्रजांनी अन्य प्रकारचे जीवन स्वीकारण्यासंबंधी जी जरब बसविली आहे, ती अजूनही लोकमानसावर घट्ट पकड धरून आहे. एका इंग्रजी नव्हे तर पण सहकार्याने चाललेल्या उद्योगात एक सेलिंग डिस्ट्रिब्यूटिंग एजंट जेव्हा म्हणू लागला, 'अहो, संघाशी संबंध ठेवला तर मला बडतर्फ करतील.' तेव्हा लक्षात आले की, स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी हा राष्ट्रीय कर्तव्यात मागेच राहू इच्छितो. अडचण खरी हीच आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे ३०० वर्षांपूर्वीचे यश हिंदुत्व रक्षणाच्या ठोस विचारातून निर्माण झाले. भारतातील हिंदुजीवनाच्या पाठपुराव्यातून बराच काही लाभ देशाला प्राप्त होतो ही साधी गोष्ट काही विचारवंत लक्षात घेऊ शकत नाहीत, हे त्यांचे दुर्दैव म्हणता येईल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेमुळे हिंदु संघटनेचा–हिंदु समाजातील सर्व प्रकारचे दोष काढून टाकण्यासाठी उपयोग झाला पाहिजे असा आग्रह धरून गेल्या ५० वा अधिक वर्षात जे काही घडले, त्यातून हिंदु जीवनाला तर वळण लागलेच आहे पण भारतातील प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी बलवान हिंदु संघटनेचाच उपयोग होणे शक्य आहे. बाकी केवळ लोकशाही मार्गाने हे होणारे नाही, याचा विचारवंत पडताळा घेऊ शकतील, तर बरे होईल. माझ्या कल्पनेप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची जी प्रगती होऊ शकली त्यामध्ये कसलाही वरकरणी देखावा नाही. कार्य जेवढे आहे, तेवढेच समोर घेता येते. दैनंदिन शाखांच्या चोख व्यवहारातून संस्कार प्राप्त करून घेतलेले तरुण स्वयंसेवक कार्यात पुढे पुढे जात असतात. ज्यांचे जीवन शुद्ध, निर्मळ असेल ते पुढे जात राहातात. अनेक कार्यकर्ते कार्य करता करता स्वर्गवासी झाले. पण त्यांचे चारित्र्य, कार्य याबद्दल कोणालाही अभिमान वाटावा असेच त्यांचे जीवन आहे. मी काही विशेष कर्तृत्वाचा नाही; पण ५० वर्षांत ज्यांचे माझे संबंध आले, त्यांची नावे समोर घेऊन मला परिचित माहिती थोडक्यात देत आहे. मला वा अन्य कोणालाही त्यापासून स्फूर्ती मिळावी असे मला वाटते.

दिवंगत

(ऑक्टोबर १९८३ पर्यंत)

(१) **पू. डॉ. केशव बळिराम हेडगेवार,** एल्. एम्. ॲन्ड एस्. (कलकत्ता)

जन्म १८९० मृत्यू १९४०—

अत्यंत प्रतिभासंपन्न देशभक्तीने भरलेले अंतःकरण. इतिहासाचे परिशीलन करून हिंदू संघटनेचा मार्ग ज्यामुळे हिंदूंमधील सर्व दोष नाहीसे होऊन एकसंध समाजाचे स्वप्न पाहिलेले. त्याचे साधन म्हणून संघाची सर्व दृष्टींनी समृद्ध शाखा. त्यावर शारीरिक, लष्करी, बौद्धिक कार्यक्रमांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा. अंतर्बाह्य एकच विचारसरणी या वागणुकीचा एक आदर्श उभा करू शकले. स्वतःसारखीच मनःस्थिती परिचितांमध्ये उत्पन्न करण्याचा आत्मविश्वास. फक्त १५ वर्षे काम केले पण भारताच्या सर्व प्रांतांत संघ पोचविला.

त्यातल्या त्यात हिंदू संघटनेच्या गुणवृद्धीच्या दृष्टीने पू. डॉक्टरांनी १९२५ साली इंग्लंड देशातील मिलिटरी ट्रेनिंग (लष्करी शिक्षण) इंग्रजी भाषेसह संघाच्या कार्यक्रमात स्वीकारले. कानामात्रेचाही फरक न करता आठवड्यातून एकदा संपूर्ण गणवेषासह (काळे बूट, पट्टीज, पुंगळ्या, खाकी पॅण्ट, खाकी शर्ट, बॅजेस, काळी टोपी, बंदुकीप्रमाणे जाड दंड यांसह नेमबाजी, अनेक लष्करी हालचाली, हिवाळा शिबिरे, त्यामध्ये नाईट मार्च, डेंजर कॉल, गार्ड माउंटिंग, मार्च पास्ट, रिव्ह्यू ऑर्डर मार्च, ड्रेस व टेंट इन्स्पेक्शन व कॉंपिटिशन, लॉंगरूट मार्चेस अशा सर्व हालचाली व कार्यक्रम यांचाही संघशिक्षणात समावेश करण्यात आला. ही गोष्ट पू. डॉक्टरांच्या व संघाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण व सर्वथैव पुरोगामीच आहे. जे ज्ञान आपल्याजवळ नाही ते आवश्यक म्हणून, दुसऱ्याचे – अन्य देश, धर्म वा व्यक्ती यासंबंधी कूपमंडूकता न ठेवता, स्वीकारण्याचा खटाटोप, दूरदृष्टी व समाजोत्थानाची तळमळ दर्शविणारी आहे. हे लष्करी शिक्षण इतक्या आत्मीयतेने स्वीकारल्यामुळे हिंदु समाजातील अनेक

दुर्गुण घालविण्याची संधी संघाला घेता आली. पू. डॉक्टर हेडगेवार यांच्या दूरदृष्टीचा हा पडताळा अन्य सर्वत्र रोजची १ तास शाखा, शारीरिक व बौद्धिक व लष्करी कार्यक्रम गोष्टींतूनच येतो हे हिंदु समाजाचे भाग्य आहे. भगव्या ध्वजाला स्वतः गुरू मानून संघातही तशा भूमिकेचा अंतर्भाव करून गुरुदक्षिणेचा एक दिव्य, पवित्र आचार संघात रूढ केला. माझा पू. डॉक्टरांचा १८-४-१९३५ ते १५-५-१९४० एवढा काळ पू. डॉक्टरांशी प्रत्यक्ष संबंध आला. सर्वच जीवन लोकोत्तर पुरुषांप्रमाणेच !

(२) पू. माधव सदाशिव गोळवलकर म्हणजे पू. गुरुजी

एम्. एस्सी., एल्एल्. बी.

अध्यात्ममार्गी पण पू. डॉक्टरांच्या सहवासाने समग्र जीवन बदलून टाकून संघकार्यार्थच ते व्यतीत करणारा महापुरुष. ३३ वर्षे अखंड संघकार्य पसरवीत, पक्के करीत, भारताच्या अन्य समस्यांसाठी योग्य पृथःकरण करून भारतीय जीवनात सर्वांगीण प्रवेश करण्याचे धोरण संभाळणारा महापुरुष क्रमांक दोन. संघकार्यात प्रचारकी जीवनाला महत्त्वाचे स्थान देणारा, वनवासी-आदिवासी क्षेत्राचा शोध घेऊन त्यातील कार्यास वळण देणारा, संघस्वयंसेवकांना विस्तृत कार्यक्षेत्र देणारा महात्मा ! पू. डॉक्टरांचे जीवन महापुरुषाप्रमाणे मानून नतमस्तक होणारा श्रेष्ठ पुरुष.

(३) श्री. माधव कोंडो मुळ्ये

अत्यंत सामान्य कुटुंब व जीवन यातून संघाचे एकनिष्ठ स्वयंसेवक बनले. पू. डॉक्टरांच्या आज्ञेप्रमाणे पुढे गुरुजींच्या संकेताने पुढे पुढे जाणारा महनीय कार्यकर्ता. शिस्तबद्ध कडक जीवन पण आईच्या मायेने संघबंधूंशी वागणारा ! पंजाब, दिल्ली, उत्तरप्रदेश या राज्यांचा क्षेत्रीय प्रचारक—पुढे सरकार्यवाह. १९७५ च्या आणीबाणीत अत्यंत जबाबदारीची उत्कृष्ट कामगिरी बजावणारा. सरकार्यवाहपदी काम केलेला ! पश्चिम महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील ओझरखोल गावचे रहिवासी. शेवटपर्यंत आईची सेवा करणारे – १९७९ मध्ये स्वर्गवासी झाले. संघाचे धोरण १०० टक्के संभाळणारे कार्यकर्ते. उज्ज्वल चारित्र्याचे महामेरू.

(४) श्री. दादाराव परमार्थ

क्रांतिकारी ज्वलन्त देशभक्त. पू. डॉक्टर हेडगेवार यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकून स्वतःचे जीवन कणाकणाने झिजविणारे—महाराष्ट्र, पंजाब, तामिळनाडू, उत्तरप्रदेश या प्रांतांत संघाचे कार्य रुजविणारे तळमळीचे प्रचारक. मराठी–इंग्रजी–हिंदी भाषांवर प्रभुत्व व ज्वलंत अमोघ वाणीने, संघनिष्ठेने तरुणांची हृदये भारणारे कार्यकर्ते. संघटनेसाठी संघटना हा मंत्र अनेक हृदयांवर कोरलेले प्रचारक. मी त्यांच्यामुळेच संघनिष्ठ झालो.

(५) श्री. एकनाथ रानडे, एम. ए.

शालेय जीवनापासून संघाचे मध्य प्रदेश, दिल्ली या राज्यांतून उत्कृष्ट वळणाने संघाचे काम करीत आलेले. सरकार्यवाहपदी यशस्वीपणे काम केलेले. १९६२ साली संघातून सोपविलेले स्वामी विवेकानंद शिला स्मारकाचे काम सर्वांचे, सर्व पक्षांचे, भारत सरकारचे, राज्याराज्यांचे सहकार्य प्राप्त करून घेऊन एक भव्य-दिव्य स्मारक उभारणारे—पू. गुरुजी व इंदिरा गांधी या दोघांनाही स्मारक-दृश्याने भारून टाकणारा कार्यकर्ता. ३० लक्षांवरून १ कोटी ३० लक्षांचे स्मारक उभारणारा. भारतातील प्रत्येकाचे साहाय्य संघ कार्यकर्ता म्हणून स्वीकारणारा महान् योजक! शिलास्मारकामागोमाग विवेकानंद स्वामींचे कार्य माणसांचे साहाय्याने घडविण्यासाठी जीवनव्रतींची योजना कार्यान्वित करणारा देशभक्त! चारित्र्याच्या उच्च कोटींवर आरूढ–निर्व्यसनी व प्रेमळ अंतःकरणाचा मित्र!

(६) श्री. भैय्याजी वाणी

नागपूरचे रहिवासी. मालगुजार. श्रीमंत घराण्यातील. कॉलेज जीवनापासून संघाचे स्वयंसेवक. पू. डॉक्टरांच्या काळात इंदूर प्रचारक म्हणून अनेक वर्षे काम करणारे. सहकार्यवाहपदी काम केलेले. पहिल्या बंदी काळानंतर फार मोठी भरारी मारून सर्वांना जागरूकपणे कार्य करायला लावलेला महान संघटक! माणसांना ओळखण्याची मार्मिक शैली! पहिल्या बंदीनंतर तरुण, प्रौढांच्या वागण्याकडे पाहून पुन्हा बालापासून कार्य सुरू करण्याची तयारी ठोसपणे मांडणारे कार्यकर्ते!

(७) श्री. बाबासाहेब आपटे

सरकारी नोकरी एकदम सोडून देऊन संघकार्यात संपूर्ण योगदान करणारे, प्रचार प्रमुख म्हणून कार्य केलेले. संघ शाखातील वैचारिक सामर्थ्य वाढावे यासाठी सतत चिंतनशील, कार्यकर्ते. चांगले लेखक व अभ्यासू ! इतिहासातील घटनांचा इष्ट व योग्य अन्वयार्थ लावून दाखविणारे प्रतिभासंपन्न प्रचारक. भारतभर प्रवास केलेले कार्यकर्ते !

(८) श्री. कृष्णराव मोहरीर

पू. डॉक्टरांच्या दर्शनाने संघकार्यात तल्लीन झालेला तरुण. अगदी घरगुती पद्धतीने प्रत्येकाचे स्थान ओळखून वागणारा. पू. डॉक्टरांच्या हस्ताक्षराप्रमाणे अक्षर असलेला, पू. डॉक्टरांच्या जीवनाचा पक्का ठसा स्वतःच्या जीवनावर उतरविणारा. १९२७ पासूनचा कार्यकर्ता. पू. डॉक्टरांच्या इच्छेप्रमाणे बी. ए. एलएल. बी. होण्यात विलक्षण चिकाटीने पास होईपर्यंत अभ्यास करीत राहिलेला. नागपूरचे केंद्र कार्यालय सर्व भारतासाठी केवळ सहृदयतेने संभाळणारा प्रतिभासंपन्न कार्यकर्ता. संघाच्या वास्तूमध्ये भव्यता व दिव्यतेबरोबर पावित्र्याने अखंड देखरेख करणारा ! नागपूरातील अत्यंत घरंदाज श्रीमंत मालगुजार. उद्योगपती, सरकारी, अधिकारी, रेल्वे-पोस्ट, इत्यादी सार्वजनिक ठिकाणी संघाला स्थान उत्पन्न करून देणारा. नागपूरचे रघूजी भोसले, बाबासाहेब घटाटे इत्यादी ऐतिहासिक घराण्यांचा संबंध जीवाभावाने संभाळणारा. भारतातील प्रत्येक कार्यकर्त्यांची बूज राखणारा व त्याला सर्व प्रकारे सुखावह वागणूक देणारा कार्यप्रेरक बंधू !

(९) श्री. पांडुरंगराव क्षीरसागर

संघाच्या एका शाखेतून जबाबदारीने वागत वागत संपूर्ण भारतातील पत्रव्यवहार फार बारकाईने संभाळणारा कार्यालय प्रमुख. १९७५ च्या आणीबाणीत ठाणे तुरुंगात सरकारी बेफिकीरीमुळे मृत्यूमुखी पडलेला कार्यकर्ता.

(१०) पू. आप्पाजी जोशी

वर्धा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ! पू. डॉक्टरांचा संबंध काँग्रेस कार्यातून येता येताच पू. डॉक्टरांचे पक्के अनुयायी झाले व संघाच्या कार्याची प्रतिष्ठापना वर्धा जिल्ह्यातील चारही तालुक्यात द्रुतगतीने करणारे — १९४० साली

खेडेगावात शे. १ व शहर भागात शेकडा ३ पूर्ण गणवेषधारी व प्रतिज्ञित स्वयंसेवकांची संख्या गाठणारे जिल्हा संघचालक. वर्धा जिल्ह्यातील सर्व स्वयंसेवकांचे परमपूज्य स्थान ! १९३४ साली म. गांधींना वर्धा जिल्हा हिवाळा शिबिरात आणून गौरवोद्गार काढावयास लावणारे संघचालक. पू. डॉक्टरांचे जीवन उंचावून त्याची महानता व पवित्रता सर्वांच्या हृदयावर कोरणारी वाणी व भावना !

(११) पंडीत दिनदयाळ उपाध्याय, एम. ए.

उत्तर प्रदेशातील संघबंधू. काही वर्षे उत्तर प्रदेश प्रांतप्रचारक–पू. गुरुजी यांच्या सूचनेवरून पं. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे स्वीय चिटणीस. भारतीय जनसंघाचे कार्यकर्ते. चिटणीस झाले. थोर तत्त्वचिंतक–शुद्ध विचारांच्या साखळीतून म. गांधीप्रमाणे एक मूल्यांकन केले. दिल्लीच्या संघकार्यालयात ३–४ वेळा भेट व चर्चा. अन्यत्र बऱ्याच भेटी. १९५८ साली इंदूरला भेट. दिल्लीमध्ये भयंकर थंडी असताना माझ्या अंगावर एक रजई आणून घातली व म्हणाले, 'हिलना नही, जाडा तेज है !' स्वतः लिहीत बसले होते. त्यांच्या स्मरणार्थ दीनदयाळ शोध संस्थान ह्याची स्थापना होऊन भारताच्या अविकसित भागात विकास घडविण्याचे कार्य हाती घेण्याची पद्धत संचालक नानाजी देशमुख यांनी गोंडा जिल्ह्यात सुरू केली व महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात होऊ घातली आहे. ही संस्था दिल्लीच्या उद्योगपतींनी लाखो रुपये खर्च करून निर्माण केली आहे. जीवन संघमय केले होते. त्यांच्यापासून स्फूर्ती घेण्याची किमया माझ्यापुरती तरी घडलीच आहे. माझे भाग्य थोर म्हणूनच मला त्यांची आठवण करण्याची संधी मिळत आहे.

नागपूर भागातील व देशातील वरील दिवंगत नरश्रेष्ठांचा परिचय करून देता देता, आंबेकर मास्तर, राम पाध्ये, विठ्ठलराव पत्की, तात्या तेलंग, अशा अनेक कार्यकर्त्यांची–ते आज नाहीत–ज्यांनी स्वतःचे जीवनसर्वस्व संघ-कार्यांतच खर्च केले ! त्यांची आठवण प्रत्येक प्रसंगी येते.

पुण्याकडील म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात ज्यांनी संघकार्यात तनमनाने पूर्णत्वाने लक्ष घातले. जे आज नाहीत त्यांचे स्मरण करणे इष्ट आहे.

(१२) मा. काशिनाथ भास्कर लिमये

जुन्या पठडीतील कडक शिस्तीचे शिक्षक. १९३२ पासून पू. डॉक्टरांच्या-कडून प्रतिज्ञा घेऊन कार्यकर्ते झाले. सांगली संघचालक व पाठोपाठ महाराष्ट्र प्रांत संघचालक ह्या जबाबदाऱ्या एकनिष्ठेने संभाळल्या. पू. डॉक्टर व नागपूर संघ यांच्या प्रथम परिचयात आलेले व शेवटपर्यंत कार्यरत राहिलेले. प्रांतसंघ-चालक या नात्याने महाराष्ट्राची संघविषयक जबाबदारी सतत संभाळणारे – स्वयंसेवकांना स्फूर्ती, प्रेरणा देण्यात सतत अग्रेसर. १९६२ साली गोहत्त्या प्रतिबंधक चळवळीत २ कोटी सह्यांचा अर्ज राष्ट्रपतींना देण्यात अग्रभागी होते. घरातील सर्व सण-समारंभ महाराष्ट्र प्रांताचे म्हणून आयोजन करण्यात अग्रेसर महाराष्ट्रातील दुष्काळात अत्यंत मोठ्या जबाबदारीने कार्य घडविले.

(१३) नारायण हरि (नाना) पालकर

पुण्यातील स्वयंसेवक ! मॅट्रिक पास झाल्यानंतर १९३८ मध्ये त्यांची अशक्त व रोगी प्रकृती कशी चांगली होईल असे विचारण्यासाठी स्वतः वडील मला भेटले. मी सांगितले की हवापालट करण्याचे दृष्टीने त्याला खेड, वाडे भागात पाठवितो. त्यानंतर तेथे राहून प्रगतिपर रितीने प्रकृती चांगली झाल्यावर संघजीवनातच रमले. कवी, लेखक ही उपजत कला परिचयांची होत गेली. उत्कृष्ट काव्यरचना – स्वयंसेवक कंठांतून गायली जाऊ लागली. पू. डॉक्टर हेडगेवार यांच्या चरित्र-लेखनाचे कार्य स्वीकारून जेथे जेथे डॉक्टर गेले अशा शेकडो ठिकाणी भेटी देऊन सामग्री गोळा करून चरित्रलेखन कार्य पूर्ण केले.

पू. गुरुजींच्या चरित्रलेखनात हीच काळजी घेतली. 'मंदिरांच्या कथा व व्यथा' 'इस्रायल' – (छळाकडून बळाकडे), असे ग्रंथ लिहिले. स्फुट लेखन, १०० मनाचे श्लोक, अनेक पद्ये यांची रचना करीत गेले. महाराष्ट्रभर महा-विद्यालयांचे काम, महाराष्ट्र प्रांत बौद्धिक कार्यवाह अशी कामे करीतच जीवनाची अखेर गाठली. स्मरणार्थ नाना पालकर स्मृति समिती कार्यान्वित आहे.

(१४) मा. विनायकराव आपटे

भगवद्गीता अभ्यासू व दिवाणी वकील. १९३५ पासून पुण्याच्या संघात प्रविष्ट झाले अन् अत्यंत मनःपूर्वक, जिव्हाळ्याने व मातेच्या मायेने पुण्यातील

स्वयंसेवकांना सतत प्रोत्साहित केले. संबंध ठेवून ते जोपासण्यात मा. विनायकराव यांचा हातखंडा होता. म्हणून पुण्यात वाढलेले काम टिकून राहात होते. मला सर्व प्रकारचे प्रोत्साहन सतत मिळाले. मी ८–१० वर्षे माझी संघदैनंदिनी त्यांना दाखवून सही घेत असे. त्यामुळे सतत जागरूक राहाण्यास मदतच होई. त्यांचा विसर पडणार नाही. घरातील सर्वांना संघवृत्तीचे बनविले.

(१५) मा. नरहर गोविंद – (भाऊराव) अभ्यंकर

निष्णात वकील – १९३५ पासून संघाला अगदी जवळचे मानू लागले. उपसंघचालक पुणे, म्हणून काम सुरू केले. पुण्यात शाखा स्थापन करण्यात येणाऱ्या अडचणी – तंटेबखेडे आपल्या विशेष शैलीने बाजूला करीत गेल्यामुळे मला काम करताना कधीही अडचण वाटली नाही. माझ्या सुरवातीच्या १० वर्षातील संघकार्य मा. भाऊराव यांचेमुळेच प्रगतीपर ठरले व झाले.

मा. भाऊराव विभाग संघचालक या नात्याने नागपूरला जात. तसेच अन्यान्य प्रांतांतही जात. सुरवातीस हिंदु महासभेचे काम करीत पण नंतर फक्त संघाचेच काम करीत राहिले. मोठ्या व्यक्तीचे संबंध ठेवणे–चहाफराळादि कार्यक्रमांतून त्यांचे सहकार्य घेता येण्याची शक्यता निर्माण करणे हे सतत केले. माझे भाऊरावांचे कौटुंबिक व जिव्हाळ्याचे संबंध होते.

(१६ मा. भाऊसाहेब देशमुख, (वकील व स्काऊटचे काम)

भारतीय भूमिकेवरून टिळक बालचर पथकाद्वारे काम करीत असताना १९३२ मध्ये पुण्यात संघाची पहिली प्रतिज्ञा घेतलेले. काही दिवस पुणे शहर, नंतर पुणे जिल्हा संघचालक म्हणून काम केले. अत्यंत प्रेमळ व खाण्यापिण्याच्या कार्यक्रमात रस घेऊन त्याचा कार्यार्थ उपयोग केला.

(१७) मा. बलवंत नारायण (बाबा) भिडे

१९३८ मध्ये प्रतिज्ञित होऊन १९३९ पासून हवेली तालुका संघचालक झाले. १९४२ पासून प्रांताचे सर्वांगीण काम पाहू लागले. पू. गुरुजींच्या प्रेरणेने नवीन सुरू झालेला प्रचारकी जीवनाचा कारभार सांभाळला. उत्तम फौजदारी वकील. प्रांतसंघचालक झाल्यापासून आठवड्यातील तीन दिवस जिल्हा भेटी व अन्य कार्यक्रमांसाठी जात असत. पू. गुरुजींना आपल्या कामाने व बोलण्याने जिंकत असत. विचार करून निर्णय घेण्यात अत्यंत तत्पर.

तळजाई प्रांतिक शिबिराचे संयोजक, कल्पक व व्यवस्थापक. सतत २०–२२ वर्षे प्रांतिक कार्यात अग्रेसर होते. पूर्वयोजनाबद्ध नवीन कार्यक्रम यशस्वी करून घेणे हेच स्व. मा. बाबांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य आहे. अनेक बाबतीत मला मार्गदर्शन व सल्ला देत असत. वकीलांना आदर्श जीवन !

(१८) श्री. (विनायक विश्वनाथ) अप्पा पेंडसे

१९३५ पासून संघाचे स्वयंसेवक – विविध जबाबदाऱ्या घेत घेत संघाचे सर्व शिक्षण पूर्ण केले. एक शाखा, नंतर एक मंडल याप्रमाणे कामाचे क्षेत्र वाढवीत गेले काही भव्य-दिव्य संकल्पनातून राष्ट्रहिताला प्राधान्य देत – अभ्यासातून वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान प्रबोधिनीचे कार्य १९६२ मध्ये सुरू केले. संघाचा संबंध कधीही न विसरता, ज्ञान प्रबोधिनीचे कार्य चालू करून देण्यात तनमनाचा कडेलोट केला.

(१९) श्री. विश्वनाथ रसाळ

केवळ २४ व्या वर्षी दिवंगत झालेला हा स्वयंसेवक मला अत्यंत प्रिय होता. त्याच्यावर माझे पूर्ण लक्ष व प्रेम होते व परमेश्वराने त्याला लौकर नेला.

(२०) मा. वामन प्रभाकर ओक

ठाणे येथील निष्णात वकील. मुंबई विभाग संघचालक होते. अत्यंत मायाळू पण कर्तव्यदक्ष. माझा त्यांचा सुमारे ४० वर्षे परिचय होता. माझ्या प्रत्येक हालचालीत, योगविचारात अत्यंत आत्मीयतेने लक्ष ठेवीत असत. संघकार्य सर्व दृष्टींनी पुढे जावे याचा प्रयत्न करीत.

(२१) श्री. गोपाळ कृष्ण देशपांडे

पुण्यातील कार्यकर्त्यांमध्ये स्वतःच्या घरच्या स्थितीचा फारसा विचार न करता मॅट्रिक परीक्षेनंतर संघावरील निःसीम भक्तीमुळे संघाच्या कार्यात निरपेक्षपणे प्रचारक म्हणून गोपाळराव काम करू लागले. प्रथम मावळ तालुका, नंतर पुणे जिल्हा, नंतर धुळे जिल्हा. याप्रमाणे क्षेत्रामध्ये प्रचारक म्हणून उत्तम केले. मनाने हळवे व भावनाप्रधान, पण संघाच्या कामात अत्यंत तत्पर ! १९७५ च्या स्थानबद्धतेमध्ये ६ महिने पॅरोल मिळण्यास उशीर लागल्यामुळे शरीरातील दुखणे बळावून बाहेर येताच डिसेंबर १९७६ मध्ये निधन झाले.

(२२) श्री. गोपाळ कृष्ण मराठे

पुण्यातील पहिला बालस्वयंसेवक. सांगली जिल्ह्यात प्रचाराचे काम करीत असताना मृत्यू पावला.

(२३) श्री. रामचंद्र काशीनाथ म्हाळगी (रामभाऊ म्हाळगी)

पुण्याच्या १९३८ च्या हिवाळा शिबिरामध्ये गणवेषाचे पहिले बक्षिस मिळविणारे संघबंधू म्हणून मला पहिली आठवण आहे. अत्यंत टापटीप, स्वच्छता व शिस्त यांची रामभाऊंचे ठिकाणी उपजत प्रवृत्ती होती. पुण्यात व नंतर महाराष्ट्रात प्रचारक-जीवनात अत्यंत यशस्वीपणे कार्य केले. वकील झाले अन् मा. बाबांनी सुचविताच भारतीय जनसंघात मनापासून कार्यास सुरुवात केली. राजकीय जीवनाचा स्वीकार केला पण अत्यंत सच्छील व कौशल्यपूर्ण पद्धतीने महाराष्ट्र विधानसभा व नंतर भारतीय संसदेत प्रचंड मतांनी निवडून येऊन विधानसभा व संसद यामध्ये अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण रीतीने कार्य केले. पक्षाभिनिवेशापेक्षा, निवडून आल्यामुळे जनतेपैकी कोणाचेही काम करून त्यांना साहाय्य करण्यात रामभाऊंनी आनंद मानला. अन्य पक्षांतील सर्वांना रामभाऊंविषयी आदर व प्रेम वाटत असे. जनतेतील कोणाही माणसाचे काम रामभाऊ अत्यंत तत्परतेने व सेवाबुद्धीने करीत असत. "असा संसदपट्टू अनेक वर्षांत झालाच नाही." अशी रामभाऊंची प्रशस्ती सर्वांनीच केली. माझे व रामभाऊंचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. १९३६ ते १९८२ पर्यंत हे संबंध कायम होते.

(२४) मा. विनायक पंढरीनाथ ऊर्फ राजाभाऊ साठ्ये, वकील, नासिक.

पू. डॉक्टरांच्या नाशिक मुक्कामातील बैठकीत पू. डॉक्टरांच्या परिस्थितीच्या विवेचनामुळे संघकार्यात एकदम अत्यंत आत्मीयतीने प्रविष्ट झाले. शेवटपर्यंत संघासंबंधी जे जे करता आले, ते ते निःशंकपणे केले. यशस्वी वकील व संघटक.

(२५) मा. वामन यशवंत ऊर्फ दादा गोरवाडकर

नासिक येथील निष्णात वकील. पू. गुरुजींवरील अपार भक्तीमुळे मातोश्री व कुटुंबियांसह गुरुजींच्या सेवेत ब्रह्मानंद मानीत असत. संघाच्या कार्याबद्दल

अत्यत जागरूक राहून लहान सहान चूकही होऊ न देण्याची खटपट करीत. नासिक शहर, जिल्हा यांतील संघबंधूंना मोठा आधार होते.

(२६) मा. आण्णासाहेब गोरेगावकर

मुंबईचे सुप्रसिद्ध सॉलिसिटर. ८–९ वर्षे तरी मुंबई जिल्हा संघचालक होते. मुंबई जिल्हा प्रथम पुणे विभागात असल्याने त्यांच्याकडे अनेक वेळा गेलो होतो. उच्च दर्जाचे व्यावसायिक पण पू. गुरुजींवर आत्यंतिक श्रद्धा. पू. गुरुजींच्या भेटीसाठी मुंबईतील सुमारे १२५ वा अधिक अत्यंत मातबर प्रमुख व्यक्तींना निमंत्रण केले होते. चहा-फराळाचा उत्कृष्ट कार्यक्रम व संघाबद्दल माहिती दिली गेली. तीन चिरंजीव अत्यंत आज्ञाधारक व सच्छील. वडिलांच्या समोर बसणारही नाहीत इतका आदर. मुंबई संघाला चांगले स्थान प्राप्त करून दिले होते.

(२७) मा. बापूसाहेब मोडक (कल्याण)

ठाणे जिल्हा संघचालक, उत्तम वकील व ठाणे जिल्ह्यात संघाच्या कार्याला चांगले स्थान मिळवून दिले. माझा निकट संबंध आला होता.

(२८) मा. शिवराम विष्णु ऊर्फ भाऊसाहेब मोडक (सातारा)

हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते पण क्रियाशील. संघकार्यात अत्यंत आत्मीयतेने दाखल झाले. एखादा विषय मांडण्याची अद्भुत व लोकविलक्षण शैली असे. बोलताना हात व बोटे यांच्या हालचाली वैशिष्ट्यपूर्ण असत. बैठकीतील गप्पा फार रोचक व आकर्षक असत. "केसरी" संस्थेचे विश्वस्त झाल्यावरही संघकार्याचा संबंध अत्यंत काळजीपूर्वक संभाळला होता. सातारा जिल्हा संघचालक होते.

(२९) मा. डॉ. दादा गोखले (वाई)

वाईतील प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे डॉक्टर. गंगापुरीतील अत्यंत प्रतिष्ठित लोकाभिमुख घराण्यातील डॉक्टर. १९४८ च्या गांधीवधाच्या निमित्त भयंकर त्रास व नुकसान सहन केले. आक्रमक स्वभावामुळे वाईमध्ये संघाच्या कार्याला फार उत्तम स्वरूप आले. मा. बाबाराव भिडे यांचे जवळचे नातेवाईक.

(३०) मा. भा. दि. मुळ्ये

सोलापुरातील विख्यात निष्णात शल्यचिकित्सक. संघकार्याबद्दल अत्यंत डोळस श्रद्धा! संघकार्यासाठी अनेक मानसिक यातना सहन केल्या. शेवटपर्यंत कार्यरत.

(३१) श्री. वसंत मातेगापकर

कसबा पेठेतील एक निष्ठावंत स्वयंसेवक! टाईपरायटिंग शिक्षणाचा वर्ग चालवीत होते. उत्तम नट होते. संघाच्या कार्यात घरच्या सर्वांना लक्ष घालावे लागेल इतका परिचय होता. खुमारे २० वर्षे त्यांनी संघकार्यार्थ पुण्यात खूपच परिश्रम घेतले होते,

वरीलप्रमाणे ज्या दिवंगत श्रेष्ठ संघबंधूंचा माझा ५० वर्षात संबंध आला, त्यांच्या मृत्यूने तो समाप्त झाला. त्यांच्याबद्दलच आठवण केली आहे.

आज प्रत्यक्षपणे खरोखरच हजारो कार्यकर्ते कार्यरत आहेत. मोठमोठी कामे करीत आहेत. त्यांची संख्या वाढतच आहे. सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीने पाहता १०० व्यक्तींना एक चारित्र्यसंपन्न कार्यकर्ता मार्गदर्शनार्थ विश्वासार्ह रीतीने लोकांसमोर आला पाहिजे. हे लक्ष्य ठेवण्यावाचून गत्यंतर नाही.

संघाच्या कार्याकडे त्या दृष्टीने पाहिले तर संघाचे काम अजून खूप वाढले पाहिजे. त्याची विश्वासार्हता टोका-टोकापर्यंत पोचायला हवी. संघाच्या उत्कृष्ट कार्याचा लाभ, चारित्र्यसंपन्न व्यक्तींनी निर्माण केलेली कार्यशैली, समाज-जीवनार्थ लांबदूर उपयोगी पडली पाहिजे.

पन्नास वर्षे संघाच्या कार्यात असल्याने बाहेरच्या वातावरणात काही बिघडले आहे, कौटुंबिक संबंध खराब झाले आहेत, असा विचार करण्यापेक्षा संघाच्या कार्याचा, पद्धतीचा स्वीकार विचारवंतांनी करावयास हवा असे म्हणावेसे वाटते.

मला कळते ते असे की, संघाला, संघाच्या कार्यकर्त्यांना कशाचेही श्रेय नको आहे. पण समाजासमोर पुढे येणारा कार्यकर्ता प्रामाणिकपणे व निःस्वार्थ बुद्धीने समाजासाठी आवश्यक असे काही करू लागला पाहिजे, ही अपेक्षा आहे.

संघाच्या पवित्र, क्रियाशील व प्रगतीपर वाटचालीतून आशा मजबूत होत आहेत पण समाज कल्याण आणि संघ यांचा रुळांचा सांधा कोठे केव्हा जमेल ते अजून तरी लक्षात आलेले नाही. काम किती वाढले पाहिजे ? ह्यात काही बदल हवा का ? बदल काही नको. कारण जे अनुभव आहेत ते सामाजिक जीवनाच्या पाहणीत चांगलेच आहेत. मग कार्य किती वाढले पाहिजे ते समाजजीवनाला उपयुक्त होईल व अपेक्षित राष्ट्रजीवनाचा मार्ग सुकर करील याचा मी विचार करीत आहे. परमेश्वर जिवंत ठेवील तेथपर्यंत संघकार्याचा विसर पडू देणार नाही. एवढीच सद्भावना.

१९४० साली शहर भागात ३ प्रतिशत व खेडेगावात १ प्रतिशत पूर्ण गणवेषधारी व प्रतिज्ञित स्वयंसेवक प्रत्येक जिल्ह्यात व्हावेत ही अपेक्षा ठेवली होती. समाजात किती प्रमाणात संघ वाढला म्हणजे समाजावर परिणाम दिसेल ही गोष्ट अखिल भारतीय कार्यकर्त्यांनी विचारात घ्यावयाची आहे अन आम्ही ते प्रमाण गाठणे अगत्याचे आहे.

जागरूकता

संघाच्या कार्याची माहिती होऊन संघाशी पूर्ण परिचित झाल्यावर कार्य करू लागल्यावर आपल्या संचाराची जेवढी क्षेत्रे असतील, ज्या भागात आपण देशात राहात असू तेथे जागरूकतेने राहाणे आवश्यक ठरते. आजवर ज्यांनी हिंदू धर्म, संस्कृती, समाज व प्रदेश यावर आक्रमणे केली, त्यांनी ती आपल्याला नकळत केली आहेत. यापुढे अशा कोणत्याही आक्रमणाबद्दल जागरूक असणे हे आपले कर्तव्य आहे.

विचारवंतांना आवाहन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याकडे पाहून पुरेशी माहिती घेऊन एखाद्या तरी शाखेवर एकदा जाऊन जो स्वतःला विचारवंत समजतो, त्याने पुढील गोष्टींबाबत विचार करावा व उत्तरे लिहावी.

(१) १९२५ साली सुरू झालेले संघाच्या एका शाखेचे कार्य सर्व भारतात केवळ १५ वर्षांत कसे पसरले ?

(२) कसल्याही विद्यमान प्रचारतंत्राचा, आधुनिक साधनांचा विलोभनांचा उपयोग न करता संघाचे कार्य कसे चालले व वाढत गेले ?

(३) हिंदु समाजातील असंख्य भेदांना निपटून खेडोपाडी – आदिवासी, वनवासी क्षेत्रांतही संघाच्या कार्याला कसे पोचता आले ?

(४) फंड किंवा देणग्या, मदत यासारखा कोणताही प्रकारचा कार्य चालविताना अवलंब का केला नाही ?

(५) आपसात भांडणे, संघविभाजन, मतभेद यासारख्या गोष्टींचा उपद्रव संघाला का झाला नाही ?

(६) दोन वेळा बंदी येऊनही संघकार्य कसे चालू राहिले ?

(७) एकाहून एक श्रेष्ठ असे कार्यकर्ते निर्माण होण्यात रहस्य कोणते ?

(८) राज्यांराज्यांतून चाललेले हे कार्य सतत गतिमानच आहे, याचे कारण काय ?

(९) संघकार्यात शिस्तीचा दिसणारा व आवडणारा कार्यक्रम याचा स्वीकार कशामुळे झाला ?

(१०) भारताचे कल्याण – प्रगती साधण्याच्या दृष्टीने संघाचा काही उपयोग आहे का ?

(११) अन्य संस्था अशाच तऱ्हेने चालाव्या असे वाटते का ?

(१२) संघाच्या कार्यात काय सुधारणा व्हाव्यात ?

(१३) आपणाला संघकार्यात स्वतः भाग घ्यावा की न घ्यावा याबद्दल काय वाटते ?

(१४) आपल्या राहाण्याच्या ठिकाणापासून एखादी शाखा किती लांब आहे ? तेथे जाता येईल का ?

प्रतिज्ञा

संघकार्याशी परिचित होऊन ध्येय, धोरण व कार्यक्रम यासंबंधी पूर्ण कल्पना आल्यानंतर १५ वर्षांवरील प्रत्येक संघबंधूंने प्रतिज्ञा घ्यावी असा संकेत आहे. या प्रतिज्ञा घेण्यामुळे कार्याची जवळीक व कार्यशीलतेची पद्धती यांची जाणीव सतत राहाते. आपला प्रतिज्ञा दिन लक्षात ठेवावा व आपले सर्व वागणे प्रतिज्ञेला धरून असावे अशी अपेक्षा असते.

व्यावसायिक संघटनात्मक कामातील ४३ वर्षे

(१९४१ ते १९८३)

मी बी. एस्सी. १९३७ साली पास झालो. तेथपर्यंत चित्रशाळा प्रेसमध्ये अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान या देशांतील मुद्रण व्यवसायाबद्दल पुष्कळ वाचले होते. विविध क्रिया, कामगार, मालक, मॅनेजर त्यांच्या स्वतंत्र संघटना यांचीही माहिती नियमित वाचण्यास मिळत होती.

चित्रशाळा प्रेसमध्ये उपजीविकेचा व्यवसाय म्हणून काम करावे असे ठरविल्यानंतर, १९३८ पासून ब्लॉक डिपार्टमेंटमध्ये काम करू लागलो. वाचन चालूच होते. शास्त्रीय ज्ञानामुळे ब्लॉक विभागाचे काम मी बरेच सुधारले.

१९४१ मध्ये पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन या १९१९ साली स्थापन झालेल्या मुद्रक संघटणेमध्ये सभासद झालो. श्री. बाबुराव सहस्रबुद्धे हे बालोद्यान प्रेसचे मालक. इंग्लंडमध्ये ३–४ वर्षे राहून शिकून आले होते. त्यांनी मुद्रक संघटनेचे कार्यास चालना दिली. १९३८ पासून मुद्रण प्रकाश हे त्रैमासिकही सुरू केले. मी १९४१ मध्ये सभासद झालो तेव्हा पुण्यात ५० पर्यंत छापखाने होते. त्यांतील फक्त ३५ सभासद होते. मी व शि. का. संत (अ. वि. गृह) यांनी एक " गटविणे मंडळ' ' स्थापन करून असोसिएशनचे सभासद यांनी वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला.

दर पंधरवड्यास सभा होत असे. व सभा एखाद्या सभासदाने स्वतःमार्फत घेऊन सर्वांना भोजनही द्यावयाचे ! या पद्धतीने चाललेल्या सभा नियमितपणे होत व व्यवसायातील अडचणी – प्रश्न यांचा ऊहापोह सभेतून केले जात.

१९४४ नंतर मुद्रण प्रकाशचे अंक निघेनात. तेव्हा मी योजना दिली व असोसिएशनवर काही बोजा येऊ न देता मुद्रण प्रकाश चालवीन म्हणून सांगितले. माझी योजना इतर योजनापेक्षा सोपी व स्वतंत्र असल्याने ती पास झाली व व्यावसायिक संघटनेचे मुखपत्र चालविण्याची संधी मला मिळाली –

व्यवसाय ८ तास, त्याशिवायचा वेळ संघाच्या कामात घालवायचा हा बाणा चालू होता. तरी हे मुखपत्र हाती घेतल्यामुळे व्यावसायिक संघटनेच्या आचार-विचारांना प्राधान्य देण्याची खटपट सुरू झाली.

माझी मासिकाची योजना पास झाली. त्यावेळच्या "पेपर कंट्रोल" कायद्यामुळे मला कागद कसा मिळवायचा ही पंचाईत सुरू झाली. अन्य काही मुद्रण व्यावसायिकांच्या कोट्यांमधून थोडा कागद मिळवून घेऊन काम सुरू केले. सप्टेंबर १९४६ ला पहिला अंक काढून "श्रीगणेशा" तर केलाच. पहिल्याच अंकात चालू मुद्रण व्यवसायाला लागलेल्या कायद्यांची माहिती दिली. ते सर्वांना आवडले. असोसिएशनच्या पाक्षिक सभांचे वृत्तांत व माहिती विषयक लेख देणे सुरू केले. असोसिएशनच्या सभांना नियमित जाऊ लागलो. चांगली माहिती सांगतात अशा मुद्रकांना भेटून लेख देण्यास विषय दिले. यातून संबंध वाढले.

१९४८ साली सुरवातीसच पुण्याच्या या संघटनेपैकी श्री. क. ला. मुनोत, प्रभात प्रिंटिंग प्रेस, रविवार पेठ यांनी माझ्याशी व अन्य १–२ मुद्रकांशी बोलून महाराष्ट्र मुद्रण परिषद ही २६ जिल्ह्यांच्या महाराष्ट्रीय मुद्रकांची संघटना सुरू करावी व आपण त्यात पुढाकार घ्यावा अशी सूचना लेखी मांडली. त्याबद्दल प्रश्नोत्तरे, चर्चा होऊन महाराष्ट्र मुद्रण परिषद स्थापन करण्याचे ठरले. त्यातील पहिले अधिवेशन पुणे येथे जानेवारी १९४९ मध्ये व्हावे असेही ठरले. त्या अधिवेशनातील एक चिटणीस म्हणून माझीही निवड झाली. मी प्रामुख्याने मुद्रण प्रदर्शन भरवावे असे मला सांगण्यात आले. तेव्हा मी एक मुद्रण प्रदर्शन कमिटी स्थापन केली. ८ लोक त्यात घेतले व प्रदर्शनाचे स्वरूप शैक्षणिकच ठेवावे, म्हणजे विक्री वगैरेंचा त्यात संबंध नसावा असे ठरविले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या २–३ दालनात हे प्रदर्शन विषयवार लावावे असे ठरविले. एक नकाशा काढून त्यात मांडावयाच्या वस्तू, छपाईचे नमुने–जुने नवे–शाई, कागद यांचे नमुने–रोलर कॉपोझिशन (चित्रशाळा संशोधन), टाईप बनविण्याच्या पद्धती, इत्यादी गोष्टींचा समावेश होता. महाराष्ट्रातील जुनी मुद्रणालये – त्यांच्या भेटींतून प्रदर्शनीय वस्तू इत्यादी जमवाजमव सपाट्याने केली.

ह्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष नागपूरच्या ऑल इंडिया रिपोर्टरचे मालक श्री. आप्पासाहेब चितळे निवडले होते. ह्या अधिवेशनाचे निमित्ताने मुद्रण

प्रकाशचा एक खास अंक काढण्यात आला व तो फार सुंदर झाला. माझ्याबद्दल मुद्रक मंडळींत चांगलाच विश्वास उत्पन्न झाला. श्री. जयंतराव देवकुळे यांनी त्या अंकाची संपूर्ण सजावट केली होती.

पुढे १९५२ मध्ये मुद्रण प्रकाशचा १०० वा अंक प्रसिद्ध करण्याचे ठरवून त्यात पुणे शहराच्या १७५ वर्षांच्या मुद्रण व्यवसायाची पाहाणी करणारा असा तो अंकाचा विषय ठरविला. ह्या अंकाच्या माहितीसाठी व लेखासाठी पुण्याच्या रस्त्यारस्त्यांनी हिंडून जुनी नवी मुद्रणालये, त्यांची माहिती जमा केली. जुन्या नव्या मुद्रकांचे फोटो, जगद्भितेच्छु सारख्या अस्तंगत मुद्रणालयाची माहिती वगैरेंनी अंक चांगला १२५–१५० पानांचा झाला. माझ्या मदतीस आर्यभूषणचे शा साहेब पटवर्धन व आनंद मुद्रणालयाचे दादा जोशी होते. त्यांनी लेखनाची पुष्कळ मदत केली. ह्या अंकांना जाहिरातीही खूप मिळू शकल्या.

ह्या अंकामुळे पुण्यातील मुद्रकात मला काही स्थान प्राप्त झाले असे वाटले. १९५४ मध्ये मुद्रण प्रकाशचे काम सोडावे असे वाटले. त्यावर्षी मला महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे सरचिटणीस पद देण्यात आले व माझी जबाबदारी वाढली.

१९४९ मध्ये पुण्याला पहिले, १९५० साली नागपूरला दुसरे अधिवेशन झाले पण त्यानंतर नागपूरच्या लोकांनी अळंटळं, दिरंगाई केल्याने श्री. क. ला. मुनोतही काही करू शकले नाहीत. शेवटी १९५४ मध्ये १ दिवसाचे अधिवेशन पुणे येथे भरवून कार्याला पुन्हा सुरुवात केली व मी सरचिटणीस म्हणून काम करू लागलो. पुढे चार वर्षे म्हणजे १९५७ पर्यंत मलाच सरचिटणीस राहाणे भाग पडले. कार्यकारी मंडळाच्या सभाजिल्हानिहाय घेतल्या.

कार्यकारी मंडळाच्या दर तीन महिन्यांच्या सभा व वार्षिक अधिवेशन अशा दोन खटपटी परिषद चिटणीस म्हणून मला कराव्या लागल्या. त्यासाठी गावोगावी जाणे–सभांचे आयोजन करणे हे करावे लागले.

१९५५ साली मुद्रकासाठी ज्ञानवर्धक वर्ग यशस्वी मुद्रकांच्या साहाय्याने करण्याची सूचना कार्यकरी मंडळ-सभेत मांडली. बऱ्याच उहापोहानंतर ती पास झाल्यावर पहिला ज्ञानवर्धक वर्ग 'मुद्रण व्यवस्थापन' या विषयावरचा मीच पुण्यात घेतला. त्याला १८ गावांतून २३ ज्ञानार्थी आले होते. ८ दिवसांच्या ह्या वर्गात दररोज ५–६ तास काम पडत असे.

सकाळी तंत्रज्ञानाचे भाषण व नंतर यशस्वी व्यवस्थापकाचे बोलणे, दुपारी त्याच व्यवस्थापकाचा छापखाना पाहाणे असा अभ्यासक्रम झाला. शेवटी ३ पेपरात परीक्षा घेण्यात आली. बहुतेक सर्वजण उत्तीर्ण झाले.

महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या कार्यातील ही ज्ञानवर्धक वर्गाची कल्पना फार महत्त्वाची ठरली. त्यानंतर मुद्रित शोधन, छापखान्यातील जमाखर्च, हाफटोन ब्लॉक छपाई, तीन रंगी छपाई, छापखाने विषयक कायदे, रचनातंत्र असे एकूण सात ज्ञानवर्धक वर्ग परिषदेतर्फे १९५७ पर्यंत घेण्यांत आले. सध्याही ती पद्धत रूढ झाली आहे.

सर्व योजना, व्यवस्था, पत्रव्यवहार, सरचिटणीस ह्या नात्याने मीच करीत होतो. त्यांत यश मिळत गेले ही मात्र परमेश्वराची कृपा.

१९५८ पासून मजवरची सरचिटणीम पदाची जबाबदारी संपली पण १९५५-५६ या दोन्ही वर्षी मी भारतीय मुद्रक संघटनेच्या बनारस व दिल्ली येथील अधिवेशनांना जाऊन २-३ विषयावर-खुल्या अधिवेशनांत भाषणे केली.

छपाई, वार्निशे व व्यवस्थापन हे माझे विषय होते. १९५६ मध्ये छपाईकला नावाचे हिंदी मुद्रण मासिक सुरू करावे असा विचार झाला व जानेवारी १९५६ मध्ये पहिला अंक काढला. पुण्यातील राष्ट्रभाषा प्रेस, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, या संस्थांचे गो. प. नेने, करमरकर व मु. मा. जगताप यांच्या सहकार्याने व्यवहारात अगदी सरळ राहून १९६८ पर्यंत छपाईकला हे हिंदी मासिक मी चालविले. नेपाळ, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांतील मुद्रणालये, मुद्रणशाला व मुद्रक संघटणा यात माझे संबंध घनिष्ट झाले.

१९६१ व १९६२ अशी दोन वर्षे अलाहाबाद येथील सरकारी मुद्रण शाळेमध्ये माझी २-२ भाषणे इंग्रजीत झाली व त्याबद्दल प्रिन्सिपॉल नागपाल यांनी माझी वाहवा केली. भारताबाहेरील अनेक संदर्भही त्यांना फार आवडले.

गुजराथमध्ये त्यांची राज्य मुद्रक संघटना सुरू होण्याचे दृष्टीने मी सुरत व बडोदा येथे निमंत्रणावरून गेलो होतो.

१९६८ मध्ये मला महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे अध्यक्ष निवडण्यात आले. जळगावच्या २१ जानेवारी १९६८ या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून माझे भाषणही सर्वस्पर्शी झाले.

त्यातील आश्वासनाप्रमाणे मी १९६८ या वर्षाच्या ११ महिन्यात महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांना अध्यक्षीय भेटी दिल्या. त्याचा सविस्तर वृत्तान्त मी छापला होता. सर्व जिल्हा मुद्रकांची भेट, अडीअडचणी, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांच्या भेटी असा कार्यक्रम प्रत्येक जिल्ह्यात अध्यक्षीय स्तरावर केला. असे करणारा अध्यक्ष अगोदर कुणी झाला नाही. नंतरही तशी वार्ता नाही. मला मुद्रक संघटणेच्या क्षेत्रात बरेच काही करता आले. कालमानाप्रमाणे व जरुरी-प्रमाणे मुद्रण व्यवस्थापन (३ आवृत्ती), छापखाना कसा काढावा (२ आवृत्ती, प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे (२ आवृत्ती) छापखान्यातील दर आकारणी (२ आवृत्ती), अशी चार पुस्तके मी लिहिली. सध्या ती संपली आहेत.

व्यावसायिक संघटणेमध्ये काम करण्यात थोडा त्रास असला तरी फार अडचणी नसतात. १९५६ साली चित्रशाळा प्रेसमध्ये काम करीत असताना पुणे ब्लॉक मेकर्स असोसिएशन ही संघटणा सुरू झाली. चित्रशाळा प्रेसमध्ये ब्लॉकमेकिंग विभाग असल्याने मी सभासद झालो. १९६१ ते १९७० पर्यंत ह्या संघटणेतर्फे स्कूल ऑफ ब्लॉकमेकिंग मी चालविले. सुमारे ४९–५० विद्यार्थ्यांना ब्लॉकमेकिंग या कलेचे व तंत्राचे ज्ञान देता आले. १९८३ मध्ये माझा व्यवसायाशी संबंध नसला तरी त्या संघटनेचे काम मी पाहात आहे. केवळ मित्रांच्या आग्रहाखातर !

व्यावसायिक संघटनेत थोडे का होईना पण ४३ वर्षे काम केले. त्यात थोडे वैशिष्ट्यही आहे.

मात्र व्यावसायिक संघटणेत आपसातील दर स्पर्धा, एकमेकांची उणीदुणी काढणे हे कोठेच बसत नाही. पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन व महाराष्ट्र मुद्रण परिषद या दोहींचा मी तहहयात सभासद झालो आहे.

परमेश्वर बुद्धी देईल व शक्ती देईल त्यास अनुसरून कार्य करीत राहीन. कारण त्यातच आनंद व समाधान आहे

केंद्राचे सहकार्य

राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचे कार्य भारतवर्षभर पूर्वयोजनेने व वैशिष्ट्यपूर्णरितीने नागपूर येथील केंद्रशाखेने पसरविले. महाराष्ट्र प्रांतासाठी मान्यवर दादाराव परमार्थ यांनी अमोघ व तेजस्वी वाणीने १९३३ ते १९३६ या काळात पुणे व महाराष्ट्र प्रांत यातील कार्य जोपासले. १९३७ मध्ये मा. मधुकरराव भागवत (चांदा) यांनी घोष विभागाला (बँड) २ वर्षात उत्तम वळण लावले. श्री. दाते, जोग, पेठे यांनी ते आत्मसात केले. त्यानंतर मा. मोरोपंत पिंगळे हे प्रांतप्रचारक म्हणून आल्यानंतर त्यांनी सर्व कार्याला चांगले वळण लावले. सर्व ठिकाणी कार्यार्थी दृष्टीकोन ठेवून व्यवहार तसा घडविला. त्यामुळे व्यक्तीनिरपेक्ष असे संघकार्य महाराष्ट्रात उभे राहिले ! ते इष्ट ठरले !

REFBK-0024148

पुण्यात जून १९३३ पासून सुरू झालेल्या
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पहिल्या शाखेत
डिसेंबर १९३३ पासून स्वयंसेवक झाले.
१९३७ साली बी. एस्सी. झाले.
१९३३ पासून ५० वर्षे सतत
संघाची जवळीक ठेवून जमेल ते,
पण आवश्यक असे सर्व काम करीत गेले.
संघाचे संस्थापक पू. डॉक्टर हेडगेवार
दुसरे सरसंघचालक पू. गुरुजी व
विद्यमान सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस
यांच्या निकट संबंधांत राहिले आहेत.
व्यायाम प्रेमी, कुस्तीगीर, कला व संगीत-प्रेमी,
योग-शास्त्राचे जाणकार, जातीवंत मुद्रक व
संघटक, सच्चे संसारी,
संघाचे निष्ठावान स्वयंसेवक
अशा व्यक्तिमत्त्वात ७० वर्षांचे आयुष्य उपयोगात आणीत आहेत.